

स्वातंत्र्य का नासले?
शरद जोशी

# स्वातंत्र्य का नासले ?

शरद जोशी

रेणुका प्रकाशन, परभणी

**स्वातंत्र्य का नासले?**

© शरद जोशी
अंगारमळा,
आंबेठाण - ४१०५०१
ता.खेड, जि.पूणे

**प्रथम आवृत्ती**
१० डिसेंबर १९९८
मार्गशीर्ष वद्य सप्तमी शके १९२०

**प्रकाशक**
सौ.आशा उमरीकर
रेणुका प्रकाशन
नानल पेठ, परभणी
☎ (०२४५२) २०२५५

**अक्षर जुळणी**
विनोद रावेकर (वाणी)
रेनबो एंटरप्रायजेस,
शिवाजी नगर, परभणी

**मुद्रण स्थळ**
ओम साई ग्राफीक्स,
नारायणगुडा, हैद्राबाद

**मुखपृष्ठ**
चंद्रमोहन कुलकर्णी, पूणे

**मुल्य**
रुपये ५०/-

# नमनाचे पळीभर तेल

स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाचे वर्ष खरे पाहिले तर १५ ऑगस्ट १९९८ रोजीच संपले. १४ ऑगस्टच्या रात्री संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक झाली आणि महोत्सवाचे सूप वाजले. महाराष्ट्र राज्याने आपल्यापुरता एक फतवा काढून महोत्सवाची मुदत २६ जानेवारी १९९९ पर्यंत वाढवून घेतली आहे. प्रत्यक्षात, वाढीव काळात महाराष्ट्रात सुवर्णजयंती संबंधीचा एकही कार्यक्रम योजला गेलेला नाही.

स्वातंत्र्य महोत्सवाच्या या वर्षात संयुक्त मोर्चाचे सरकार पडले, एक मध्यावधी निवडणूक घ्यावी लागली, ४० वर्षे पंतप्रधानकीच्या रांगेत उभे राहिलेले अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले, स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा संपूर्ण बिगर काँग्रेसी सरकार सत्तेवर आले. राममंदिर, प्रखर राष्ट्रवाद आणि स्वदेशी अर्थकारण असा भाजपाचा कार्यक्रम पुरेशा बहुमताच्या अभावी गाठोड्यात बांधून ठेवावा लागला. नोव्हेंबर १९९८ मधील, चार राज्यांतील निवडणुकांवरुन भाजपा आघाडीचे शासन फार काळ चालेल आणि चालले तरी काही प्रभावशाली शासन चालवेल असे दिसत नाही. मे महिन्यातील पोखरणचे अणुस्फोट सोडल्यास एकही निर्णय काँग्रेसचा ठसा सोडून घेतलेला दिसत नाही. अर्थकारण अगदीच दिशाहीन झाले आहे.

अंदाजपत्रक एक दिवस मांडावे आणि त्याच दिवशी संध्याकाळपासून त्यात बदल करावेत असा खेळखंडोबा पूर्वी कधी झाला नव्हता. स्वदेशीच्या घोषणा देत भाजपाने निवडणूका जिंकल्या पण, खुर्चीवर बसताच आर्थिक सुधारणा निष्ठेने चालविण्याच्या घोषणा अर्थमंत्री आणि खुद्द पंतप्रधानच करु लागले.

स्वातंत्र्याच्या वर्षात रुपया घसरला; आर्थिक मंदीची लाट सर्वदूर पसरली; शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या राज्यांत मोठ्या संख्येने

आत्महत्या केल्या; करवसुली अधिकाऱ्यांच्या बरोबरीने आणि संगनमताने गुंड खंडण्या मागून लूटू लागले; खंडणी नाकारणाऱ्यांचे दिवसाढवळ्या खून पडू लागले; कायदा सुव्यवस्था त्यातले त्यात बिहारात बरी, का दीर्घकाळ कार्यक्षम प्रशासनाविषयी प्रसिद्ध असलेल्या महाराष्ट्रात बरी अशी चर्चा करण्याची वेळ आली.

शिस्तप्रिय म्हणून नाव कमावलेल्या भाजपाच्या राज्यात इतकी बजबजपुरी माजली की तुलनेने सोनिया गांधींसारखी सामान्य व्यक्ती नेहरु घराण्याच्या वारसाहक्काने साऱ्या काँग्रेस पक्षाचे नेतृत्व आपल्या हातात एकवटू शकली; अर्जुनसिंग, शरद पवार यांच्या सारखे नेते तिच्यापुढे कुर्निसात घालू लागले. काँग्रेसमधील या घराणेशाहीच्या 'मॅडम वाक्यम् प्रमाणम्' मुळे तेथील शिस्त भाजपा आणि संयुक्त मोर्चाच्या तुलनेने मोठी आकर्षक वाटू लागली.

सूनबाईने सासुबाईंचेच राजकारण पुढे चालविले आहे. रामटेक येथील शिबिरात पुन्हा एकदा आवाडी काँग्रेसमधील समाजवादी समाजरचनेच्या, दारिद्र्य निर्मूलनाच्या घोषणा झाल्या. सफारी सूट घालून फिरणारे सारे नेते एका रात्रीत पुन्हा खादीचा पेहराव घालू लागले.

'स्वातंत्र्य का नासले'? या पुस्तिकेत स्वराज्य आंदोलनातील वेगवेगळ्या प्रवाहांसंबंधी एक नवीन उपपत्ति आणि मांडणी करण्यात आली आहे. काँग्रेस ही मूळची शहरी, पाश्चिमात्य विचारसरणी आणि जीवनशैली यांच्याशी घनिष्ठ संबंध असलेल्यांची आघाडी. गांधीजींनी तिलाच अध्यात्म आणि सर्वोदय यांचा मुलामा दिला आणि सत्याग्रहाचे हत्यार दिले. मुसलमान सोडल्यास बाकीच्या राष्ट्राची काँग्रेसप्रणित आंदोलनास मान्यता मिळाली.

स्वातंत्र्य मिळाले सारी सत्ता पाश्चिमात्य प्रभावाखालील सवर्णांकडे गेली. त्यांनी 'भटशाही' समाजवाद तयार केला. ४० वर्षे समाजवादाचा उद्घोष झाला. नंतर, समाजवादापेक्षा खुल्या व्यवस्थेतून उच्चवर्णीयांचे भले अधिक होण्याची संभावना दिसू लागली तेंव्हा अप्रतिहत व्यवस्थेचा पुरस्कार सुरु झाला. पण, उच्चवर्णीयांत उद्योजकत्वाची धडाडी दाखविण्याची कुवत नाही हे स्पष्ट झाले. स्पर्धेसाठी समतल मैदान असण्याची भाषा सुरु झाली. नोकरशहा, कामगार, गुंड आणि पुढारी एकत्र झाले आणि पुन्हा एकदा सरकारशाहीच्याच मार्गाने जाण्याचा कार्यक्रम बनत आहे.

भाजपा, शिवसेना, बजरंगदल, विश्व हिंदु परिषद या साऱ्या हिंदुत्ववादी चळवळींचा वारसा इंग्रज आल्यावर ज्यांच्या हातून सत्ता गेली अशा हिंदू सवर्ण माजी सत्ताधाऱ्यांपासून होता. गांधींच्या खुनानंतर हिंदू राष्ट्रवाद संपुष्टात आला असे वाटत होते. शेजारील पाकिस्तानची हिंदुस्थानशी विद्वेष जळत ठेवण्याची राजकीय गरज, काश्मिरचे जळते प्रकरण आणि हिंदुस्थानातील मुसलमान नेत्यांनी मुसलमान समाजाच्या दारुण आर्थिक समस्यांची हेळसांड करुन सामाजिक, धार्मिक समस्यांना दिलेले महत्त्व यांमुळे या साऱ्या विचारसरणीचे पुनरुज्जीवन झाले आहे. हिंदुत्त्ववाद्यांतील स्वदेशी तत्त्वांनी सध्या माघार घेतलेली दिसत असली तरी ते पुन्हा डोके वर काढतील आणि स्वदेशी, राष्ट्रवाद, हिंदुत्व अशा नावांखाली सरकारशाहीच मजबूत करु पाहतील.

काँग्रेसी प्रवाह समाजवादाच्या नावाखाली सरकारशाही चालू ठेवू इच्छितो आणि हिंदुत्त्ववादी प्रवाह धर्मराष्ट्रवादाच्या नावाखाली, एवढाच काय तो फरक आहे.

बहुजन समाजाच्या नेतृत्त्वाची स्वातंत्र्याआधीच ससेहोलपट झाली होती. फैजपूर काँग्रेसपर्यंत एक मोठा भाग काँग्रेसमध्ये सामील झाला होता. स्वातंत्र्यानंतर आंबेडकरी प्रवाह सत्तेच्या जवळ गेला, तेथूनही दूर झाला. बौद्ध धर्म स्वीकारण्याच्या कार्यक्रमाने

ब्राह्मण कर्मकांडासमांतर बुद्ध कर्मकांडाचे स्तोम माजले. निवडणुका आणि नोकऱ्या यांतील राखीव जागांमुळे मागासवर्गीयांत एक सुखवस्तुंचा थर तयार झाला. दलितांच्या दु:खाच्या गोष्टी बोलाव्यात आणि दलित सुखवस्तुंच्या अर्थसाधनाचे आणि सत्तासंपादनाचे राजकारण करावे यासाठी मोठा हैदोस सुरु आहे.

स्वत:च्या कष्टाने भाकरी कमावून सन्मानाने जगू पहाणाऱ्या बहुजनसमाजाचे सार्वजनिक जीवनात काही स्थान राहिलेले नाही. केवळ मागासवर्गीयांच्या आंदोलनात हे घडले, असे नाही; आदिवासी, मुसलमान, महिला, शेतकरी या साऱ्याच शोषित वर्गीयांच्या आंदोलनांचे पानिपत झाले आहे. सवर्णांनी बाजी मारली आहे; बहुजनसमाज आणि राष्ट्र यांना फरफटत फरफटत ते सरकारशाहीकडे आणि आर्थिक संकटाच्या खाईकडे घेऊन जात आहेत.

हे काय घडले तरी काय? आणि, यापुढे आणखी काय भीषण भवितव्य वाढून ठेवले आहे? याचा सारासार विचारही अशक्य झाला आहे. स्वातंत्र्यानंतर काय होईल याची सारी रम्य स्वप्ने धुळीस मिळाली. देशाचा अध:पात अजून चालूच आहे. यावेळी, सर्व अहंकार, पक्ष, व्यक्तिपूजा सोडून 'चुकले काय?' आणि 'यापुढे कोणता मार्ग धरावा?' याचा विचार कोणास महत्त्वाचा वाटत नाही. नवीन पिढीत कोणा तरुणाच्या मनात भगतसिंग बाबू गेनू, सुभाषचंद्र बोस, यांच्या मनांतील चेतना जागृत झाली तर त्या वातीस थोडा आधार मिळावा यासाठी 'स्वातंत्र्य का नासले?' या पुस्तिकेचा तेल म्हणून तरी उपयोग व्हावा एवढ्याच आशेने ही पुस्तिका वाचकांच्या हाती देत आहे.

अंगारमळा,
२ डिसेंबर १९९८ **शरद जोशी**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | नियतीची गाठभेट | ७ |
| २. | आत्मपरीक्षण आणि आत्मवंचना | ११ |
| ३. | स्वराज्य आंदोलनातील विविध प्रवाह | १९ |
| ४. | गांधीवादा ऐवजी भटशाही समाजवाद | २७ |
| ५. | स्वातंत्र्य आले, स्वतंत्रता गेली | ४२ |
| ६. | सवर्णांच्या सोयीची लोकशाही | ५० |
| ७. | एक दुसरी फाळणी | ५९ |
| ८. | चैत्रगौरीची कारखानदारी | ७५ |
| ९. | आगगाडी रुळावरून घसरली | ८४ |
| १०. | सुरक्षाव्यवस्थेतही अंग्रेजियतच राहिली | ९१ |
| ११. | स्वातंत्र्याचा झेंडा फडकण्याआधीच लुटला गेला | १०५ |

# नियतीची गाठभेट

भारतातील इंग्रजी राज्य अधिकृतरीत्या १५ ऑगस्ट १९४७ रोजी संपुष्टात आले त्याला आता पन्नास वर्षे झाली. भारतीय स्वातंत्र्याचे सुवर्ण-महोत्सवी वर्ष म्हणून ते देशभर साजरे केले जात आहे.

दीड शतकांच्या राजकीय दास्यानंतर भारतात स्वातंत्र्याची पहाट उगवली आणि शेकडो वर्षांच्या महानिद्रेतून देश जागा झाला; आपल्या नियतीचा अधिकारी बनला. सगळा देश दारिद्र्य, भूकमार, रोगराई, निरक्षरता, अडाणीपणा, धर्मभेद, जातिवाद यांनी ग्रासून टाकलेला. परकीयांच्या हातातील सत्ता स्वकीयांच्या हाती आली, आता शतकानुशतकांच्या या समस्या सहज दूर होतील अशी सर्व भारतीयांची भावना होती. १९९७ साली, म्हणजे पन्नास वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर देशात काय परिस्थिती असेल असे १९४७ साली कोण्या नागरिकास विचारले असते तर त्याने 'स्वतंत्र भारत पन्नास वर्षांत सर्व राष्ट्रांच्या शिखरावर आरुढ झालेला असेल' असे आत्मविश्वासपूर्वक सांगितले असते. 'विश्वविजय कर के दिखालायेंगे तब होवे प्रण पूर्ण हमारा' या झेंडागीतात सर्व देशवासीयांची अपेक्षा व्यक्त होत होती.

जुन्या कायदेमंडळाच्या सभागृहात पंतप्रधान म्हणून शपथ घेतांना मन हलवणाऱ्या इंग्रजीत पंडीत जवाहरलाल नेहरु म्हणाले, "महानिद्रेच्या कालखंडातून भारत जागा होतो आहे. आपल्या 'नियतीशी गांठ' साधण्याची संधी शतकांच्या गुलामगिरीनंतर देशापुढे चालून येत आहे."

## अभद्र भाकिते

त्या वेळच्या या सगळ्या आशांशी विसंगत सूर काढणारे भारतीय त्या काळीही काही थोडे नव्हते.

'अरे राज्य करावे इंग्रजांनीच. हे नेहरु आणि पटेल, यांना कसले राज्य चालवता येणार? सगळ्या देशात अंदाधुंदी, अराजक माजेल आणि सगळा बट्ट्याबोळ करून टाकतील' हे किंवा अशा प्रकारचे उद्गार काढणारे लोक सरकारी नोकरीतून निवृत्त झालेले; रावसाहेब रावबहादुरीच्या ताठ्यात असलेले, आपले राज्य संपले त्यामुळे बोटे मोडीत आहेत असेच सगळेजण मानत आणि त्याकडे दुर्लक्ष करत.

इंग्लंडचे युद्धकाळातील पंतप्रधान सर विन्स्टन चर्चिल हे मुळातच साम्राज्यातील

वसाहतींना स्वातंत्र्य देण्याच्या विरुद्ध होते. 'इंग्रजी साम्राज्याची वासलात लावण्याकरिता मी बादशहाचा पंतप्रधान झालेलो नाही' अशी त्यांची दर्पोक्ती होती. साम्राज्यांतील वसाहती इंग्रज येण्यापूर्वी मुळी राष्ट्रे नव्हतीच. समाजातील दांडग्यांनी दुर्बलांचे मनसोक्त शोषण करायचे अशी परिस्थिती. जातिभेद, अस्पृश्यता, बालविवाह, सती असल्या रानवट चालीरीति असलेल्या भारतात इंग्रज कांही संस्कृती आणत आहेत. इंग्रजी साम्राज्य म्हणजे वसाहतीतील कोट्यवधी दीनदुबळ्या, दारिद्र्याने गांजलेल्या लोकांना ईश्वरी कृपेने मिळालेले अतर्क्य वरदान आहे अशी त्यांची निष्ठा होती. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यासंबंधी त्यांनी अशुभ उद्‌गार काढावे हे समजण्यासारखे होते. ''भारतातील बहुतेक रयत इंग्रजी साम्राज्यात सुखी आहे; तिला स्वातंत्र्य नको आहे; स्वातंत्र्याची मागणी करणारे मूठभर पुढारी स्वार्थापोटी आणि सत्तेच्या लालसेने दंगेधोपे माजवणारे फालतू लोक आहेत; त्यांच्या हाती सत्ता दिल्यास ते देशातील दीन-दुबळ्यांचे आयुष्य उध्वस्त करून टाकतील; जातिधर्माच्या नावावर दंगे माजतील; रक्ताचे पाट वाहतील; भारतीयांवर दया करा आणि तेथील इंग्रजी सत्ता संपवू नका'' अशी मागणी चर्चिल यांनी केली.

पण, साम्राज्याच्या विसर्जनाच्या आणि वसाहतींच्या स्वातंत्र्याच्या जल्लोषात त्यांच्या अभद्र वाणीकडे कुणी फारसे लक्ष दिले नाही.

## अपघाती स्वातंत्र्य

भारताच्या सीमेवर धडका देणाऱ्या जपानी फौजांना शरणागती स्वीकारावी लागली. पण त्यांच्याशी झुंज देता देता इंग्रजी साम्राज्याचा सिंहही थकून भागून गेला होता. पृथ्वीच्या पाठीवर ज्यावर सूर्य कधी मावळत नाही असे इंग्रजी साम्राज्य आता सांभाळणे शक्य नव्हते. हिंदुस्थानसारख्या देशात तर सैन्यातही असंतोष होता. नौदलाचे खलाशी तर बंड करून उठले होते. अशा परिस्थितीत भारतावर सत्ता चालवायची म्हणजे महायुद्धाच्याच प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल हे स्पष्ट होते. त्यासाठी केवळ पैसा आणि साधनसंपत्तीच नाही तर रक्ताची किंमत द्यावी लागेल हेही स्पष्ट होते. दोन-पाच हजार इंग्रजांनी स्थानिक अधिकारी आणि फौज यांचा उपयोग करुन दीडशे वर्षे हिंदुस्थानवर राज्य चालवले, तसे यापुढे शक्य नाही. आता स्थानिक जनतेचा पाठिंबा जवळजवळ राहणार नाही. दिल्लीपासून ते गावापर्यंत सत्ता चालवण्यासाठी इंग्लंडचे सारे लोक तेथे नेऊन बसवले असते तरी साम्राज्य टिकवणे शक्य नाही. जे काही काळ टिकवता येईल त्यासाठी घाम, अश्रू आणि रक्त यांची दुसऱ्या महायुद्धातील काळापेक्षाही जबरदस्त किंमत द्यावी लागेल आणि असा संघर्ष झाला तर दोस्त राष्ट्रात



आणि संयुक्त राष्ट्रसंघात स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते म्हणून बसणे इंग्रजांना अशक्य होईल. अशा परिस्थितीत वसाहतींना, विशेषत: भारताला स्वातंत्र्य देणे अपरिहार्य होते. महायुद्धातील जखमी सिंह महात्माजींनी जागे केलेल्या प्रजेला ताब्यात ठेवू शकत नव्हता.

## अभद्र वाणीच अवतरली

इंग्रजांचे राज्य संपल्याला आता पन्नास वर्षे झाली. नियतीला दिलेल्या वचनाची गोष्ट दूरच राहिली, सर्व जगात सर्वोच्च स्थानी आरुढ होण्याची स्वप्ने कधी साकारणे शक्यच नव्हते. उलट, गरीबीचा प्रश्न सुटला नाही, निरक्षरांची संख्या वाढली, महागाई, बेकारी यांनी थैमान घातले; नोकरशाही, काळाबाजार करणारे, तस्कर, गुन्हेगार यांचा अंमल चालू झाला; गुंड नेत्यांना हाती धरू लागले आणि नंतर नेत्यांना दूर करून स्वत:च राजकारणाच्या आखाड्यात उतरले. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या परदेशी झालेल्या प्रगतीमुळे देश निदान पोटापुरते अन्न पिकवू लागला. देवी, कॉलरा, मलेरिया, प्लेग अशा साथींच्या रोगांचे उच्चाटन झाल्यामुळे जीवनमान वाढले. मोठमोठ्या शहरांत कारखानदारी वाढली, पण इंग्रज राहिले असते तरी ती कारखानदारी उभी राहिली नसती, असे काही नाही. जगाच्या तुलनेने हिंदुस्थान स्वातंत्र्यानंतर पुढे प्रगती करून गेला नाहीच, उलट त्याची अधोगतीच झाली. पन्नास वर्षांपूर्वी भारताच्या तुलनेने मागासलेले इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड यांसारखे देश भारताच्या कितीतरी पुढे निघून गेले.

यासाठी जडजंबाल आकडेवारी दाखवण्याची काही गरज नाही. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा दरडोई उत्पन्न रु.२५० पेक्षाही कमी होते. आता हा आकडा रु. १२०००च्या आसपास आहे. ४७ सालच्या रुपयाच्या तुलनेने आजचा रुपया त्यावेळच्या ३ पैशाच्या बरोबर आहे हे लक्षात घेतले तर ५० वर्षांच्या काळात दरडोई उत्पादनात वाढ रु.२५० पासून रु.४०० पर्यंतच झाली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवारीनुसार रुपयाची क्रयशक्ती बघायची झाली तर अमेरिकेत १३४८ डॉलर देऊन जेवढे काही विकत घेता येईल तेवढेच आजच्या दरडोई रु. १२००० च्या मिळकतीत खरीदता येईल. बंगला देश ($ १३३१) आपल्या कांही फार मागे नाही. पाकिस्तान ($ २१५४) आपल्या बराच पुढे आहे. बराच म्हणजे जवळ जवळ ६० टक्क्याने पुढे आहे. चीन ($ २६०४), श्रीलंका ($ ३२७७), थायलंड ($ ७१०४), मलेशिया ($ ८८६५), कोरिया ($ १०६५६), सिंगापूर ($ २०९८७) हे सारे ५० वर्षांपूर्वी हिंदुस्थानच्या तुलनेने मागास असलेले देश भरधाव पुढे निघून गेले आहेत. युद्धात हारलेल्या देशांपैकी जपानचे दरडोई राष्ट्रीय उत्पादन ($ २१५८१) पर्यंत भिडले आहे; जर्मनी ($ १९६७५) आणि इटली ($ १९३६३) अशी नेत्रदीपक वाटचाल करुन गेले आहेत.

### काळ्या ढगांच्या रुपेरी कडा

प्रगती कोठे काही झालीच नाही असे नाही. आयुष्यमान जवळजवळ दुपटीने वाढले. स्वातंत्र्य आले तेव्हा देश दुष्काळाच्या जबड्यातच होता. तो अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला. ईशान्य सरहद्दीवरील काही हजार चौरस मैलांचा प्रदेश आणि पाकिस्तानने आक्रमण करून व्यापलेला काश्मीरचा भाग सोडल्यास इंग्रजांकडून विरासतीत मिळालेला प्रदेश सगळा संघराज्यात टिकला आहे. नियमितपणे निवडणुका होतात. लष्कराने बंडाळी करून कोणी सैनिकाने हुकूमशहा देशावर लादण्याचा प्रयत्नही केला नाही. इंदिराबाईंनी लादलेल्या आणीबाणीचा काळ सोडला तर प्रातिनिधिक लोकशाही अजून तरी मोडून पडलेली नाही.

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळाशी तुलना केली तर आणखीही काही चांगल्या गोष्टींचा उल्लेख करता येईल. गावागावात शाळा झाल्या, निरक्षरतेची टक्केवारी घटली हे खरे. शहरातील उच्च शिक्षणाच्या सोयी आणि संधी वाढल्या हेही खरे, पण त्याबरोबर एकूण निरक्षरांची संख्या कित्येक पटींनी वाढली. गावोगावी रस्ते झाले, एस.टी. झाली, टपाल कचेऱ्या झाल्या पण ग्रामीण भागाचे दारिद्र्य काही संपले नाही. हजारोंच्या संख्येने निर्वासित खेड्याकडून शहराकडे लोंढ्यांने वाहत जातात. मुंबई, दिल्लीसारखी शहरे अफाट फुगली; जिल्ह्याजिल्ह्याची शहरेही पसरत चालली. पूर्वी गरीबगुरीब शहरात गेले म्हणजे पत्र्याच्या किंवा सिमेंटच्या चाळीत रहात. आता ते झोपडपट्ट्यांत, गलिच्छ वस्त्यात किंवा फुटपाथवर राहू लागले. थोडक्यात, गेल्या ५० वर्षाचा इतिहास अभिमानाने सांगाव्या अशा गोष्टींनी भरलेला नाही.

स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरूंच्या प्रेरणेने देशाने समाजवादाची कास धरली. समाजवादी व्यवस्थेचाच नव्हे, तर विचारपद्धतीचाही जगभर पाडाव झाला. खुल्या व्यवस्थेची काही चर्चा झाली, पण ती थोडक्यात खुंटली. आता कोणत्या दिशेने पुढे वाटचाल करायची आहे हे सांगण्याच्या कुवतीचे देशात कुणीच राहिले नाही. स्वातंत्र्याच्या पन्नासाव्या वर्षी देश कधी नव्हे इतका भांबावलेल्या मन:स्थितीत, कधी नव्हे इतका आर्थिक संकटाच्या दरीवर उभा आहे.

❒ ❒ ❒



# आत्मपरीक्षण आणि आत्मवंचना

### उत्साह गेला कोठे?

स्वातंत्र्याचा महोत्सव साजरा करण्याची तयारी सुरू झाली, समित्या नेमल्या गेल्या. आणि खुद्द सत्तेच्या खुर्च्यांवर विराजमान झालेलेही स्वातंत्र्याचा सुवर्ण-महोत्सव साजरा करण्याबद्दल गोंधळलेल्या द्विधा मन:स्थितीत होते. पन्नास वर्षे झाली, प्रसंग साजरा करायला पाहिजे, पण साजरे नेमके काय करायचे हे कुणीच सांगू शकत नव्हते. आनंद साजरा करणे हा महोत्सवाचा एक हेतू, पण त्याबरोबर पन्नास वर्षांच्या या स्वातंत्र्याच्या कालखंडात आपण काय मिळवले यापेक्षा भारताची पिछेहाट का झाली, स्वप्ने अपुरी का राहिली याचा विचार अंतर्मुख होऊन करण्याची आवश्यकता आहे असा सगळ्यांचा सूर होता. ९ ऑगस्ट १९९७ रोजी महोत्सवाची सुरुवात मुंबईच्या ऐतिहासिक गोवालिया टँक मैदानावर करण्यात आली. १४ ऑगस्ट रोजी मध्यरात्री संसद भवनाच्या मध्य सभागृहात मोठा समारंभ करण्यात आला. वर्षभर काही ना काही कार्यक्रम चालू राहणार आहेत. वर्तमानपत्रे आणि प्रसार माध्यमे हे समारंभ प्रचंड उत्साहाने साजरे होत असल्याचे डिण्डिम वाजवीत राहणार आहेत. उत्सवाला सुरुवात होऊन अजून महिनाही झाला नाही, पण सगळ्यांना कळून चुकले आहे की हे सारे सोंग आहे. आम भारतीयांचे मन उत्साहाने उचंबळून आलेले नाही.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताची फाळणी झाल्याचे दु:ख होते. लक्षावधी निर्वासितांचे लोंढे देशाकडे येत होते. जातीय दंगलींतील क्रौर्यकथा मनाचा थरकाप करत होत्या. खुद्द महात्मा गांधी स्वातंत्र्यदिनाच्या जल्लोषापासून दूर, नौखालीच्या दंगलग्रस्त प्रदेशात वणवण फिरत होते. आणि तरीही, मुसळधार पावसाची तमा न करता कोट्यवधी नागरिक नव्या स्वातंत्र्याच्या स्वागताच्या आनंदात धुंद होऊन हर्षोल्लासात नाचत होते.

पन्नास वर्षांपूर्वीच्या त्या उत्साहाचा लवलेशही यंदाच्या सुवर्णमहोत्सवात दिसत नाही. पहिल्या स्वातंत्र्यदिनाचा सोहळा जनतेने केला. पन्नासाव्या स्वातंत्र्याचा उत्सव सारा सरकारी मामला आहे.

### जितके वैद्य तितकी निदाने

हे असे का झाले? स्वातंत्र्य का नासले? याचा उहापोह होत नाही असे

नाही. स्वातंत्र्यानंतर आलेल्या सत्तेचा लाभ ज्यांना मिळाला नाही अशी मंडळी अमुक करायला पाहिजे होते, तमुक व्हायला पाहिजे होते असे सांगत आहेत. कोणी म्हणतो लोकसंख्या आटोक्याबाहेर गेली म्हणून असे झाले. कोणी म्हणतो भ्रष्टाचार माजला, कोणी म्हणतो आपल्यात राष्ट्रप्रेमच नाही, देशाकरिता त्याग करण्याची तयारीच नाही म्हणून हे नासले.

देशात लोकशाही आणली हीच चूक झाली, आमच्या लोकांना हुकूमशाहीच सोसते, प्रौढ मतदानानेच सगळे वाटोळे केले; तर भाषावार प्रांतरचनेमुळे देश दुभंगला असा सूर कोणी धरतो. आमच्या पूर्वापारच्या परंपरा विसरलो, पश्चिमी देशांच्या निधार्मिकता, लोकतंत्र असल्या संकल्पना मानू लागलो म्हणूनच देशाचा अध:पात झाला असा काहींचा कोलाहल आहे. कोणी म्हणतो शाळा काढा; कोणी म्हणतो गरीबांचे भले करा, विषमता दूर करा. असा चारी बाजूला गोंगाट चालू आहे. जो तो शहाणपणाच सांगतो आहे.

पन्नास वर्षात बहुतेक काळ ज्यांनी सत्ता गाजवली ते काँग्रेसवाले 'आमच्या हातात सत्ता होती तोपर्यंत ठीक होते' असा कांगावा करीत आहेत. काँग्रेस राज्यात नेहरु-गांधी घराण्याच्या राजवटीत आखलेल्या धोरणांमुळे देशाचे वाटोळे झाले हे ते आपल्या तोंडाने थोडेच कबूल करणार आहेत? 'नेहरुंनी केले ते त्यांच्या काळी योग्यच होते; समाजवाद, नियोजन याखेरीज त्यावेळी देशाला पर्यायच नव्हता; त्याच दिशेने पुढे जाण्यासाठी, देश स्वावलंबी, सशक्त बनवण्यासाठी आता आर्थिक सुधारणा आणल्या जात आहेत' अशा तऱ्हेचा त्यांचा युक्तिवाद त्यांना स्वत:लाही पटत नाही, इतरांना समजण्याउमजण्याचा प्रश्नच नाही.

डावे पक्ष आणि जातीयवादी यांनी एक मोठी विचित्र आघाडी बांधली आहे. एका काळी समाजवादाच्या नावाखाली नेहरु ज्या धोरणांचा पाठपुरावा आणि समर्थन करीत त्याच धोरणांच्रा पुरस्कार एका काळी नेहरुंना विरोध करणारी ही मंडळी आता करत आहेत. कोणी जातीच्या नावाखाली, कोणी धर्माच्या नावाखली या बुडत्या घराचे काही वासे आणि विटा आपल्याला लाटता येतील का अशा चिंतेत आहेत.

## लोकसभेची खास बैठक

संसदेचे खास आत्मपरीक्षणाकरिता सत्र आता संपले आहे आणि एक भयाण दारुण सत्य सर्व जनतेपुढे आले आहे. पण देशाला नवी दिशा दाखवणारे नेतृत्व संसदेच्या सभागृहात येण्याची तिळमात्रही शक्यता नाही.

पन्नास वर्षांच्या अवधीत मिळालेल्या स्वातंत्र्याचे वाटोळे केलेला हा देश!



हे असे का झाले आणि यापुढे तरी कोणता वेगळा मार्ग स्वीकारायला पाहिजे यासंबंधी चर्चा करण्याचे भाग्य ५५० च्या वर खासदारांना लाभले. चर्चेच्या बहुतेक काळात बहुसंख्य खासदार कँटीनमध्ये होते. सभागृहात गणती फक्त पन्नासशंभरची राहिली. जे बोलले त्यांची इच्छा काहीतरी जबरदस्त, भारदस्त, ऐतिहासिक बोलण्याची होती. पण काय बोलावे याची पंचाईत. शाळकरी मुलांना स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांविषयी निबंध लिहून आणायला सांगितले असते तरी ते खासदारांच्या वक्तव्यांपेक्षाही उजवे झाले असते. भारताच्या अर्थव्यवस्थेवरील कोणत्याही क्रमिक पुस्तकात सहज उपलब्ध होणारी, शेकडो वेळा वापरून गुळगुळीत झालेली आकडेवारी आणि माहिती; आणि आपण काही भलेमोठे सांगत आहोत असा आवेश आणि दंभ ! लोकभेतील सर्व चर्चा अशी उथळ आणि हास्यास्पद झाली.

नाव आत्मचिंतनाचे आणि प्रत्यक्षात सगळा बकवास आपल्याआपल्या जुनाट कार्यक्रमांचा आणि पुढील निवडणुका नजरेसमोर ठेवून केलेल्या स्वस्त घोषणाबाजीचा अशी स्थिती. कोणी आपल्या मनातील आदर्श हिंदुस्थानच्या स्वप्नांची रसभरीत वर्णने केली, कोणी स्वातंत्र्य मिळूनही आपल्या समाजाला कसा न्याय मिळाला नाही याची रडकथा गाईली. कोणी यापुढे आपल्याला काय मिळाले पाहिजे याची यादी ठेवली. १ सप्टेंबर १९९७ रोजी संसदेचे लोकनायकत्व संपुष्टात आले.

## जो तो शहाणपण सांगतो

महोत्सवाच्या निमित्ताने अक्षरश: गल्लीपासून दिल्लीपर्यंत स्वातंत्र्याचा जमाखर्च मांडला जात आहे. लोकसभेने विशेष सत्र घेऊन स्वातंत्र्यानंतर काय कमावले आणि काय गमावले या विषयावर चर्चा घडवून आणली. गावोगावच्या सार्वजनिक संस्था, व्यापारी/कारखानदाराच्या संघटना, अगदी शाळाकॉलेजांतील अभ्यास मंडळेसुद्धा स्वातंत्र्याचा जमाखर्च मांडण्यासाठी भाषणे ठेवीत आहेत; चर्चासत्रे, कार्यशाळा भरवीत आहेत. स्वातंत्र्यानंतर झालेल्या चुका कोणत्या? याचा शोध घेण्यासाठी ५० वर्षांच्या काळातच सत्तेवर असलेल्या नेत्यांना पाचारण करण्यात येत आहे; सध्या खुर्चीवर असलेल्या पंतप्रधान, मंत्रीगण यांनाही भरपूर मागणी आहे. नियोजकांचा हेतू आत्मपरीक्षणापेक्षा सत्तेशी संपर्क साधण्याचा आहे, हे स्पष्ट आहे.

सर्व वर्तमानपत्रांनी १५ ऑगस्ट १९९७ च्या आसपास विशेषांक काढले. स्वातंत्र्यानंतरची कामगिरी फारशी स्पृहणीय नाही याविषयावर सगळ्यांचे एकमत आहे. परंतु, स्वातंत्र्याचे स्वप्न कुठे भरकटले या विषयावर जितके लेखक तितकी मते असा

प्रकार आहे. झाले गेले जाऊ द्या, यापुढे काय करायला पाहिजे याही विषयावर काहीच समान सूर उमटला नाही. देशात सगळीकडे भ्रष्टाचार माजला आहे, हा भ्रष्टाचार दूर झाला म्हणजे सगळे काही ठीक होईल एवढाच काय तो एक मुद्दा या विषयावर बोलणाऱ्या, लिहिणाऱ्या सगळ्यांमध्ये समान सापडतो.

संसदेपासून गावगन्ना सम्मेलनांपर्यंत आजपावेतो झालेल्या चर्चा अगदीच निकृष्ट आणि सामान्य झाल्या आशीच सर्वांची प्रतिक्रिया आहे. म्हणजेच, स्वातंत्र्याचा जमाखर्च अजून नेटका मांडला गेलेला नाही याची जाणीव सगळ्यांना आहे. पण जमाखर्च मांडताना नेमकी चूक कोठे होते आहे हे काही केल्या उमजत नाही.

## दुसरे गणराज्य पाहिजे

दिल्लीची आजची अवस्था औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच्या दिल्लीच्या सत्तेसारखी झाली आहे. कोण शाहजादा येतो आणि तख्तावर बसतो याला काहीच महत्व राहिले नाही. तख्तावर कोणी देवेगौडा बसला तर त्याला युगपुरुष संबोधून जयोऽस्तुते करणाऱ्या भाटांनी दरबार भरून गेले आहेत.

स्वातंत्र्य महोत्सवाच्या पन्नासाव्या वर्षी एकच गोष्ट स्पष्ट आहे : १५ ऑगस्ट १९४७ रोजी उजाडलेले, १९५० साली घोषित झालेले भारताचे पहिले गणराज्य संपुष्टात आले आहे.

या गणराज्याच्या पद्धतीने देश पुढे चालणारही नाही; विकासाचा प्रश्नच बाजूला राहिला. आता दुसरे गणराज्य उभे करावे लागेल. त्यासाठी दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई द्यावी लागेल.

दुसरे गणराज्य, दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई हे शब्द संसदेच्या सभापतींनी २६ ऑगस्ट १९९७ रोजी सुरू झालेल्या संसदेच्या एका विशेष सत्रात वापरले. हे शब्द शेतकरी संघटनेच्या पाईकांच्या परिचयाचे आहेत. गेली सतरा वर्षे शेतकरी संघटनेचा सारा विचार ४७ च्या स्वातंत्र्याचे मिथ्यापण आणि नव्या खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याची आवश्यकता सांगणारा आहे.

दुसरे गणराज्य उभे करणे याचा अर्थ घटनेमध्ये छोटेमोठे फेरफार करणे इतका मर्यादित नाही. घटनेतील तरतुदींत व्यापक बदल घडवून आणणे आवश्यक आहे अशी घोषणा ९८ साली सत्तेवर आलेल्या भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी उघडपणे केली आहे. लोकसभा पद्धतीऐवजी अमेरिकेच्या धर्तीवर राष्ट्रपतीप्राधान्याची व्यवस्था आणावी अशी मागणी खुद्द कॉंग्रसी नेत्यांनीच सुरू केली. निवडून गेलेल्या प्रतिनिधींना मागे



बोलावण्याचा हक्क लोकांना देण्यात यावा, मागासवर्गीयांना पुरेपूर प्रतिनिधीत्व मिळावे, महिलांना मोठ्या संख्येने कायदेमंडळात सामावून घ्यावे इ.इ. प्रकारे अनेक भाबडे, घटना दुरुस्ती म्हणजे काही जादूची कांडी आहे अशा थाटात सूचना मांडतात.

घटना, म्हटले तर प्रचंड सामर्थ्यांचा स्रोत आहे; म्हटले तर निव्वळ कागदांचा गठ्ठा आहे, कायदा व सुव्यवस्था कोसळी असली, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज यांच्या विषयीदेखील बीभत्स भाषा खुलेआम वापरली जाण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली असली तर घटनेतील तरतुदी बदलून कांही फरक थोडाच पडणार आहे? घटनेतील तरतुदी काही फार महत्त्वाच्या आहेत असे दिसत नाही. गेल्या ५० वर्षात सगळ्यात वाटोळे कुणी केले असेल तर ते नियोजन समितीने. आज सर्व मंत्रालयांना व्यापून दशांगुळे उरलेल्या नियोजन समितीचा संविधानात उल्लेखदेखील नाही. संविधानातील तरतुदींनी कोठे अडथळा आला असे झालेले नाही आणि त्यातील कोणतेही कलम बदलले तर अडथळा आणणारा बांध फूटून प्रगतीचा लोंढा भरधाव वेगाने वाहू लागणार आहे असेही नाही.

## आत्मचिंतनाची दाहकता

इंग्रज या देशातून निघून गेल्याला पन्नास वर्षे पुरी झाली. त्यानिमित्ताने स्वातंत्र्य चळवळीच्या प्रकृतीचा आणि स्वातंत्र्योत्तर काळातील सत्ताधिशांच्या प्रेरणांचा शोध घेऊन स्वातंत्र्य का नासले आणि पहिले गणराज्य का कोसळले यासंबंधी काही स्पष्ट विचार परखडपणे मांडणे निकडीचे झाले आहे.

आत्मचिंतन ही काही सोपी गोष्ट नाही. अंतर्मुख होणे, स्वतःच्या चुका कबूल करणे याला मोठा जबरदस्त प्रामाणिकपणा लागतो आणि मनाची ताकद लागते.

देशाच्या आजच्या दारुण अवस्थेत अत्यंत गांभीर्याने, साकल्याने विचार होणे आवश्क आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांत देश घसरणीला लागला; हे असे का झाले? गांधीसारख्या महात्म्याचा वारसा लाभलेला हा देश महात्माजींच्या शिष्योत्तमांचे नेतृत्व मिळूनही अधोगतीस का गेला? स्वातंत्र्याच्या आंदोलनात हसत हसत बलीदान देणाऱ्यांचे हौतात्म्य मातीमोल का झाले? स्वातंत्र्ययुद्धातील सैनिक इतक्या सहज देशबुडवे भ्रष्ट का बनले?

## निदान व्यापक पाहिजे

कोणी म्हणतात अधिक लोकशाही हवी; कोणी हुकुमशाही हवी म्हणतात. कोणी विकेंद्रीकरण मागतो; कोणी मजबूत केंद्र हवे म्हणतो. काहीजण तर भाषावार प्रांतरचनेने सारे नासले म्हणतात. पराकोटी म्हणजे, वयांत आलेल्या सर्वांना मतदानाचा हक्क दिल्यामुळे सारे बिघडले असे म्हणणारेही कमी नाही.

स्वातंत्र्याच्या जमा-खर्चाच्या चर्चेत काही गोष्टी मोठ्या चमत्कारिक, परस्परांना छेद देणाऱ्या मांडल्या जात आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले; रस्ते, वाहतूक, पाणी, उर्जा, आर्थिक सेवा इत्यादीचा पाया नीट घातला गेला नाही; गरीबांकडे दुर्लक्ष झाले; मागासवर्गीयांची उपेक्षा झाली अशी निदाने अनेकांनी केली; यापुढील काळात हे एवढे दोष दूर केले पाहिजेत असेही आग्रहाने मांडले.

संसदेत आणि इतरत्र झालेली निदाने आणि विश्लेषणे म्हणजे अनेक व्याधींनी जर्जर झालेल्या मरणासन्न रोग्याबाबत सर्दीखोकल्याचे निदान करण्यासारखे आहे. या निदानात आणि औषधोपचारात काही थोडेफार तथ्य आहे, पण सगळ्या रोगव्याधींची यादी लक्षात घेऊनही प्राण कंठाशी का आले आहेत याचा खुलासा झाला नाही असे वाटत राहते; शिक्षण, निविष्ठा, सामाजिक विकास इत्यादी प्राथमिक गोष्टी यांकडे दुर्लक्ष झालेच का आणि कसे याचा बोध होत नाही. हे दुर्लक्ष नसते तर देशाची आजची भयानक स्थिती टळली असती काय? आणि शेवटी हे दोष दूर केले तर देश प्रगतीच्या मार्गावर चालू लागेल काय? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशीच मिळतात. स्वातंत्र्याचा जमाखर्च मांडणाऱ्यांनी केलेले रोगाचे निदान आणि उपाययोजना तोकडी आहे, त्यावरून आजची परिस्थिती खरीखुरी समजायला मदत होत नाही; आणि यापुढच्या वाटचालीचा मार्गही स्पष्ट होत नाही.

## अपराध्यांची तरफदारी नको

जमाखर्चाच्या खटाटोपातील आणखी एक विचित्र गोष्ट. स्वातंत्र्यानंतर भल्या घोडचुका झाल्या हे सर्वमान्य, पण स्वातंत्र्याच्या काळात जे सत्तेवर होते आणि ज्यांच्यावर स्वातंत्र्यानंतरच्या घसरगुंडीची जबाबदारी आहे ते मात्र सर्व महापुरुष आणि देवतासमान! त्यांच्यावर मात्र टीका करण्याचा सूरही निघत नाही. स्वातंत्र्याच्या ५० वर्षांत देशाचे वाटोळे झाले, पण ५० पैकी ३८ वर्षे राज्य करणारे नेहरू घराणे मात्र परम आदरणीय, परम कर्तबगार, परम सच्छील; आणि यापुढेही जायचे ते पंडित नेहरू, इंदिरा गांधी



आणि राजीव गांधी यांनी दाखवलेल्या दिशेनेच. (मृतांबद्दल वाईट न बोलण्याची भारतीय परंपरा आहे असा खुलासा पटणारा नाही. खुद्द महात्मा गांधीबद्दल वाट्टेल तितके घाणेरडे बोलले जाते. 'हरिजन' शब्द वापरणे दुष्कर झाले आहे पण सत्ता उपभोगलेल्या नेहरु घराण्याबद्दल मात्र अवाक्षर काढायचे नाही.) यात जमाखर्च मांडणाऱ्यांचा अप्रामाणिकपणा तरी असावा किंवा गंभीरपणे जमाखर्च मांडण्याचा त्यांचा वकुबच नाही, हे स्पष्ट होते.

## सारी शोकांतिका स्वातंत्र्योत्तर काळांतलीच?

स्वातंत्र्यानंतर कमावले काय, गमावले काय? याबद्दल लिहिणारे-बोलणारे सारे आणखी अशुद्ध तर्क बांधतात. अध:पात काय झाला तो स्वातंत्र्य मिळाल्यानंतर; भारतीय स्वातंत्र्याची चळवळ ही महात्मा गांधीच्या थोर तत्वांनुसार चाललेली चळवळ होती. देशातील सर्व जनतेने महात्मा गांधींच्या नेतृत्त्वाखाली निकराने झुंज दिली, कष्ट सोसले, त्याग केला, प्रसंगी बलिदानही केले आणि त्यामुळे इंग्रजांना स्वातंत्र्य देणे भाग पडले. त्यानंतरच्या काळात स्वराज्याच्या आंदोलनाच्या तत्वांना ग्रहण लागले आणि देशाची अधोगती सुरू झाली. थोडक्यात, १५ ऑगस्ट १९४७ च्या म्हणजे स्वातंत्र्यदिनाच्या आधी सगळेच काही भव्यदिव्य, उदात्त होते आणि सगळे काही नासले ते त्यानंतर, असे हे तर्कशास्त्र आहे.

ही मांडणी चुकीची आहे हे उघड आहे. स्वातंत्र्यानंतर जे काही घडले त्याची बीजे सूक्ष्म रूपाने का होईना, स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळातही असली पाहिजेत.

या घसरगुंडीची सुरुवात स्वातंत्र्यानंतरच झाली हे खरे काय? पंडित नेहरू तर गांधीजींचे सर्वात लाडके शिष्य व राजकीय वारसदार. स्वातंत्र्यानंतर सतत सतरा वर्षे ते स्वत:च पंतप्रधान होते. त्या काळात तरी देशाची भरभराट व्हायला पाहिजे होती. ती का झाली नाही? या सर्व प्रश्नांवर कठोरपणाने आत्मचिंतन करावे लागेलच, पण तेवढ्याने भागणार नाही. स्वातंत्र्य नासले त्याची कारणे स्वातंत्र्य प्रत्यक्ष हाती येण्याआधीच्या काळात सापडतात काय याचाही विचार करायला लागेल. स्वातंत्र्य नासले याची कारणे स्वातंत्र्योत्तर काळातच नाही, स्वातंत्र्य नासल्याची कारणे स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या कालखंडातही शोधावी लागतील. ज्यांना राष्ट्रपिता मानले, ज्यांना देशाचे लाडके जवाहर मानले त्या सगळ्यांची कामगिरी आणि स्वातंत्र्य आंदोलनाची प्रेरणाच मुळात खोटी होती असे दिसून आले तर जराशीही कां कूं न करता त्या विदारक सत्याला सामोरे जाण्याची तयारी असेल तरच याविषयीचे खरेखुरे आत्मचिंतन होऊ शकते.

मुळात स्वातंत्र्य आंदोलनाची प्रेरणाच खोटी आणि अप्रामाणिक असेल तर अशा अशुद्ध बीजापोटी अ-गोमटी फळे यावीत हे समजण्यासारखे आहे. जर स्वातंत्र्य आंदोलन प्रामाणिक होते अशी खात्री पटली तर मग स्वातंत्र्यानंतर नेमके काय बिघडले. कोण्या अधमाने स्वातंत्र्य आंदोलनातील हुतात्म्यांचे बलिदान व्यर्थ ठरवण्याचा घाट घातला आणि तडीस नेला त्याच्या शोधात जावे लागेल. गांधीही ठीक, नेहरूही ठीक, त्यांच्या आधीचे गोखले, टिळक हेही थोर, तरीदेखील स्वातंत्र्य नासले अशा तऱ्हेचा युक्तिवाद आणि तर्क हा बुद्धीचा व्यभिचार ठरेल.

❑ ❑ ❑



# स्वराज्य आंदोलनातील विविध प्रवाह

गांधीजी आणि काँग्रेस यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याचा लढा झाला हे खरे. परंतु स्वातंत्र्याच्या लढ्यात दुसरे काही प्रवाहच नव्हते आणि सर्व वर्ग जातींचे यच्चयावत् समाज गांधीप्रणित काँग्रेसच्या झेंड्याखाली लढ्यास ठाकले होते असे म्हणण्यास काही ऐतिहासिक आधार नाही. पारतंत्र्य, गुलामी ही लाजिरवाणी, अपमानास्पद गोष्ट आहे; आपल्याच देशावर लांबून आलेल्या परकीयांचे राज्य असावे ही काही फारशी स्पृहणीय गोष्ट नाही; राजकीय दास्यामुळे देशाचे आर्थिक शोषण होत आहे आणि देश कंगाल बनत चालला आहे. स्थूलमानाने एवढ्याच विषयावर सगळ्या देशात सहमती होती. पण स्वातंत्र्यालढ्याची उद्दिष्टे काय, साधने काय, कार्यक्रम काय, वेळापत्रक काय याबद्दल स्वातंत्र्याच्या चळवळीत अनेक मतप्रवाह होते.

## जहाल 'राष्ट्रीय'

इंग्रजाचे वर्चस्व सर्व देशभर प्रस्थापित झाल्यानंतर सार्वभौमत्व गमावलेले संस्थानिक, नव्या सरकारी न्याय महसूल व्यवस्थेने बांधले गेलेले जहागीरदार-जमीनदार, कायद्याचे राज्य तयार झाल्यामुळे नाखूष झालेले ठग आणि पिंढारी, थोडक्यात इंग्रज येण्यापूर्वी ज्यांचा अंमल देशावर चालला होता असे सर्व घटक आणि त्यांच्यावर अवलंबून असलेली सरदारदरकदार जातिबांधवे आणि आश्रित मंडळी यांची इंग्रजविरोधी भावना अत्यंत तीव्र होती. इंग्रज आल्यामुळे आपल्या हातातील सत्ता गेली याचे त्यांना परमदुःख होते आणि इंग्रजांना कोणत्या का प्रकाराने होईना, देशातून काढून लावता आले तर, राजकीय सत्तेचा वारसा पेलू शकणारे या देशात दुसरे कोणीच नसल्यामुळे आपणच पुन्हा सर्वसत्ताधीश बनू अशी त्यांना मोठी आशा होती. देश गुलाम का झाला? समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान या सर्वच क्षेत्रांत आपण इतके मागासलेले का राहिलो? हे प्रश्नही त्यांना अप्रस्तुत वाटत होते. अपण सर्वार्थाने सर्वच दृष्टींनी श्रेष्ठ, सदाकाळ श्रेष्ठ होतो आणि आहोत; केवळ दुर्भाग्याने किंवा चक्रनेमिक्रमाने आपल्याला वाईट दिवस आले आहेत; इंग्रज येथून निघून गेले की सर्व दुर्भाग्य संपेल अशी या मंडळींची बुद्धी. १८५७ च्या बंडाचा उठाव प्रामुख्याने या समाजाने केला. बंडाला सर्वसाधारण जनतेचा पाठिंबा तर नाहीच, सहानुभूतीदेखील नव्हती. त्यामुळे, या सरंजामी

लोकांचीही एकजूट होऊ शकली नाही. इंग्रजांना काढून लावले तर नंतर आपल्या पैकी कोणाच्या हाती सत्ता जाईल काय सांगावे ? त्यापेक्षा, 'खाविंद चरणारविंदी मिलिंदायमान' होण्याचा मार्ग अनेकांना प्रशस्त आणि श्रेयस्कर वाटला. सहाजिकच, बंडाचा बीमोड झाला. पण, या बंडाचा धसका इंग्रजांनी इतका जबरदस्त घेतला की भारतीय समाजव्यवस्थेत हस्तक्षेप न करण्याचे आश्वासन खुद्द राणीच्या जाहिरनाम्याने दिले. कंपनी सरकारने दलित आणि मागासवर्गीय जातींना प्रोत्साहन देऊन ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्गांचे वर्चस्व जाणीवपूर्वक कमी करण्याचे धोरण चालवले होते. 'सती'सारख्या प्रथा मोडून काढण्यात कंपनी सरकार व तिचे अधिकारी मोठ्या उत्साहाने जुटत. राणीच्या जाहिरनाम्याने ते धोरण संपवून फक्त तटस्थ तत्त्व लागू झाले. देशातील समाजव्यवस्थेत मागासवर्गीयांना उठून उभे राहता येईल इतकीही ढवळाढवळ न करण्याचे ठरले म्हणजे जुन्या सवर्णांना आणि धनदांडग्यांना रानच खुले झाले. इंग्रजी अंमल परंपरागत समाजव्यवस्थेच्या उतरंडीला अनुसरूनच म्हणजे सवर्णांच्या माध्यमातूनच होणार होता. दोनचार पुस्तकांचा अभ्यास करून इंग्रजी अंमलाखाली नोकरदारी गाजवण्याची शक्यता तयार झाली. मुंबई-कलकत्त्यासारख्या शहरात नव्याने सुरू झालेल्या व्यापार, गिरण्या यांनीही काहींना सामावून घेतले. इंग्रजी राज्यात मिळालेल्या या फायद्यांनी समाधान न झालेले असेही अनेक होते. या असंतुष्ट सवर्ण समाजातूनच बॉंब-पिस्तुल यांचे पंथ निघाले. समाजसुधारणेला हात न लावता राजकीय सत्तेचाच पाठपुरावा करण्याचा आग्रह धरणारे जहालपंथी याच परंपरेतले. अर्थकारण, समाजकारण सर्व बाजूला ठेवून राष्ट्रवादाचा उदोउदो करावा व या घोषांनी बहुजन समाजाला त्यांच्यावरील अन्यायाचा आणि शोषणाचा विसर पाडावा अशी राष्ट्रवादी परंपराही याच प्रवाहातून पुढे प्रकटली. आर्यसमाज, विवेकानंद, हेडगेवार, हिंदुमहासभा, जनसंघ आणि अलिकडची भारतीय जनता पार्टी व शिवसेना, विश्व हिंदू परिषद इत्यादी याच सरंजामी जहाल राष्ट्रवादी परंपरेतील पिलावळ.

## शहरी काळे इंग्रज

इंग्रजी अमलाचा जाच होणारा आणखी एक वर्ग होता. इंग्रजी अमलात इंग्रजी शिक्षणाचा, तंत्रज्ञानाचा, व्यापार-व्यवस्थेचा, कारखानदारीचा फायदा घेऊन आपले बस्तान ठाकठीक बसवलेला एक मोठा वजनदार समाज मुंबई, कलकत्ता, मद्रास अशा मोठमोठ्या शहरात उदयास येत होता. इंग्रजी राज्य नष्ट व्हावे, इंग्रजांनी संपूर्ण स्वराज्य देऊन या देशातून चालते व्हावे हे संभव नाही, फारसे आपल्या हिताचेही नाही. इंग्रजी राज्य हे एक वरदान आहे. त्यामुळे देशात शांतता, सुव्यवस्था, न्याय, व्यापारउदीम



यांचे राज्य येत आहे याचा या वर्गाला प्रामाणिक संतोष वाटत होता. इंग्रजी राज्य संपवण्याने वा बॉंबपिस्तुलाचा दहशतवाद पसरण्याने या समाजाचे काहीच भले साधण्यासारखे नव्हते. इंग्रजी वेष परिधान करून गव्हर्नरच्या दरबारी किंवा कलेक्टरच्या घरच्या मेजवानीस निमंत्रण आले की सर्व पितर स्वार्गात गेल्याची कृतकृत्यता मानणारी ही आंग्लविद्याविभूषित मंडळी. यांचे मागणे लई नव्हते. आय्.सी.एस्. परीक्षेत भारतीयांना अधिक जागा द्याव्यात, त्यांच्यासाठी वयाची अट ढिली करावी. परीक्षेत बसणे अधिक सोपे व्हावे यासाठी हिंदुस्थानातही परीक्षा घेतली जावी, कर कमी करावेत, आयातीवरील जकात वाढवावी, लष्करावरील खर्च कमी करावा, लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जबाबदार कायदेमंडळांची स्थापना करावी; थोडक्यात, इंग्रजी सत्तेच्या छत्राखालीच वाढती सत्ता संपादन करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा हा वर्ग होय.

या वर्गातूनच कॉंग्रेसचा जन्म झाला. लोकांचे प्रतिनिधित्व करणारी अशी एक संस्था असावी या कल्पनेला खुद्द गव्हर्नर जनरल साहेबांचीही सहानुभूती होती. दरवर्षी नाताळच्या सुट्टीत कोणत्यातरी मोठ्या शहरी जमावे, अस्खलित इंग्रजी, सुटाबुटातील विद्वानांनी वक्तृत्व गाजवावे, सरकारकडे शिफारशी पाठवाव्यात, हळूहळू लोकांच्या प्रतिनिधित्वावर, अनौपचारिक का होईना, हक्क सांगणारी एक प्रतिनिधी संस्था उभी रहावी असा कॉंग्रेसचा मवाळ कार्यक्रम.

देशांत विरोधी पक्षाचे काम करणारा एक मंच असावा ही गोष्ट व्हाईसरॉय साहेबांनाही मान्य होती. कॉंग्रेसने मंजूर केलेल्या काही शिफारशी सरकार अंमलातही आणत होते, पण लवकरच कॉंग्रेसच्या प्रातिनिधिक स्वरूपाबद्दल आणि उपयुक्ततेबद्दल मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. बहुसंख्य रयतेच्या इच्छाआकांक्षा, तसे पाहिले तर मवाळांच्या कार्यक्रमाशी अधिक जुळणाऱ्या होत्या. इंग्रज अमलात बलुतेदारी बुडाली, शेतीवर टाच आली, राजसत्ता आणि धनसत्ता यांपासून वंचित होऊनही भटशाही माजली. त्यांनी जन पिडले होते. पण तातडीने इंग्रज निघून जावेत यात मवाळांप्रमाणे बहुजन समाजाला काही विशेष स्वारस्य नव्हते. पण मवाळ नुसतेच सभा, परिषदा भरवायचे. जहाल काहीबाही खटाटोप करीत सरकारविरुद्ध धीटपणे उभेतरी रहात, लिहीत बोलत. जहालांना बहुजन समाजात वाढती सहानुभूती मिळू लागली. सवर्ण सरंजामी नेते तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हणून लोकमान्य होऊ लागले. खुद्द कॉंग्रेसमध्येही जहाल आणि मवाळ यांची साठमारी होऊ लागली. मवाळांचा कार्यक्रम थोड्याफार फरकाने इंग्रजी सत्तेत मान्य होण्यासारखा होता. याउलट, सर्व जहाल चळवळ सर्व मार्गांनी मोडून काढण्याचा त्यांचा निर्धार होता आणि तरीही जहालांची लोकप्रियता वाढत होती. जहाल काय

आणि मवाळ काय, दोन्ही फारतर लोकसंख्येच्या ५% लोकांचे प्रतिनिधित्व करणारे यापेक्षा जास्त नाही.

## बहुजन समाजाचे काय?

देशातील बहुजन समाजाचा कोणी ना त्राता, ना नेता. जातिव्यवस्थेच्या चक्रात पिढ्यान्‌पिढ्या भरडला गेलेला हा समाज इंग्रजी सत्तेच्या काळात आपली गुलामगिरी संपेल आणि थोडे बरे दिवस येतील, बहुजन समाजाला विद्या मिळाली तर इंग्रजी अंमलात ते सुखी होतील अशा आशेत होता. १८५७ च्या बंडानंतर राणीच्या जाहिरनाम्यात परंपरागत जातिव्यवस्थेच्या उतरंडीस जीवदान मिळाले. भटशाही इंग्रजी राज्याचे महत्त्वाचे अंग बनले. शेतीवरील कर आणि इंग्रजी व्यापारामुळे उद्‌ध्वस्त होणारे गावोगावचे बलुतेदार यांना वाली कोणीच राहिला नाही. या समाजाची राजकीय भूमिका काय होती? इंग्रजांचे राज्य म्हणजे काही अनंत काळ टिकायचे नाही. आज ना उद्या त्यांना येथून जावेच लागेल; पण, इंग्रजी अंमलाच्या रूपाने येथील शूद्रातिशूद्रांस विद्येचे दरवाजे उघडे होत आहेत. जातिव्यवस्था मोडली पाहिजे, विषमता संपली पाहिजे तरच लोकांचे एकमय राष्ट्र तयार होईल आणि त्यानंतरच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीला सुरुवात होईल, तोपर्यंत केवळ 'नॅशनल कॉंग्रेस' म्हटल्याने काही 'राष्ट्र' तयार होत नाही, परंपरागत सवर्ण समाजाच्या म्होरक्यांनी चालवलेल्या जहाल आणि मवाळ दोन्ही स्वातंत्र्यचळवळींबद्दल बहुजनसमाजास अपुलकीची भावना असण्याचे काहीच कारण नव्हते. ही भटांची पोरे विनाकारण शूद्रातिशूद्र मुलांच्या मनांत इंग्रजांविषयी अप्रीती निर्माण करून, त्यांच्या हाती पिस्तूल-बॉंब देऊन त्यांना चुकीच्या मार्गास लावतात, अशा मार्गांनी स्वराज्य मिळणे नाही आणि मिळाले तरी तो जुन्या पेशवाईचा नवा अवतार असेल, त्यात बहुजन समाजाला विकासाचे आणि प्रगतीचे मार्ग बंदच राहातील अशी बहुजनसमाजाच्या धुरीणांची स्पष्ट भूमिका होती.

जोतिबा फुल्यांनी सत्यशोधक समाजाच्या साहित्यात हा विचार स्पष्टपणे मांडला. इंग्रजी राज्य हे हिंदुस्थानला मिळालेले 'ईश्वराचे अतर्क्य वरदान' आहे असे मानणाऱ्या नेमस्तांचीही भूमिका अशीच होती. समाजसुधारणा की राजकारण या टिळकआगरकरी वादातही मूळ सूत्र तेच आहे. पुढे आंबेडकरी दलित चळवळीतही तथाकथित राष्ट्रीय चळवळीच्या सवर्ण धुरीणांच्या खऱ्याखुऱ्या हेतूंविषयी जबरदस्त संशय आढळून येतो. अलिकडे, अरुण शौरी यांच्या लिखाणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या काळात इंग्रजांना सोयीस्कर अशी भूमिका घेत असल्याबद्दल टीका आढळते.



बाबासाहेबांचे अनुयायी त्या टीकेचा निषेध करतात. यातच बाबासाहेबांच्या चळवळीचा पराभव आहे. जातिव्यवस्था समूळ नष्ट होईपर्यंत होणारी स्वातंत्र्याची धडपड ही खरीखुरी राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ असूच शकत नाही. गोऱ्या इंग्रजांच्या हातातील सत्ता थोडीफार आपल्याही हाती यावी याकरीता एतद्देशीय प्रतिष्ठितांनी मांडलेला हा खेळ आहे अशीच १९३६ सालापर्यंततरी बहुजन समाजाची भूमिका होती. आणि यात शरम वाटण्यासारखे काहीच नव्हते आणि नाही. महात्मा फुले यांनी ही भूमिका स्वच्छपणे मांडली आंबेडकरवादी महात्मा फुल्यांशी नाते सांगतात, पण बाबासाहेबांचा स्वातंत्र्य आंदोलनाचा मार्ग टिळक नेहरु यांच्यापेक्षा अलग असल्याचे नाकारतात हे बाबासाहेबांचे दुर्दैव आहे.

## गांधीजीचा प्रवेश

लोकमान्य टिळकांना मंडालेच्या कारागृहाची शिक्षा झाल्यानंतर जहाल चळवळ मोडीत निघाल्यातच जमा होती, पण मवाळ चळवळीस जहालांच्या घसरगुंडीचा काही लाभ मिळत नव्हता. जहाल आणि मवाळ दोघेही बाजूस सरून बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारे स्वातंत्र्याचे एक नवे आंदोलन उभे राहण्याची शक्यता तयार होत होती.

एवढ्यात महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून हिंदुस्थानात परतले. स्वातंत्र्याच्या आंदोलनासाठी त्यांनी नवीन संस्था काढली नाही, कॉंग्रेसमध्येच प्रवेश केला. सूटबूटधारी कॉंग्रेसजनाच्या सम्मेलनात मोहनदास करमचंद गांधी उभे राहिले. इंग्रज शासनाच्या न्यायप्रियतेवर विश्वास ठेवून भारतीय परंपरा आणि अध्यात्म, सत्य आणि अहिंसा यांच्या आधाराने स्वातंत्र्य चळवळीची बांधणी, पण त्याबरोबरीनेच समाजसुधारणेच्या आणि बहुजन समाजाच्या आर्थिक हिताच्या कार्यक्रमांचा आग्रह या गांधीप्रणालीने देशात मोठे चैतन्य निर्माण केले. जहालांची सद्दी संपली आणि कॉंग्रेस आंग्लवेषभाषा-विभूषितांची परिषद न राहता एक आंदोलन बनले. गांधींच्या आगमनाने कॉंग्रेस तरारून उठली, बहरली, फोफावली आणि विस्तारली. सवर्ण चळवळीच्या धाकट्या नेमस्त पातीचा विजय झाला. जहाल मिटले, मवाळ बाजूस झाले. गांधीजींच्या आध्यात्मिक सत्याग्रही आंदोलनाने बाजी मारली.

पण ही सारी उच्चभ्रू समाजातीलच द्वंद्वे. गांधीच्या प्रभावामुळे बहुजन समाजाच्या चळवळी निष्प्रभ झाल्या आणि मावळत चालल्या. सरदार वल्लभभाई पटेल इत्यादींच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसने शेतकऱ्यांत जागृती निर्माण केली. कॉंग्रेस आदिवासीपर्यंत पोहोचली.

अखेरीस, बहुजन समाजाची स्वतंत्र चळवळ चालू ठेवणे अशक्य झाल्यामुळे बहुजन समाजाचे नेते फैजपूर काँग्रेसमध्ये स्वतंत्रता चळवळीच्या राष्ट्रीय प्रवाहात सामील होऊन गेले. स्वतंत्रता चळवळीच्या या गांधीप्रणित मध्यप्रवाहात दोन समाज शेवटपर्यंत एकजीव होऊ शकले नाहीत. बहुजन समाजाचे खानदानी नेते काँग्रेसमध्ये जाऊन मिळाले तरी शूद्रातिशूद्रांच्या चळवळीचे बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेते काँग्रेसी मध्य प्रवाहापासून दूर राहिले, एवढेच नव्हे तर, वेळोवेळी काँग्रेस आणि दस्तुरखुद्द महात्माजींशीही वादविवाद आणि संघर्ष करत राहिले. गांधीवादी चळवळीबद्दल मुसलमान समाजाच्या मनातही खोलवर रूजलेल्या गंभीर शंका होत्या. तो समाजही बहुसंख्येने स्वातंत्र्याच्या चळवळीपासून दूर झाला. त्याची परिणती देशाच्या फाळणीत आणि पाकिस्तानच्या निर्मितीत झाली.

१९३० सालचा सत्याग्रह अयशस्वी झाला. प्रतिकात्मक सत्याग्रह, विधायक कार्यक्रम अशा सव्यापसव्यात काँग्रेस कार्यकर्त्यांना गुंतवून ठेवून एका तऱ्हेने गांधीजी खंदकात, काही नवीन दिशा दिसण्याची वाट पाहात होते. याच काळात समाजवादी विचाराचे झंझावात सुटले आणि बहुजन समाजातील प्रश्नांची तड समाजवादी विचारधारा आणि कार्यक्रम यांच्या आधाराने लावू पाहणारे एक नवीन नेतृत्व उदयास येऊ लागले. दुसऱ्या महायुद्धाचे ढग जमू लागले. महायुद्ध पेटले. त्यांत इंग्रजांना विजयही मिळाला, पण त्या प्रयासात साम्राज्याच्या सिंहाची कंबर मोडली. भारतातील साम्राज्य आता भारतीय भद्र लोकांच्या माध्यमातून चालवता येणार नाही हे स्पष्ट झाले. साम्राज्य चालू ठेवायचे तर लाखोंच्या संख्येने इंग्रजी प्रशासक व लष्कर येथे खडे ठेवावे लागेल, आणि तरीही एवढी जबरदस्त किंमत देऊनही साम्राज्य फार काळ टिकणार नाही, हे स्पष्ट झाले. इंग्रजांनी देश सोडून परत जाण्याचे ठरवले.

सत्तांतराच्या वेळी बहुसंख्य जनतेची प्रतिनिधी म्हणून मान्यता काँग्रेसला होती हे खरे; पण, काँग्रेसमध्ये शहरी, व्यापारी, कारखानदार, जमीनदार, शेतकरी, गांधीवादी, समाजवादी अशा अनेक मतप्रवाहांचे मिश्रण होते. बहुजन समाजाच्या हितांचे रक्षण करणारी, हिंसाअहिंसेच्या काथ्याकुटाची फारशी पर्वा न करणारी एक नवी चळवळ १९४२ च्या आंदोलनात अंकुरली होती. गांधीजींची चळवळ कोसळली तर फार झपाट्याने समाजवादी बहुजन चळवळ संघर्षाला खडी होईल आणि मग सत्तेचे हस्तांतरण शांततेत आणि सुव्यवस्थेने करणे दुष्कर होईल हे इंग्रजांनी ओळखले. देशाची फाळणी करुन भारतातील सत्ता काँग्रेसमधील आंग्लाळलेल्या भद्र लोकांच्या हाती सोपवणे इंग्रजांच्या आर्थिक, राजकीय हिताचे होते.



## गांधी-विचार पहिला बळी

स्वातंत्र्य आले, पंडित नेहरू पंतप्रधान झाले. इंग्रजी अमदानीत धन, विद्या आणि सत्ता संपादन केलेल्या, चामडीचा रंग सोडल्यास सर्वतोपरी इंग्रजी असलेल्या नेतृत्वाकडे सत्ता गेली. महात्मा गांधींच्या जनआंदोलनाच्या सामर्थ्याची आता या शहरी भद्र नेतृत्वास काही आवश्यकता राहिली नव्हती. गोडसेने गांधीजींचा देह संपवला. नंतर लगेच नेहरूंनी गांधींच्या अर्थविचारावर आणि राजकीय विचारावर हल्ला चढवला. 'गावकेंद्री अर्थव्यवस्था, शेती आणि ग्रामोद्योगास प्राधान्य आणि न्यूनतम शासन' याऐवजी 'शहरी उद्योगधंद्याचा प्रभाव असलेली सर्वंकष सत्ता शासनाच्या हाती एकवटणाऱ्या व्यवस्थे'कडे देशाची वाटचाल चालू झाली. आणि ५० वर्षात देशावर अनर्थ कोसळला.

स्वातंत्र्याच्या चळवळीतील वेगवेगळे प्रवाह, त्यांची प्रकृती आणि इतिहास यांचे विवेचन स्वातंत्र्यानंतर कोसळलेला अनर्थ समजावून घेण्यासाठी फार महत्त्वाचे आहे.

हजारो वर्षे गुलामगिरीत राहिलेल्या बहुजनसमाजाला संघटित होऊन आपली भूमिका मांडण्याची संधी इंग्रजी अमदानीत निदान तीनदा आली. कंपनी सरकारच्या उदार धोरणाचा फायदा दिसू लागतो, न लागतो तोच चपात्यांच्या बंडाचा डोंब उसळला. आणि बहुजन समाज मागे ढकलला गेला. जहाल चळवळ कोसळल्यानंतर बहुजन समाजाची चळवळ उभी राहू शकली असती, पण तीही संधी गेली. दुसरे महायुद्ध पेटल्यामुळे समाजवादी बहुजनसमाजाची चळवळ खुडली गेली. स्वातंत्र्य आले ते जोतिबा फुल्यांच्या भाकिताप्रमाणे पेशवाईचे नवे रूप घेऊन आले. गोऱ्या इंग्रजांची जागा काळ्या इंग्रजाने घेतली. गांधीवादी ग्रामीण अर्थव्यवस्था त्यांना परवडणारी नव्हती. याउलट, समाजवादाच्या नावाखाली सर्व सत्ता आपल्या हाती घेण्याची शक्यता दिसताच आंग्लाळलेल्या काँग्रेसने गांधीनेतृत्वाचा मुखवटा सहज फेकून दिला. स्वातंत्र्यानंतर 'ब्राह्मणी' समाजवादाचा अवतार झाला आणि अनर्थपरंपरेची सुरुवात झाली.

## आत्मपरीक्षणाच्या तीन कसोट्या

स्वराज्याच्या आंदोलनातील अंत:प्रवाह पाहता गेल्या ५० वर्षांतील घडामोडींचे मूल्यमापन करणे किती बिकट आहे याची कल्पना यावी.

स्वातंत्र्यानंतरच्या घसरगुंडीचे विश्लेषण करताना तीन प्रकारे सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

देशाच्या आजाराचे निदान थातुरमातुर असून चालणार नाही.

ओळखलेल्या आजारांवर परिणामकारक उपचार झाले तर देशाचे नष्टचर्य संपण्याची निश्चिती हवी; अशा अभ्यासात कोणत्या व्यक्तींच्या बडेजावाचा अडसर असता नये.

अखेरीस स्वातंत्र्य चळवळीच्या प्रकृतीचीही परखड चिरफाड करण्यात हयगय होता कामा नये.

❐ ❐ ❐



# गांधीवादा ऐवजी 'भटशाही' समाजवाद

## अहिंसा आंदोलनातील भयानक रक्तपात

१९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली दिल्लीत स्वतंत्र भारताचे सरकार स्थापन झाले. स्वातंत्र्य आले ते देशाची फाळणी घेऊन. जातीय दंगलींमुळे सर्वत्र हत्याकांड होत असताना आणि लक्षावधी निर्वासित हिंदुस्थानातून पाकिस्तानात आणि पाकिस्तानातून हिंदुस्थानात विस्थापित होत असताना स्वातंत्र्य आले. महात्मा गांधींनी मांडलेल्या हिंदुमुसलमान ऐक्याच्या आणि बंधुत्वाच्या कल्पनेचा फाळणीने पार नि:पात केला. आपल्या डोळ्यादेखत आपल्याच विचाराचा एवढा समूळ उच्छेद झाल्याचे पाहण्याचे दुर्भाग्य क्वचितच एखाद्या युगपुरुषाच्या नशिबी आले असेल. 'अहिंसे'च्या तत्त्वाचेही हसे झाले. सारे स्वातंत्र्याचे आंदोलन बंदुकी आणि बॉंब घेऊन झाले असते तरी जितका रक्तपात झाला नसता तितका रक्तपात अहिंसावादी स्वराज्याच्या चळवळीच्या अखेरीस घडून आला. हिंदुमुसलमान ऐक्याची कल्पना संपुष्टात आली, एवढेच नव्हे तर, अहिंसा हा कुचेष्टेचा विषय बनला. लोकांतच नव्हे, तर कॉंग्रेस मंत्रीमंडळातही गांधीविचाराची प्रतिष्ठा संपली. 'म्हातारा दिल्लीपासून दूर, निर्वासितांमध्ये फिरत आहे ते बरेच आहे' अशी मंत्रीमंडळातील त्यांच्या शिष्योत्तमांचीही भावना होती. पाकिस्तानचे ५५ कोटी रुपयांचे देणे देऊन टाकावे असा आग्रह गांधींनी धरला तो मानण्याच्या अवस्थेतही कोणी नव्हते. अगदीच त्यांचे प्राण धोक्यात आले तेव्हा मोठ्या मुश्किलीने मंत्रीमंडळाने त्यांचे म्हणणे मानले.

## जातीयवादला वेसण, पण गांधी विचार संपला

३० जानेवारी १९४८ रोजी गांधींची हत्या झाली. युगपुरुषाच्या आयुष्यात अशी उदाहरणे अनेक सापडतील की साऱ्या आयुष्याच्या पराकाष्ठेच्या तपस्येने जे परिवर्तन साधत नाही ते त्यांच्या मृत्यूने एका क्षणार्धात, चमत्कार झाल्यासारखे घडून येते. गांधींच्या मृत्यूने शोकाची जी लाट पसरली त्यात हिंदुमुसलमान द्वेषाचे सारे विष वाहून गेल्यासारखे झाले. त्यानंतर, भारतात धर्मवाद जवळजवळ ४० वर्षे पुन्हा प्रतिष्ठा मिळवू शकला नाही.

पण, गांधीजी गेले आणि त्याबरोबर त्यांच्या विचारांमागे उभा असलेला त्यांचा व्यक्तिमत्वाचा प्रभावही संपला. स्वराज्याची चळवळ महात्मा गांधींच्या विचारामुळे जनआंदोलन बनली. मूळचे काँग्रेसचे नेतृत्व शहरातील आंग्लाळलेल्या भद्र लोकांचे. गांधी गेल्यावर जनआंदोलनासाठी उपयोगी पडलेला गांधीविचाराचा पेहराव फेकून देणे काँग्रेसमधील पाश्चिमात्य विद्याविभूषित, केवळ रंगानेच भारतीय अन्यथा पेहराव, चालीरीती, खाणेपिणे या सर्व बाबतीत पाश्चिमात्य संस्कृतीचा पगडा असलेल्यांना सहज शक्य झाले. हाती सत्ता येताच या मंडळींनी गांधीविचार सोडून समाजवादाकडे देश नेऊ घातला.

गांधीच्या स्वराज्याच्या कल्पनेत गावाला सर्वात अधिक महत्त्व होते; शेती आणि ग्रामोद्योग यांना प्राधान्य होते. सरकारी सत्ता सर्वात कमी महत्त्वाची असे गांधीजी वारंवार म्हणत. आपण अराजकवादी असल्याचा त्यांचा आग्रह. भारतातील स्वातंत्र्याचे आंदोलन हे शासनसंस्थेच्या विसर्जनाच्या व्यापक आंदोलनाची पहिली पायरी आहे असे ते मानीत. त्यांचा अराजकवाद तसा मोठ्या गोंधळाचा आहे. सत्ता हे परिवर्तनाचे साधन नाही असे ते एका बाजूस मानीत, तर दुसऱ्या बाजूस, माझ्या हाती एक दिवस सत्ता आली तर तिचा वापर करून मी दारुबंदी करेन अशीही विधाने ते करीत.

स्वातंत्र्य मिळण्याच्या वेळी देशातील परिस्थिती असाधारण होती. ती निवळून सर्वसाधारण होईपर्यंत तरी गांधीविचारांच्या अंमलबजावणीचा विचार करता येणार नाही. सध्या देश वाचवला पाहिजे, बाकीचे नंतर बघू अशी अनेकांची भावना होती. फाळणी, त्यातून उद्भवलेले दंगे, निर्वासितांचे स्थलांतर, काश्मीर, हैद्राबाद, जुनागढ इत्यादी संस्थानांच्या समस्या यामुळे कायदा आणि सुव्यवस्था हा महत्त्वाचा, चिंतेचा विषय बनला होता. आर्थिक आघाडीवर परिस्थिती गंभीर होती. महायुद्धामुळे अन्नधान्याचा तुटवडा, महागाई यांनी थैमान घातले होते. अन्नधान्याचे विपुल उत्पादन करणारा प्रदेश पाकिस्तानात गेल्यामुळे तुटवडा अधिकच गंभीर बनला होता. या समस्यांना तोंड देण्यासाठी शासनव्यवस्थेखेरीज दुसरी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नव्हती, साकार होण्याची शक्यता दिसत नव्हती.

## विकासाची साधने : कमजोर उद्योजक

उद्योगधंद्यातील खाजगी क्षेत्र आपल्या देशात समर्थ्यवान आणि संघटित कधीच नव्हते. त्यांतील लोकांना सामाजिक प्रतिष्ठाही नव्हती. उद्योगधंदे करणारे ते वैश्य आणि शूद्र. जातिव्यवस्थेच्या उतरंडीत त्यांची प्रतिष्ठा खालच्या दर्जाची. ब्रह्माचा



शोध घेणारे ब्राह्मण आणि समाजाचे क्षतिपासून तारण करणारे क्षत्रिय यांची कर्मे उत्तम. व्यापारउदीम करणारे म्हणजे केवळ पोटार्थी असा त्यांचा उपहास होई; वर्णव्यवस्थेच्या सर्व इतिहासभर त्यांचा तिरस्कार झाला. इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर खेड्यातील पारंपरिक उद्योगधंदे पार बसले. इंग्लंडमधील कारखानदारीच्या स्वस्त आणि सुबक, अधिक गुणवत्तेच्या मालाने गावोगावच्या बलुतेदारांचे उद्योग उद्ध्वस्त झाले. कोष्टी, माळी, चांभार, लोहार सर्वच बलुतेदारांचे उद्योगधंदे थंडावले. बलुतेदार उद्योजक कधीच नव्हते. गावातील लोकांच्या गरजांप्रमाणे हुन्नर वापरणारे ते कारागीर होते. माल अधिक सुबक करावा, तो तयार करण्याच्या अधिकाधिक कार्यक्षम पद्धती शोधाव्या, उत्पादन वाढवावे, ग्राहकाला खुष करावे अशी तळमळ त्यांना लागण्याचे काही कारण नव्हते. गावाच्या गरजा होईल तितक्या पुऱ्या कराव्यात, थोडा जास्त माल पैदा करुन जत्रा, बाजारात खपवून किरकोळ नगदी पैशाची सोय करावी, आलेला दिवस कसातरी काढावा हा त्यांचा आयुष्यक्रम. यदृच्छेने एका जातीत जन्म आला म्हणून हे सारे करायचे, या जीवनक्रमाला पर्यायही नाही आणि पर्याय असला तरी त्याचा शोध घेणे म्हणजे रौरव नरकात घालणारे पातक ठरेल अशी त्यांची आणि समाजाची धारणा.

इंग्रजांच्या आगमनांतर मुंबई-कलकत्त्यासारख्या बंदरांच्या आधाराने व्यापारउदीमाला सुरुवात झाली. कच्चा माल येथून विलायतेत जाऊ लागला आणि विलायती माल भरभरुन बोटी इथल्या बंदरात येऊ लागल्या. खेडोपाडी बाजारच्या गावी कच्चा माल विकत घेऊन इंग्लंडकडे रवाना करण्यासाठी पाठवणाऱ्या आडत्यांचे जाळे बनले. त्यासाठी रस्ते, लोहमार्ग आदी संरचना तयार होऊ लागल्या. या यंत्रणेत भारतीय उद्योजक झपाट्याने आपला व्याप अधिकाधिक वाढवू लागले. कापसाची आडत चालवणारे दलाल परदेशी निर्यात करू लागले. सूतगिरण्या काढू लागले, चालवू लागले, परदेशातून यंत्रसामुग्री आणू लागले. एका अर्थाने एतद्देशीयांचा व्यापार हा भारताच्या लुटीच्या षड्यंत्रातील एक महत्त्वाचा भाग बनला. त्यातील काहींनी मोठा विक्रम करुन लोखंडपोलादाचे कारखाने काढले. कापडाच्या गिरण्या भरभराटीस येऊ लागल्या. व्यापारउदीमाचे कष्ट करावे व त्यातून फायदा कमवावा अशा बुद्धीने उभ्या राहिलेल्या नव्या उद्योजकवर्गाचे नेतृत्व जातिव्यवस्थेच्या चौकटीबाहेरील पारशी, मुसलमान इ. समाजांकडे राहिले. हिंदुंपैकी जातिपरंपरेत वैश्य वृत्ती करणाऱ्या समाजातील वाणी, मारवाडी इत्यादींनीच फक्त अशी धडाडी दाखवून नव्या उद्योगधंद्यात महत्त्वाचे स्थान मिळवले होते.

हा उद्योजक समाज संख्येने लहान, त्याची आर्थिक ताकद नगण्य. 'लिधा

दिधा' अडत हे त्यांचे मुख्य कसब. नवीन तंत्रज्ञान शोधावे, उत्पादकता वाढवावी, त्यासाठी संरचना उभ्या कराव्या असे सामर्थ्य टाटांसारखा एखाद्दुसरा सोडल्यास कोणाकडेच नव्हते. या उद्योजक वर्गाविषयी सर्वसाधारण लोकांच्या मनात फारशी जवळीक, प्रेम किंवा आदर अजिबात नव्हता. मारवाडी, वाणी समाज बहुजनांच्या लेखी तिरस्काराचाच विषय होता. सारा देश गरीबीच्या खाईत जात असताना भरभराटीस येणाऱ्या या वर्गाच्या श्रीमंतीने अनेकांच्या पोटात मत्सराचा शूळ उठत असणार. ब्राह्मण, क्षत्रिय हे समाजातील श्रेष्ठ वर्ण निष्प्रभ होऊन या नव्या वैश्यवृत्तीच्या समाजाची चलती शासनाच्या पचनी पडत नव्हती. देशाला गुलाम करणाऱ्या सरकारचे हे साथीदार आहेत या भावनेमुळे त्यांच्याविरुद्ध विद्वेषाची भावना प्रखर होती. स्वराज्याच्या चळवळीत, कोणत्या का हेतूने होईना, संबंध ठेवून असलेले बिर्ला, बजाज सोडल्यास ही सर्व मंडळी स्वराज्याचे शत्रू आहेत अशीच भावना होती. लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी चळवळीत छोट्या छोट्या कारखानदारांना प्रोत्साहन देण्याची प्रवृत्ती होती. गांधीजींच्या स्वातंत्र्यचळवळीत यंत्राचाच विरोध असल्यामुळे सारे नेटीव्ह स्वदेशीच. गांधीपूर्व स्वदेशी चळवळीत असे कापड तयार करणाऱ्या गिरणी मालकांचे कौतुकच झाले असते. खादी चळवळीने एतद्देशीय गिरण्यांचा कमालीचा राग केला; त्यांच्या मालाच्याही होळ्या होऊ लागल्या.

हिंदुस्थानात नव्याने उभे राहणारे हे उद्योजक इंग्रज व्यवस्थेशी मोठ्या कठीण परिस्थितीत मोठ्या हिमतीने टक्कर देत होते. शासनयंत्रणा शक्य तेथे इंग्रज उद्योजकांच्या फायद्याचेच निर्णय घेत असे. स्पर्धा मोठी बिकट होती. परदेशी गिरण्यांशी स्पर्धा करण्यात भारतीय उद्योजकांना तीनच गोष्टी सोयीच्या आणि फायद्याच्या होत्या. स्थानिक बाजारपेठेत त्यांना कच्चा माल अधिक स्वस्त खरेदी करता येत असे. जहाज वाहतुकीचा खर्च त्यांना पडत नसे आणि शेवटी, भारतीय मजुरीचे दर विलायतेच्या तुलनेने अगदीच कमी होते. खेडी, गावे उजाड होऊन कामगार रोजगारांच्या शोधात शहरांकडे जाऊ लागले होते. खेडेगावात पोटाची पंचाईत असली तरी निदान वाडवडिलोपार्जित शेतीचा अधिकार होता, परंपरागत संस्कृतीचे वातावरण होते; मुंबईत येऊन पोहोचलेले कामगार त्यावेळी पत्र्याच्या चाळीत रहात; झोपटपट्ट्या आणि गलिच्छ वस्त्या स्वातंत्र्यानंतर आल्या. पण, शहरातील बकाल आयुष्य कंठणाऱ्या कामगारांची परिस्थिती सर्वार्थाने बिकट होती.

दहाबारा वर्षांची मुले दोनचार आणे मजुरीवर चौदा चौदा तास काम करीत; रजा नाही, औषधपाण्याची सोय नाही. बहुतेक, अगदी लहान वयात रोगी बनत किंवा मरून जात. अशा परिस्थितीत पहिली कामगार चळवळ उभी राहू लागली. या कामगार



चळवळीला राष्ट्रीय चळवळीच्या मध्य प्रवाहात महत्त्वाचे स्थान आणि प्रतिष्ठा होती. या चळवळीने भारतीय गिरणीमालक, कारखानदार, व्यापारी म्हणजे कामगारांचे शोषण करणारे रक्तपिपासू राक्षस अशी प्रतिमा उभी केली होती.

सारांश, उद्योजक वर्ग संख्येने, कर्तृत्वाने छोटा, बहुजनसमाजापासून जातिवृत्तीने स्वराज्य आंदोलनापासून प्रकृतीने वेगळा पडलेला; स्वातंत्र्यानंतर ज्यांच्या हाती नेतृत्व आले त्यांच्या घृणेचा विषय. साहजिकच, नव्याने स्वतंत्र झालेल्या देशाचे भवितव्य केवळ स्वत:च्या फायद्याकरीता झटणाऱ्या अशा समाजाकडे सोपवण्याचा विचारही भारताच्या नव्या धुरीणांना सहन होण्यासारखा नव्हता.

## बलदंड सवर्ण नोकरशाही

इंग्रजांनी प्रस्थापित केलेली शासनयंत्रणा आणि नोकरशाहीची चौकट एवढी एकच संघटित यंत्रणा देशात उपलब्ध आहे; स्वराज्याच्या आंदोलनातील नेतृत्वाने इंग्रजी शासनाची पोलादी चौकट देशाच्या हिताच्या आणि विकासाच्या कामासाठी वळवली आणि सनदी नोकरीची कार्यक्षमतेकरिता जगविख्यात असलेली पोलादी चौकट गरीबी हटवण्याच्या आणि नियोजनाच्या कामाला लावता आली तरच देशाला प्रगतीची काही आशा; निदान काँग्रेस शासनाच्या त्यावेळच्या नेतृत्वाच्या नजरेत देशाच्या उद्धारासाठी एवढीच काय ती यंत्रणा उपलब्ध होती!

## नागरी नियमनातही सरकारशाही

केवळ काँग्रेस पक्ष आणि तिचे शासन यांच्याच नजरेत नाही, तर देशातील बहुतेक नेतेमंडळींचे असेच मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेले हिंदु कोड बिल हे त्याचे बोलके उदाहरण आहे. गांधीवादी विचारधारा उचलून टाकल्या नंतर पंडित नेहरू आणि बाबासाहेब अंबेडकर यांच्यात मतभेदाला काही फारशी जागा रहातच नव्हती. दोघेही नेते पूर्णत: आग्लांळलेले. नेहरू निदान देशात वास असतांना देशी कपडे पेहरत; बाबासाहेब तर सदासर्वकाळ सूटबूटटायमध्ये वावरणारे. नेहरूंच्या दृष्टिकोनात आर्थिक प्रगती, औद्योगिकीकरण आणि विज्ञान-तंत्रज्ञान यांचे युग चालू करण्यासाठी केन्द्रातील शासकीय सत्ता वापरण्याखेरीज गत्यंतर नव्हते. देशातील सर्वसाधारण शेतकरी, कष्टकरी, उद्योजक शासनाचा अडसर दूर झाल्यास स्वत:चा आणि देशाचा विकास साधतील हे त्यांना कधी पटलेच नसते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समाज सुधारणेविषयीची कल्पनाही अशीच होती. हिंदू समाजाला कोणते एक दैवत

नाही, प्रेषित नाही. कोणी एक मुनि असा नाही की ज्याचे वचन सर्वदूर प्रमाण असावे. वेगवेगळ्या प्रदेशांत, जातीत, पोटजातीत, पंचायतीत अगदी वेगवेगळ्या प्रकारच्या विविध समाजरचना आणि चालीरीती हजारो वर्षे परंपरेने चालत होत्या. आधुनिक दृष्टिकोनातून पाहिले तर विशेषत: अन्यायकारक गोष्टी अनेक होत्या. पण त्या व्यवस्थेस लोकेच्छेचा आधार होता. एखादी प्रथा चुकीची वाटू लागली की त्यात सुधारणाही केल्या जात. असे सुधारक मुळात प्रचलित धर्मव्यवस्था आणि नैतिकता पूर्णपणे स्वीकारून जनमान्यता पावलेले असे असत. गांधीजी हे स्वत:च अशा सुधारकांचे उदाहरण आहे. कोणतेही शास्त्र मी शब्दश: प्रमाण मानत नाही, जे अन्याय्य आहे सदसद्विवेक बुद्धीला झोंबणारे आहे त्याला मी विरोध करणारच अशी त्यांची भूमिका होती. अस्पृश्यता निवारणाच्या त्यांच्या भूमिकेने मोठे परिवर्तन घडून आले. साऱ्या व्यवस्थेविरुद्ध उठून बंडखोरी करणाऱ्यांच्या प्रस्तावाप्रमाणे प्रचलित रीतीभातीत बदल घडवून आणावा हे भारतीय परंपरेत बसत नसे.

अंधेर नगरी चौपट राजा अशा या व्यवस्थेत स्त्रीसत्तेपासून सतीप्रथेपर्यंत सर्व तऱ्हेची विविधता पहायला मिळे. विवाह, घटस्फोट, मालमत्ता, दत्तक विधान या सगळ्या बाबींतील प्रकरणे अगदी सहज निकालात निघत. नेहरू आणि आंबेडकर या दोघांनाही असली सारी व्यवस्था मागसलेपणाचे आणि अडाणीपणाचे लक्षण वाटे. पंडितजींच्या मनातली महत्त्वाकांक्षा नवा अशोक किंवा अकबर होण्याची, तर बाबासाहेबांची इच्छा नवा मनु किंवा बुद्ध होण्याची. पण एका कोणी शास्त्रकारांनी शास्त्र लिहावे आणि लोकांनी ते पाळावे अशी येथील परंपराच नाही. शास्त्रकारांनी त्या त्या काळातील चालीरीती ग्रंथगत केल्या. नवे आदेश काढले नाहीत. सामाजिक चालीरीतींची ही प्रचंड विविधता इंग्रजांनाही भावत नसे. १८५७ च्या बंडाआधीपासून मोठे मोठे पंडित कामी लावून साऱ्या चालीरीतींचे संकलन करण्याचा खटाटोप त्यांनी केला. हे संकलन इंग्रजीत आले तेंव्हा मूळ शास्त्रग्रंथापेक्षाही त्यांचे प्रामाण्य सरकारात आणि कोर्टदरबारात श्रेष्ठ ठरले.

सर्व देशात एक समान नागरी कायदा असावा या कल्पनेमागे राजकीय शासन-संस्थेचे सर्वंकष प्रभुत्व प्रस्थापित करण्याची बुद्धी होती. या मुद्द्यावर समाजवादी नेहरू आणि समाजसुधारक आंबेडकर, एवढेच नव्हे तर सनातनी हिंदु मंडळींचेही एकमत होते. समान नागरी कायद्याने मुसमानांच्या नाकावर टिच्चून शरीयत सोडून राष्ट्रीय कायदा स्वीकारणे भाग पडेल अशी सनातनी हिंदु मंडळींची योजना होती.



समान नागरी कायद्याच्या दिशेने करायच्या वाटचालीतील पहिले पाऊल म्हणून हिंदु कोडबिल पुढे आले. विविधतेने नटलेल्या दशात सर्वत्र समाजरचना मात्र एकच असली पाहिजे अशा आग्रहापोटी विविध शास्त्रार्थांतील, थोड्याफार फरकाने मध्यम मार्ग स्वीकारीत बिल तयार झाले. बिलातील प्रस्तावावर आंग्लाळलेल्या सवर्ण समाजातील चालीरीतींचा जबरदस्त पगडा होता. नीतिमत्तेच्या इंग्रजी कल्पनांचा प्रभाव होता. दक्षिण भारतात व उत्तरेतील आदिवासी समाजांत स्त्रीस्वातंत्र्य आणि मालमत्ता याबाबत अत्यंत उदार प्रथा प्रचलित होत्या. केवळ समानतेच्या हव्यासापोटी अशा प्रथा संपवण्यात आल्या. स्त्रियांच्या मालमत्तेबद्दल समानतेचे तत्त्व खुद्द भारतीय संविधानानेच स्वीकारले होते. पण लोकसभेतील सनातनी मंडळींनी समानता प्रदान करणाऱ्या सर्व सूचना हाणून पाडल्या. एकसंघ हिंदु समाजव्यवस्था तयार करण्याच्या हव्यासापोटी, प्रतिगामी तरतुदी स्वीकारण्यात आल्या.

एक नमुनेदार, तर्कशुद्ध आणि न्याय्य नागरी कायदा तयार करावा व हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी सर्वच समाजांतील व्यक्तींना तो स्वीकारण्याचा किंवा त्यांच्या धर्मव्यवस्थेतील पद्धती चालू ठेवण्याचा पर्याय द्यावा असा प्रस्ताव त्याही वेळी पुढे आला होता. पण असे केले तर सारी बजबजपुरी माजेल, कोणाला कोठे कोणाचा कायदा लागू आहे हे ठरवणेच कठीण होईल अशा सबबीखाली बाबासाहेबांनी तो नाकारला.

केन्द्रशासन मजबूत असावे, सर्वसत्ताधारी असावे, निरंकुश असावे, त्याने आर्थिक योजना कराव्यात, समाजव्यवस्थेचा आराखडा बनवावा आणि त्याप्रमाणे सर्व नागरिकांनी निमूट चालावे ही केवळ सवर्ण सत्ताधाऱ्यांचीच नव्हे तर बाबसाहेब आंबेडकरसारख्या दलित नेत्यांचीही धारणा होती.

एका बाजूला नेहरूंची, शेती आणि ग्रामीण प्रदेश याबद्दल शहरी-सवर्ण-समाजवादी उदासीनता आणि दुसऱ्या बाजूला डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील मागासवर्गीय चळवळीचा शहरांकडील ओढा आणि गावव्यवस्थेविषयी दु:स्वास अशा कात्रीत शेती आणि बलुतेदारी सापडली. शेती व गांव यांच्या या उपेक्षेची लक्षणे खुद्द संविधानातच स्पष्ट दिसून येतात.

संविधानातील चौथ्या विभागात शासनाच्या कारभाराकरिता अनेक मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आली आहेत. तसे पाहिले तर ही सारी छप्परफाड आश्वासनांची जंत्रीच आहे. सर्व नागरिकांना जगण्याच्या पर्याप्त सुविधा मिळतील; संपत्ती थोड्या लोकांच्या हाती एकवटणार नाही; समान कामासाठी समान वेतन मिळेल; कोणालाही केवळ आर्थिक गरजेपोटी, न झेपणारे काम करावे लागणार नाही; प्रत्येक नागरिकास

रोजगार, शिक्षण मिळविण्याचा हक्क राहील; सर्वांना जीवनवेतन मिळेल; कामगारांचा व्यवस्थापनात हक्क राहील इत्यादी इत्यादी.

या साऱ्या वारेमाप घोषणांच्या उधळपट्टीला तसा अर्थ काही नाही. कारण कोणी नागरिक मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे आपणास वागणूक मिळत नाही अशी तक्रार न्यायालयापुढे जाऊन गुदरू शकत नाही. गांधीजींच्या विचाराने चाललेल्या स्वराज्याच्या आंदोलनातून स्वातंत्र्य मिळाले असते आणि संविधान तयार झाले असते तर शेती, ग्रामराज्य, ग्रामोद्योग यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे घालण्यात आली असती. प्रत्यक्षात, शेतीसंबंधी एकच कलम ४८ आहे. त्यातील मार्गदर्शक तत्त्व काय, तर 'शासन शेती आणि पशुसंवर्धन आधुनिक आणि शास्त्रीय पायावर उभे करेल आणि पशुसंवर्धन, विकसन तसेच गायी, कालवडी आणि इतर दुभत्या वा भाकड जनावरांच्या हत्येस बंदी घालेल.' घटनासमितीत बसलेल्या सदस्यांच्या मनात शेतीचा विकास आणि शेतीच्या मूलाधाराने सर्व अर्थव्यवस्थेचा विकास अशी काही संकल्पना असल्याचे दिसत नाही. सवर्ण हिंदुमनाचा गोरक्षणाचा आग्रहच काय तो स्पष्ट होतो.

शेती, गाव, पंचायत यांविषयी नेहरू उदासीन होते आणि आंबेडकर तर गावव्यवस्थेला गटारगंगाच मानीत. परिणामत:, राज्यव्यवस्थेचा आराखडा उभा राहिला तो बहुसंख्य लोकसंख्येच्या गावाच्या पायावर नाही; संविधानाचे मूळ एकक राज्य ठरले आणि राज्यांचे संघराज्य झाले. पंचायत् राज्याची कल्पना विचारात घेतली गेली. पण, त्यासंबंधी राज्य काय ती कार्यवाही करतील असे कलम ४० अन्वये ठरविण्यात आले. थोडक्यात, ग्रामपंचायतीला भारतीय संविधानात काही स्थान ठेवण्यात आले नाही. स्वातंत्र्यानंतर ज्यांच्या हाती सत्ता आली त्यांचा ग्रामस्वाराज्याचा दु:स्वास कलम ४८ आणि ४० यांवरूनच स्पष्ट होतो.

राजीव गांधींच्या काळात घटनेत दुरुस्ती करून पंचायत राज्याची एक व्यवस्था घुसडण्यात आली. तिचा सारा हेतू गावातून राज्यांमार्फत केंद्राकडे सत्ता देण्याचा नव्हता. उलट, राज्यांना बगल देऊन केंद्रशासनाला ग्रामपंचायतींना परस्पर अंकित करून घेता यावे यासाठी केलेला तो खटाटोप होता. अथ पासून आजपर्यंत नव्या राज्यकर्त्यांना गाव आणि शेती यांचे काही सोयरसूतकच नव्हते.

## देशी उद्योजकतेचा विचारच नाही

इंग्रज गेल्यानंतर त्यांची शोषणव्यवस्था संपेल. या देशातील शेती, बलुतेदारी, व्यापार विलायती स्पर्धेला तोंड देत दीडशे वर्षे कसेबसे तग धरुन राहिले आहेत. स्वातंत्र्याचा



मृगवर्षाव झाल्यानंतर या सर्व व्यापारउदीमात तरतरून फुटावा येईल, कोंब धरतील आणि अगदी झपाट्याने विकासाची हिरवळ तयार होईल अशी शंकादेखील शहरी भद्र नेतृत्वाच्या मनाला शिवली नाही. गोऱ्या इंग्रजांनी वसाहतीत आपण पतितांच्या उद्धाराचे काम करण्याकरिता आलो आहो अशी शेखी मिरवली. या नव्या सत्तेच्या वारसदारांचीही भावना अशीच होती. या प्रचंड अध:पतित समाजाचा उद्धार करण्याची ऐतिहासिक जबाबदारी आपल्यावर पडली आहे, ती आपण पार पाडली नाही तर या देशातील बहुसंख्य प्रजा स्वत:चा विकास करून घेण्यास अपात्रच आहे अशी त्यांची खात्री होती.

स्वातंत्र्याच्या चळवळीत उभे राहिलेल्या नेतृत्वाची आणि १८५७ च्या बंडानंतर इंग्रजी बुके शिकून नोकरीत प्रतिष्ठा पावलेल्या सवर्ण नोकरदारांची इंग्रजांच्या राज्यात मोठी चलती होती. इंग्रज असेपावेतो, 'राज्य करावे ते इंग्रजांनीच. हे तुमचे पंचेवाले आणि चरखेवाले काय राज्य करणार?' अशी हेटाळणी ते करीत. इंग्रज खरोखर कधी काळी येथून जातील असे त्यांना वाटतच नव्हते. त्यांची जाण्याची तारीख ठरलेली ऐकून ते हादलेच. नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताच्या विकासाच्या साऱ्या नाड्या आपल्याच म्हणजेच नोकरदारांच्या हाती राहाव्या असा त्यांचा प्रयत्न असणारच. खाजगी क्षेत्रातील वैश्यशूद्रांच्या हाती देशाचा अर्थव्यवहार जाता तर सवर्ण नोकरदारांना काही महत्त्वच उरले नसते. वैश्य श्रेष्ठ झाले असते आणि तो जातिव्यवस्थेचा मोठा उत्पात ठरला असता. नाव समाजवादाचे, प्रभुत्व सवर्णांचे अशी व्यवस्था गांधीजींच्या मृत्यूनंतर पंडित नेहरूंना सहज प्रस्थापित करता आली याचे महत्त्वाचे कारण नेहरूसमाजवाद ब्राह्मणी समाजाच्या नव्या प्रतिष्ठापनेस सोयीस्कर होता, त्यात लिखापढी करणाऱ्यांचे महत्त्व होते, भाषणबाजांना मान होता, नोकरदारांना प्रतिष्ठा होती; कागदी घोडे नाचवून, व्यापारउदीम करणाऱ्या सर्व उद्योजकांना वेसण घालून आपल्या तालावर नाचवण्याची शक्यता होती. नेहरूंच्या समाजवादाच्या लोकप्रियतेचे रहस्य हे आहे.

## पुन्हा पेशवाई अवतरली

जोतिबा फुल्यांची भविष्यवाणी खरी ठरली. 'एकमय लोक' या अर्थी राष्ट्र तयार होण्याआधी इंग्रज गेले. साहजिकच, नवी पेशवाई प्रस्थापित झाली. त्या पेशवाईत उद्घोष वेदपुराणांचा नव्हता; हे जुने ग्रंथ प्रतिष्ठेने मिरवण्याजोगे राहिलेही नव्हते. त्याऐवजी, मार्क्स-एंगल्सच्या पोथ्या मिरवणारी 'समाजवादी भटशाही' स्वातंत्र्यानंतर तयार झाली.

स्वातंत्र्यानंतर समाजवादाची कास धरणे हे परंपरागत वर्णव्यवस्थेतील समर्थ वर्गांच्या सोयीचे होते. याचा अर्थ असा की, सत्ता-नियंत्रणे शासनाच्या हाती, पण

उत्पादन आणि कार्यक्षमता यांची जबाबदारी मात्र शासनाची नाही. रशियन पद्धतीच्या समाजवादी व्यवस्थेत शासन सगळीच जबाबदारी उचलते. सगळी मालमत्ता राष्ट्रीय संपत्ती होते. सारे नागरिक केवळ पगारदार. भात किती पिकवायचा, कोळशाचे उत्पादन किती घ्यायचे, रेल्वेच्या वाघीणी किती बनवायच्या येथपासून सारे निर्णय शासनाने करायचे आणि त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारीही शासनाची. रशियन कम्युनिस्ट पक्षातील नेते आणि कार्यकर्ते कामगारवर्गातून आलेले, किमान कामगारांच्या जीवनाशी घनिष्ठ संबंध असलेले होते. शेती, कारखानदारी यांतील रोजगाराच्या कामाची जबाबदारी घेणे त्यांना अशक्य होते. भारतातील सनदी नोकर आणि पुढारी दोघेही पांढरपेशे. उद्योगधंद्यातील धाडस व तपशीलाची जबाबदारी त्यांच्या कुवतीबाहेरची होती. असल्या कामात अडकवून घ्यायची त्यांची इच्छाही नव्हती. देशपातळीवरचे आर्थिक नियोजन, राष्ट्रीय उत्पादन किती असावे, राष्ट्रीय बचत किती असावी, ग्राहकांची मागणी किती असेल, त्यासाठी पुरवठा कसा करावा, कोणता कारखाना उघडला जावा, तो कोठे उघडला जावा अशा बाबतीतील सर्व सत्ता तेवढी आपल्या हाती असावी; थोडक्यात, उद्योगाची जबाबदारी न घेता त्यावर नियंत्रण असावे एवढीच इच्छा बाळगणाऱ्यांचा हा समाजवाद होता.

## समाजवादाचे पिशाच हिंदुस्थानात

स्वराज्य आंदोलनाच्या काळात, निदान १९४० सालापर्यंत समाजवादी किंवा कम्युनिस्टांची फारशी प्रतिष्ठा नव्हती. शेतीभातीपासून सर्वांचे राष्ट्रीयकरण, समाजातील सर्व विषमता संपवणे, धर्माचा उच्छेद इत्यादी गोष्टींमुळे समाजवादाविषयी लोकांच्या मनात मोठी अढी होती. किंबहुना, आर्थिक भरभराट हे देशाचे स्वातंत्र्योत्तर उद्दिष्ट असावे आणि देश इंग्लंड-अमेरिकेसारखा संपन्न व्हावा या विषयावरदेखील आम सहमती नव्हती. गरीबीचे तत्त्वज्ञान ज्याच्या त्याच्या तोंडी खेळत होते. हाती पैसा येत असेल तर, तो हपापा गिळल्याशिवाय सोडण्याइतका निःसंग वैरागी कोणीच नव्हता! आपली पोळी भाजून घ्यावी, आपल्या माणसांचे भले करावे आणि साऱ्या जगाला मात्र वैराग्य, संयम आणि साधेपण यांचा बडेजाव सांगावा अशी नीतिमत्ता रूढ होती. महात्मा गांधीच्या नेतृत्वाच्या काळातदेखील आर्थिक संपन्नतेला ध्येय म्हणून सर्वमान्यता तर नव्हतीच, पण श्रीमंतीचा राग असल्याचा एक देखावातरी होता. शेतकऱ्याने दिवसभर कष्ट करावे आणि त्या कष्टाचे फळ मुलाबाळांसह परमेश्वराच्या भजनात आनंदाने उपभोगावे; संपत्तीच्या मालकांनी त्यागभावनेने आणि विश्वस्त भावनेने संपत्तीचा उपभोग घ्यावा,



अशी गांधीवादाबद्दल सार्वत्रिक समजूत होती. यापलीकडे जाऊन सर्व तऱ्हेची संपन्नता मिळवावी, साधनांची लयलूट करावी हे उद्दिष्ट मुळी गांधीजींच्या तत्त्वज्ञानाशी न जुळणारे होते. पण, हे तत्त्वज्ञान जनतेने कधी गंभीरपणे स्वीकारलेले नव्हते. 'साधुमहात्म्यांचे ठीक आहे, त्यांचे काय, पंचावर भागते; पण वैराग्य आणि ब्रह्मचर्य सामान्य माणसांनी आचरावयाच्या गोष्टी थोड्याच आहेत?' अशीच सर्वांच्या मनातली खूणगाठ होती. त्यामुळे, देशाला भरभराटीच्या रस्त्यावर नेण्याच्या कल्पनेला कोणी फारसा विरोध केला नाही. स्वातंत्र्यानंतर युद्धखात्याचे नाव बदलून संरक्षण मंत्रालय झाले. तसेच, संपन्नतेच्या उद्दिष्टाऐवजी गरीबी, निरक्षरता दूर करणे अशी शब्दांची लटलटपंची केली की भारतीयांची आधीच लटपटती विरक्ती भंग व्हायला काही वेळ लागला नाही.

युद्ध नुकतेच संपलेले, देशाच्या सुरक्षिततेला अनेक ठिकाणी धोका असल्याची वदंता. त्यामुळे आर्थिक विकासाबरोबरच विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा विकास करून जगाच्या बरोबरीने राहणे हे उद्दिष्ट लोकांना सहज पटण्यासारखे होते.

आर्थिक विकासासाठी औद्योगिकीरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची कास धरावी लागेल आणि मध्यवर्ती निर्णायक जबाबदारी शासनाला घ्यावी लागेल. शासन अशी जबाबदारी घेते त्या व्यवस्थेला समाजवाद म्हणतात. भांडवलशाही नष्ट करून समाजवादी बनलेल्या रशिया आदी देशांत केवढी प्रचंड प्रगती झाली आहे यासंबंधीचा अतिरंजित प्रचार सतत कानावर पडणाऱ्या लोकांना 'समाजवादातून सर्वंकष विकास' या कल्पनेची भुरळ पडली असल्यास आश्चर्य नाही.

## सारा देश समाजवादावर भाळला

स्वतंत्र भारताच्या नव्या शासनाची, आणखी एक निकड होती. हाती सत्ता एकवटावी ही त्यांची लालसा होतीच, पण त्याचबरोबर हिटलरी किंवा स्टॅलीनी पद्धतीने पाशवी ताकदीच्या बळावर सत्ता संपादन करण्याची त्यांची इच्छा नव्हती; त्याहीपेक्षा, त्यांची कुवत नव्हती. नवीन उदेले हिंदवी राष्ट्र प्रजाकसत्ताक असणार आणि संसदीय लोकशाही राबवणारे असणार याबद्दल बावन्नकशी नसली तरी बहुतांश सहमती होती.

लोकतंत्र चालवायचे म्हणजे मतदानाचा हक्क आला. मतदानाचा हक्क आला म्हणजे बहुसंख्य जनतेला पटणारा कार्यक्रम, निदान घोषणा देण्याची गरज आली. बहुसंख्य जनतेला गांधीवादापासून दूर करुन समाजवादाकडे नेणे कसे साधावे? केवळ सवर्ण भद्र लोकांच्या हाती सत्ता केंद्रित करण्याचा भटशाही-समाजवादी कार्यक्रम लोकांना कसा पटावा? त्यांनी समाजवादी समाजरचनेच्या संकल्पनेला काय म्हणून पाठिंबा द्यावा?

जे घडले ते अद्‌भूत आहे, पण सत्य आहे. बहुसंख्य जनांनी समाजवाद स्वीकारला; राष्ट्रीयीकरण, शासकीय नियंत्रण या गोष्टी देशातील आम जनतेच्या भल्याच आहेत असे गंभीरपणे मानले. आजही बहुसंख्य बहुजन समाजातील लोक समाजवादाच्या ऐतिहासिक वैश्विक पाडावानंतरदेखील समाजवादाचा जप करतात. आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्याचा हा अट्टहास इतक्या आग्रहाने का करतात? समाजवाद, गरीबी हटाओ अशा घोषणांवर निवडणुका कशा जिंकल्या जातात?

बहुसंख्य समाज इंग्रजांना काढून लावण्याच्या कार्यक्रमाला फार हिरीरीने पाठिंबा देत नव्हता हे आपण पूर्वी पाहिले. काँग्रेसच्या मंचावरून महात्मा गांधींनी स्वराज्य आंदोलनाचे जनआंदोलनात रूपांतर केले, त्यावेळी बहुजन समाजाचे मान्यवर नेते काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवाहात सामील झाले. जे काँग्रेसमध्ये गेले नाहीत ते दलित चळवळीत गेले, समाजवादी बनले, डावे बनले, रॉयीस्ट बनले. बहुजन समाजाच्या या मुखंडांनी सवर्णांचे वर्चस्व घट्ट करणाऱ्या समाजवादी कार्यक्रमाला पाठिंबा दिला, एवढेच नव्हे तर अत्यंत उत्साहाने पाठिंबा दिला. हे कसे काय घडले?

हे कोडे उलगडण्यास फारसे अवघड नाही. समाजवाद म्हणजे काय, तो कसा चालता, कसा बोलतो, तो कशाशी खातात याचे ज्ञान फार थोड्यांना होते. भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन साम्राज्यशाहीविरोधी होते. दुसऱ्या महायद्धानंतर साम्राज्यशाहीला विरोध करण्यासाठी समाजवादी रशिया बलदंडपणे उभा आहे एवढेच वर्तमानपत्री वाचकांना आणि येथील परिसरातील लोकांना ठाऊक होते; समाजवाद ही काही थोर गोष्ट आहे अशी साहजिकच धारणा. समाजवादी क्रांतीनंतर सर्व खानदानी जमीनदार, सावकार यांचे शिरकाण झाले याबद्दलची एक विपरीत समाधानाची भावना होती. समाजवादी व्यवस्थेत झपाट्याने कामगारांचा स्वर्ग तयार होतो आहे अशी संघटित प्रचाराने उठवलेली भूमिका आणि अध्यात्मवादाच्या पकडीतून नुकतेच सुटू लागलेल्यांना मार्क्स्एंगल्सच्या विश्वदर्शनाविषयी वाटणारी मोहिनी या सगळ्याच गोष्टी महत्त्वाच्या आहेत; किंबहुना, गेल्या दीडशे वर्षांचा मनुष्यजातीचा इतिहास पहाता मार्क्सवादाइतक्या खलुड विचार-पद्धतीने साऱ्या मनुष्य जातीच्या बुद्धीचे अपहरण इतक्या सहजपणे कसे केले याविषयी आश्चर्य करावे तितके थोडेच आहे.

पण, समाजवादाची वैचारिक तात्त्विक किंवा शास्त्रीय बैठक ही काही फार निर्णायक महत्त्वाची नव्हती. 'समाजवाद' म्हणजे आमची गरीबी हटेल, आमच्या पोटाला भेटवेल अशीही काही व्यवस्था आहे अशी आशा होती. आम्हाला काही भेटले नाही तरी चालेल पण निदान समाजातील बड्या धेंडांना ही व्यवस्था धूळ चारते ना, याचे



समाधान होते. म्हणून 'जगातील कामगारांनो एक व्हा,' 'हम होंगे कामयाब' असे नारे लागले.

समाजवाद ढासळल्यानंतर हीच प्रजा अगदी सहजपणे दोन रुपये किलो तांदूळ आणि एक रुपयाला झुणका भाकर देऊ करणाऱ्या पक्षाच्या लोकांच्या मागे पुन्हा एकदा उत्साहानेच गेली आहे. पूर्वी त्यांनी घोषणा दिल्या समाजवादाच्या, आता घोषणा शिवशाहीच्या, राममंदिराच्या आणि नेहरू घराण्याच्या आहेत. महत्त्वाचा मुद्दा तत्त्वाचा किंवा चर्चेचा नाही. हजारो वर्षांच्या गुलामगिरीत सामाजिक तर सोडाच, पण वैयक्तिक पुरुषार्थाची आशा मालावलेली आहे. कोणी मायबाप सरकार आपल्या झोळीत भीक घालायची म्हणते आहे ना? मग त्यांचा 'जयजयकार असो' याच बुद्धीने जनतेने समाजवादाचा जयजयकार केला. त्याच बुद्धीने आज नव्या घोषणा करत आहे. या लाचारांच्या समुदायांना समाजवादाकडे वळवण्यासाठी त्यातील मुखंडांना ताब्यात घेणे महत्त्वाचे होते. हे काम फारच सोपे. सत्तेतील उष्ट्या शितांचे कण त्यांच्याकडे फेकण्याचा नुसता आविर्भाव केला तरी निष्ठा विकण्यात काही हयगय होण्याची संभावना नव्हती. प्रत्यक्ष शिवाजीला विरोध करून विजापूर आणि अहमदनगरच्या दरबारात कुर्निसात घातलेल्यांची ही प्रजा. कसल्या निष्ठा, कसला तत्त्वविचार? यशवंतराव चव्हाणांनी कट्टर डाव्या पक्षांतही गेलेल्या बहुजन समाजातील मुखंडांना काँग्रेसकडे कसे वळवून आणले त्याच्या सुरस सत्य-आणि दंतकथा प्रसिद्ध आहेत, यशवंतरावांनी इतरांच्या पाठीवर थाप मारली तसेच समाजवादाचा झेंडा घेऊन पुढे निघालेल्या मुखडांनी चव्हाण आणि भाईबंदांच्या पाठीवर हात फिरवून त्यांना आपलेसे केले.

शहरी राजकीय नेत्यांच्या आर्थिक कार्यक्रमाला ब्रिटीशांनी तयार केलेल्या नोकरशाहीचा पाठिंबा मिळाला. जनसामान्यांचे नेते बाजारहाटात स्वस्तात मिळाले. आजच्या संध्याकाळच्या भाकरीची सोय करतो असे कोणी म्हणाला तर जनसामान्य लाचारपणे त्याचा झिंदाबाद करायला बसलेलेच होते. असा हा सारा मामला. तरीही हे घडून येण्यासाठी एका महत्त्वाच्या गोष्टीची मदत झाली.

गांधीवाद आणि समाजवाद ह्या एकमेकांना छेद देणाऱ्या विचारधारा आहेत. गांधीजी ईश्वर मानीत. स्वत:ला सनातनी हिंदु म्हणवत. वर्णाश्रमधर्मावर त्यांची श्रद्धा होती. माणुसकीच्या भावनेतून प्रयत्न करावेत आणि समाजातील विषमता दूर करण्यासाठी व्यक्तीच्या पातळीवर प्रयत्न करावेत, अशा कामासाठीसुद्धा लोकांत परिवर्तन घडणे महत्त्वाचे आहे, शासकीय कायद्याने असा बदल घडून येणार नाही असा त्यांचा ठाम विश्वास होता. जडवादी, धर्मविरोधी इतिहासाच्या प्रवाहात अपरिहार्यपणे कष्टकऱ्यांची सत्ता येऊन त्यातून राज्यसंस्थेचे विसर्जन व्हावे असे मानणाऱ्या सनातनी समाजवाद्यांत आणि

गांधीवाद्यांत समान भूमिका कोणतीच नव्हती. खरे म्हटले तर, समाजवादाचा स्वीकार करण्यापूर्वी या सगळ्या मुद्यांवर सार्वजनिक चर्चा घडवून आणणे आवश्यक होते. पण अशी चर्चा मुळात कधी झालीच नाही. समाजवाद म्हणजे 'सर्व निर्णायक प्रभुत्व शासनाच्या हाती' या कल्पनेला कोणी फारसा विरोध केलाच नाही. कॉंग्रेसच्या आवाडी अधिवेशनात Socialistic Pattern of Socieity म्हणजे 'समाजवादसदृश्य समाजपद्धती'चा ठराव मांडून पंडित नेहरूंनी समाजवादाच्या उंटाचे पिल्लू देशाच्या तंबूत आणून बसवले. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी राज्यघटनेतच बदल करुन भारतीय गणराज्य समाजवादी असल्याचे घोषित करून टाकले. १९५० साली राज्यघटनेचा स्वीकार करताना भारतीय नागरिकांच्या वतीने घेतलेल्या प्रास्ताविकाचा मजकूरच २६ वर्षांनी बदलवला गेला. आपला समाजवादावर विश्वास असल्याचे पक्षाच्या घटनेत स्पष्टपणे नमूद करावे, तशी जाहिर प्रतिज्ञा घ्यावी तरच एखाद्या पक्षाला राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळेल अशीही तरतूद झाली. पण, या सगळ्या नाटकीय घोषणांमागे कोणतीही निष्ठा नव्हती, अभ्यासही नव्हता. साहजिकच, चर्चेची कोणाला आवश्यकता वाटली नाही.

समाजवादाच्या रोगाची भारतात इतकी जबरदस्त लागण होण्याचे कारण भारतातील लोकतांत्रिक संस्थांचा दुबळेपणा होय. गावपंचायतींच्या पातळीवर गावातील व्यवहारापुरती जी काही लोकशाही असेल ती देशाला दिशा देण्याइतकी ताकदवान नव्हती. गावपंचायतीतही जमीनदार आणि उच्चवर्णीय यांचे प्रभुत्व होतेच. म्हणजे, गावातील लोकतंत्र हेही खऱ्या अर्थाने लोकांचे प्रतिनिधित्व करणारे नव्हते. याउलट, 'गाव महत्त्वाचा, गावातील कोणताही माणूस महत्त्वाचा नाही' विचारच सर्वमान्य आणि दृढ होता.

सर्व व्यवस्थांच्या केंद्राशी मनुष्य आणि त्याचा परिवार आहे; व्यक्तिस्वातंत्र्याइतकी पवित्र गोष्ट दुसरी कोणतीही नाही; संरक्षण, पोषण आणि प्रजनन या तीनही मानवार्थांच्या सिद्धीसाठी व्यक्ती समाजात रहाते, समाजाची काही बंधने स्वीकारते; पण समाजाचा व्यक्ती, स्वातंत्र्य, मालमत्ता यांवरचा अधिकार हा किमान असला पाहिजे, तो अरेरावी असता कामा नये, त्यांचे स्वरूप निश्चित असले पाहिजे, व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात पंचांनी विनाकारण दखल घेऊ नये अशा तत्त्वांनी गावातील पंचायत राज्यही कधीच चालत नव्हते. व्यक्ती ही क:पदार्थ, तिच्या आयुष्याला काहीच महत्त्व नाही; किंबहुना, या आयुष्यालाच काही अर्थ नाही, जन्मजन्मांच्या फेऱ्यात आपल्या कपाळी यावेळी आलेल्या जन्माच्या धर्मकर्माचे पालन वर्णाश्रमधर्माप्रमाणे करावे, जातीच्या रीतीरिवाजांनुसार करावे, रूढींना नाकारू नये ही नीतिमत्ताच रूढ होती. पंचांपुढे येणाऱ्या प्रकरणांचा निर्णय व्हायचा तो रूढींच्या शास्त्रार्थानेच. प्रत्यक्ष धर्मग्रंथांत, स्मृतींत आणि शास्त्रांत



काय लिहिले आहे हे समजणारे आणि सांगणारे फार दुर्मिळ, तेव्हा गावातील म्हाताऱ्याकोताऱ्यांच्या अनुभवानुसार जे काही पिढ्यान्‌पिढ्या चालत आले तीच रीती, तोच रिवाज, तीच रुढी, तोच धर्म आणि तीच नीतीमत्ता अशी सारी तुंबलेल्या डबक्यासारखी अवस्था पंचायत राज्याची होती. गांधीवाद्यांनी या डबक्यास मोठे गोंडस रूप देण्याचा प्रयत्न केला, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे जातिवर्चस्व चालवणारी ती एक हुकूमशाहीची व्यवस्थाच होती. गावाच्या पलीकडे सारीच राज्यव्यवस्था मध्ययुगीन सरंजामशाहीची, अरेरावी हुकूमशाहीची. ऐषआरामात आणि भोगविलासात लोळणारे राजे, दरबारातील कटकारस्थाने, प्रजेला लुटण्यासाठी अनन्वित अत्याचार आणि मधून मधून शेजारच्या प्रदेशात जाऊन लूट मारून येणे एवढीच काय ती राजकीय व्यवस्था इंग्रज भारतात आले त्यावेळी शिल्लक होती.

कुळासाठी व्यक्तीचा बळी द्यावा, गावापुढे कुळाची मातबरी सांगू नये, जातीपुढे गावाची मातबरी नाही. जातीसाठी माती खावी, पण जातिधर्माचे पालन करावे. आणि जातिधर्म म्हणजे परंपरेने, रूढीने जे रीतीरिवाज चालत आले असतील त्यांनाच नियतकर्म समजून ते योगबुद्धीने पार पाडावेत. गावात किंवा आसपास एखादा कोणी वेदशास्त्रपुराणांशी परिचय झालेला मिळाला तर तो काही उटपटांग शास्त्रार्थ सांगून बादरायण संबंध जोडून दाखवणार. धर्म काय याचे विवेचन पुराणिकांच्या कधीकाळी होणाऱ्या कथाकीर्तनातून व्हायचे. थोडक्यात, इंग्रजांच्या आगमनाच्यावेळी अवतारांची पूजा करणारा, राजाला विष्णुचा अवतार मानणारा, धर्मग्रंथ अपौरुषेय आणि प्रमाण मानणारा आणि व्यक्तीला क:पदार्थ मानणारा समाज येथे होता. त्यातही हजारबाराशे वर्षांच्या सततच्या परकीय आक्रमणाने गांजलेला, दारिद्र्य आणि निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा यांनी व्यापून टाकलेला समाज सर्वत्र होता.

धर्मवाद, जातिवाद आणि समाजवाद हे वरवर परस्परविरोधी वाटणारे विचार अंतरात वेगवेगळे नाहीत. हे सर्व विचार आतून सख्खे भाऊच आहेत. इंग्रजी अंमल आल्यानंतर नवीन शास्त्र आले, आगगाड्या आल्या, तारयंत्रे आली त्यांचा स्वीकार आम्ही केला. पण, त्याबरोबर पाश्चिमात्य तत्त्वज्ञान आणि सामाजिक दर्शन यांचा आमच्या भूमीवर पाय ठरू दिला नाही. समूहवाद, अवतारवाद आणि पोथीप्रामाण्य हे भारताच्या ऐतिहासिक परंपरेचे मुख्य घटक. गांधीजींच्या हिंदु अध्यात्मापेक्षा, आपले प्रभुत्व कायम टिकवण्यासाठी धडपडणाऱ्या सवर्णांना समाजवादच अधिक जवळचा वाटला म्हणून तो मान्यता पावला आणि स्वातंत्र्याच्या दुधात मिठाचा खडा पडला.

❐ ❐ ❐

# स्वातंत्र्य आले, स्वतंत्रता गेली

**स्वतंत्रतावादाचा उदयास्त**

१८ व्या शतकापासून युरोपमध्ये आणि विशेषत:, इंग्लंडमध्ये एका नव्या स्वतंत्रतावादी विचाराचा उदय होत होता. लॉक, ॲडम स्मिथ, मील, स्पेन्सर या विचारवंतांनी मनुष्यसमाजाविषयी एक वेगळा दृष्टिकोन दिला; मनुष्यप्राण्याची उत्क्रांती टोळी समाजात झाली, त्यातून व्यक्ती म्हणून मनुष्यप्राणी उत्क्रांत होत आहे, अशी मांडणी केली. राजेशाही आणि धर्मशाही या दोनही सत्तांच्या अधिकाराला स्वतंत्रवाद्यांनी आव्हान दिले. विश्वात अंतिम सत्य म्हणून जर काही असेल तर ते कोणा एकाला कोणा एका काळी गवसण्याची सुतराम शक्यता नाही; विश्वाचा शोध सर्वसामान्य माणसेच त्यांच्या नैसर्गिक प्रेरणांनुसार धडपड करत असताना, चुका करत करत पुढे नेतात; कोणाही हुकूमशहाचा, शासनाचा हस्तक्षेप हा निसर्गक्रमाविरुद्ध आहे, घातक आहे; शासन आवश्यक आहे हे खरे, पण शासनाची सत्ता कायद्याने निश्चित झालेली असली पाहिजे, कायद्यासमोर सर्व व्यक्ती एकसमान असल्या पाहिजेत; समाजासाठी व्यक्ती नाही, व्यक्तीच्या सोयीसाठी समाज आहे. अशी विचारसरणी स्वतंत्रतावादी मांडत होते. १९ व्या शतकाच्या अखेरीस स्वतंत्रतावाद्यांचा पराभव राष्ट्रवाद्यांनी आणि समाजवाद्यांनी केला. पण, ज्या देशात सरंजामशाही आणि समाजवाद यांच्या मधल्या काळात स्वतंत्रतावादी विचारांची एक लाट येऊन गेली ते देश हुकूमशाहीला बळी पडले नाहीत.

इंग्रजांच्या आगमनानंतर हिंदुस्थानात या स्वतंत्रतावादाचे वारे येऊ लागले होते. आगरकरांच्या पिढीतील समाजसुधारकांच्या विचारावर आणि लेखनावर मिल आणि स्पेन्सर यांचा प्रभाव जबरदस्त होता. कोण हा समाज, त्याच्या रूढींचा उगम काय? कोण्या ग्रंथात सांगितले आणि कोण्या रूढीने ते चालले? कोवळ्या वयातील असंख्य विधवांचे आयुष्य कोळपून टाकण्याचा समाजाला काय अधिकार? कोण हा समाज की एका सबंध जातीला गालिच्छ कामे करायला भाग पाडतो आणि वर त्यांना अमंगल म्हणून अस्पृश्य मानतो? त्यांना शिक्षण घेण्यासच काय, देवाचे दर्शन घेण्यासही प्रतिबंध करतो? कोणत्या आधाराने तरुण वयातील स्त्रियांना त्यांच्या मृत पतीच्या चितेत ढकलले जाते? असे प्रश्न उभे करून पहिल्या पिढीतील समाजसुधारकांनी व्यक्तीच्या सुखदु:खावर प्रकाशझोत टाकला आणि समाजनियम व्यक्तीच्या सुखासाठी आहेत, समाजाच्या स्वास्थ्यासाठी व्यक्ती नाही असे मांडायचा प्रयत्न केला. दुर्दैवाने,



स्वतंत्रतावादाला विरोध करण्यासाठी बहुसंख्य समाज कंबर कसून उभा राहिला. सनातनी धर्मनिष्ठ मंडळींनी स्वतंत्रतावाद्यांवर धर्मबुडवेपणाचा आरोप करून हलकल्लोळ केला. लोकमान्य टिळकांसारख्या प्रगल्भ विचारवंतानेदेखील 'म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो' अशी भूमिका घेऊन सुधारकांचा विरोध केला; आणि शास्त्र, धर्म, सामूहिक संस्था आणि त्यांची प्रतिष्ठा कोणत्याही व्यक्तीच्या सुखदु:खापेक्षा वरचढ असल्याचे प्रत्यक्षअप्रत्यक्षपणे दाखवले. हिंदुस्थानवर आक्रमण करण्यात यशस्वी झालेले मुसलमान आणि इंग्रज यांच्या धर्मात सामूहिक प्रार्थनेची परंपरा आहे ही त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे असे समजून सामूहिक अराधनेची पद्धती उभी करण्याचे त्यांनी प्रयत्न केले. आर्यसमाज, प्रार्थनासमाज इत्यादींनी सामाजिक विषमतेच्या प्रश्नाला हात न घालता केवळ सामूहिकतेलाच महत्त्व दिले. विवेकानंदप्रभृतींनी धर्म आणि राष्ट्र यांच्यावर जोर दिला आणि महात्मा गांधींनी राजकारण आणि अध्यात्म यांचा संगम केला.

या सर्व विचारधारांचा परिणाम काय झाला? स्पेन्सरविषयी लोकमान्य टिळकांनी १८९६ साली लिहिले. 'स्पेन्सर साहेबांनी अज्ञेयवादास जे स्वरूप आणले आहे त्यापेक्षा परिणत स्वरूप आमच्या ग्रंथातून या तत्त्वास प्राप्त झाले आहे. अशा स्थितीत स्पेन्सरच्या आधारावर आम्हास उपदेश करू पाहणे म्हणजे एक प्रकारे घरचे सोने विसरुन लोकांच्या रुप्यासाठी धाव घेण्यासारखे आहे.'

आपल्या देशी ग्रंथांपलीकडे कोणी काही बोलू लागला की त्यावर परधार्जिणेपणाचा आरोप करून तो इंग्रजांचा खुषमस्कऱ्या असल्याचे जाहिर करून टाकावे आणि इंग्रजांविरुद्ध बोलतो एवढ्याच आधाराने सनातनी धर्मवाद्यांस देशभक्तीचे प्रमाणपत्र द्यावे असे घडू लागले. आगरकर, जोतिबा फुले, रानडे, गोखले हे सारे इंग्रजांचे चमचे ठरले आणि त्यांच्याविषयी गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे असे कोणास वाटेनासे झाले. व्यक्तिवादाचा पराभव झाला, समूहवादाचा जय झाला आणि स्वराज्य आंदोलनाच्या राजकीय चळवळीने समाजसुधारणांचा विरोध करता करता सामान्य नागरिकाचे महत्त्व झिडकारून पूजा, विभूति ग्रंथप्रामाण्य आणि समूहवाद यांना पुन्हा एकदा उजाळा दिला. महात्मा गांधी अराजकवादी होते. व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या महत्त्वाविषयी त्यांची अनेक अवतरणे प्रसिद्ध आहेत. तरीदेखील, गांधीवादाचा एकूण परिणाम सामान्य माणसाला कमी लेखून विभूतिपूजा, ग्रंथप्रामाण्य आणि समूहवाद यांचा पाठपुरावा करणाराच झाला.

वैदिकांनी घालून दिलेल्या संघशक्तीच्या दर्शनाविरुद्ध पूर्वी वेदांतवाद्यांनी एक मोठे बंड उभे केले होते. पिंड आणि ब्रह्म यांचे अद्वैत मांडून ब्रह्माच्या शोधात कोण्या मध्यस्थाची गरज त्यांनी नाकारली होती. वेदांत्यांचे बंड वैदिकांनी मोडून काढले,

एवढेच नव्हे तर वेदान्ताची मांडणी करणाऱ्या उपनिषदांचा वेदांबरोबरच उल्लेख करून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट करून टाकले. वेदांती तत्त्वज्ञानाच्या पराभवानंतर पिंडाला विश्वाच्या केंद्रस्थानी आणणारे तत्त्वज्ञान इंग्रजांनी हिंदुस्थानात आणले आणि त्याचाही **वैदिकानी** पराभव केला, एवढेच नव्हे तर सामान्य माणूस महत्त्वाचा आहे हा विचार मांडणाऱ्यांच्या विरुद्ध सर्वसामान्य माणसेच उभी केली. जोतिबा फुले तीन तालुक्यांपलिकडे जाऊ शकले नाहीत, आगरकर झिजत झिजत अल्पवयात मरून गेले. आंबेडकरांचीही समाजाने उपेक्षाच केली, मग ते स्वत:च मार्क्सवाद; बुद्धवाद अशा सामूहिक तत्त्वज्ञानांकडे वळले.

स्वातंत्र्यानंतर शासकीय सत्तेचे महत्त्व आणि सवर्णाचे वर्चस्व वाढत गेले. त्याला समाजवादाच्या नावाचा गोंडस मुलामा चढवण्यात आला. प्रत्यक्षात, स्वातंत्र्यानंतर तयार झालेल्या अर्थव्यवस्थेला कोणताच तात्त्विक वास्तविक पाया नव्हता. वेळोवेळी, गरज पडेल त्याप्रमाणे, कालपरिस्थितीनुसार जे सोयीस्कर असेल ते पाहून, प्रभावशील व्यक्तींचा, संघटनांचा आणि गटांचा दबाव लक्षात घेऊन एकएक पाऊल सरकवण्याचाच हा कार्यक्रम होता. पण, एकूण परिस्थितीच अशी की, प्रभाव असलेले सर्वच गट आणि व्यक्ती, काही किरकोळ अपवाद वगळता, सरकार आणि नोकरशाही यांच्या हाती अधिकाधिक सत्ता एकवटण्याच्या पक्षाचे होते. व्यक्तीव्यक्तींच्या आर्थिक प्रेरणा, नफा कमावण्याची व्यक्तीमत्वाची व खाजगी क्षेत्रातील संस्थांची प्रवृत्ती यांचा उपयोग करून उन्मेषशाली अर्थव्यवस्था उभारता येईल असे फारसे कोणी मानत नव्हते; मानत होते ते बोलत नव्हते; असे बोलणाऱ्यांची उघडउघड कुचेष्टाच होत होती. खाजगी क्षेत्राला वाव द्यावा, असे कोणी म्हणण्याचा अवकाश की त्यावर फायदेखोर, भांडवलवाद्यांचा प्रवक्ता, अमेरिकन साम्राज्यवादाचा हस्तक इत्यादी शिव्यांचा भडीमार होत असे. नियोजनाची कल्पना आणि प्रत्यक्षात झालेली नियोजनाची कार्यवाही याबद्दल गंभीर प्रश्नचिन्हे उभी करण्याचे काम काही अर्थशास्त्रज्ञांनी केले. पण ते लवकरच बाजूला भिरकावले गेले. सारी सत्ता शासनात आणि नोकरशाहीत एकत्रित करणची प्रवृत्ती इतकी बलदंड होती की त्याविरुद्ध थोडी हूं का चूं करणारे कोपऱ्यात जाऊन पडत. त्यांना सरकारी समित्या, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था यांत काही स्थानच मिळत नसे. याउलट, सरकारशाहीच्या बाजूने बोलणाऱ्यांना सुलभतेने अनेक सोयीसवलती आणि पदे प्राप्त होत. देशापुढे समस्या अनेक, त्यातील कोणतीही एक समस्या घ्यावी, त्याच्यासंबंधी काहीही माहिती, आकडेवारी गोळा करावी; आणि ती समस्या दूर करण्यासाठी शासनाने 'यंव केले पाहिजे, त्यंव केले पाहिजे', असे म्हणावे, पण शासनाच्या हस्तक्षेपाचे समर्थन करावे



म्हणजे त्या अर्थशास्त्रज्ञास सरकारी समित्या आणि शिक्षण वा संशोधनसंस्थातील पदे पायघड्या घालून मोकळी होत.

स्वातंत्र्याच्या पहाटेस भारतात व्यक्ति-स्वातंत्र्यवादाचा कोठे क्षीणसा आवाजही ऐकू येत नव्हता; सारेच समूहवादी. देश समाजवादाच्या साथीच्या रोगास बळी पडला यात आश्चर्य काय?

समाजवादाच्या पाडावानंतरदेखील आम्ही अजून समूहवादाची कास सोडत नाही; सामान्य माणूस, त्याची सुखदु:खे, त्याच्या प्रेरणा महत्त्वाच्या मानत नाही. समूहवादाचा हा प्रभाव चालू राहिला तर पन्नास वर्षांच्या स्वातंत्र्याला नासवून तो सारा देश नाझी पद्धतीच्या हुकूमशाहीच्या जबड्यात पोचवल्याखेरीज राहणार नाही. आज आपण कळत नकळत नाझीवादाकडे चाललो आहोत; असेच, कळत नकळत समाजवादाच्या खाईत जाऊन पडलो.

## समाजवादाचा 'भटशाही' अवतार

समाजवादाचे अगदी मूलभूत सिद्धांत अंमलात आणायचे म्हटले तरी सर्व मालमत्तेचे राष्ट्रीयीकरण करून कारखाने, जमिनी या सगळ्यांचीच मालकी शासनाला हाती घ्यावी लागली असती. एवढे अवाढव्य काम सरकारला जमण्यासारखेही नव्हते. त्यामुळे सैद्धांतिक समाजवाद नाही; त्याऐवजी देशकालमानास सोयीस्कर अशी मिश्र व्यवस्था आणण्याची भाषा सुरू झाली.

रशियात चाललेल्या समाजवादाच्या प्रयोगाला काही सैद्धांतिक तात्त्विक बैठक होती; काही निष्ठा होती. कष्टकरी वर्गाच्या राज्याचे एक स्वप्न गंभीरपणे उराशी बाळगून एक नवा प्रयोग तेथे होत होता. असली काहीच निष्ठा भारतातील राज्यकर्त्यांपाशी नव्हती. पुढारी आणि नोकरदार यांची चलती राहावी, त्यांची सत्ता चालावी या दृष्टीने चालणाऱ्या पुष्कळशा परस्परविरोधी धोरणांना मिश्र अर्थव्यवस्था असे गोंडस नाव दिले गेले.

थोडक्यात, स्वातंत्र्याच्या शासनव्यवस्थेचे खरे स्वरूप म्हणजे राजकीय पातळीवर भटशाही, अंमलबजावणीत नोकरशाही, अर्थव्यवस्थेत ग्रामीण भारत व ग्राहक यांचे शोषण करणारी 'इंडिया'शाही आणि शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रात नोकरशाहीचाच वरचष्मा. आणि, हे सर्व गोरगरिबांनी निमूट स्वीकारावे आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात सोयीस्कर व्हावे म्हणून या सर्व संधीसाधू व्यवस्थेला नाव मात्र समाजवादाचे!

असा हा 'हायब्रीड' विचारांचा गोंधळ स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळातही होता हे आपण पूर्वी पाहिले आहे. स्वराज्यात प्रभुत्व कोणाचे, स्वराज्यात व्यवस्था काय असेल यासंबंधी एकवाक्यता किंवा स्पष्टता स्वराज्य आंदोलनाच्या काळातही नव्हती. इंग्रज येथून गेला पाहिजे एवढ्या एकाच बाबतीत सहमती असलेले सर्व - व्यक्ती, वर्ग, गट, समाज स्वराज्याच्या आंदोलनात सामील झालेले होते. महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्वामुळे त्या आंदोलनास गांधीवादाच्या तत्त्वज्ञानाचा पाया असल्याचा एक आभास तयार झाला होता. एवढेच काय ते!

स्वातंत्र्यानंतरच्या काळात गांधीवाद नाकारून समाजवादाकडे जाण्याचा निर्णय काही घासूनपुसून, अटीतटीची चर्चा करून झालाच नाही. स्वातंत्र्य मिळाल्यावर सत्तेच्या भोवती असे काही मोहक जाळे तयार झाले की गांधींच्या साऱ्या शिष्योत्तमांचा विनाप्रयास तपोभंग होउन गेला. निर्णयाचे अधिकार गांधीवाद्यांकडे राहिले नाहीत; काँग्रेस पक्षसंघटनेचेही महत्त्व संपले. राज्यसत्ता हाती असलेल्या पंतप्रधानांनी बोलावे आणि दळ चालावे अशी परिस्थिती तयार झाली.

## पंडितजींची काव्यात्मबुद्धी

तसे पंडित नेहरूंचे समाजवादाचे खूळ पुष्कळ जुने होते. १९३१ सालापासून स्वातंत्र्यानंतर देशात नियोजनव्यवस्था आली पाहिजे असे ते सातत्याने मांडत होते. काँग्रेस पक्षात एक नियोजन समिती नेमून त्याचे ते अध्यक्षही बनले होते. भारतातील नियोजनाचा आराखडा कसा असावा याचा नमुना म्हणून या नियोजन समितीने काही अहवालही प्रसिद्ध केले. त्याला कुणी फारसे महत्त्व दिले नव्हते. खरे संसार थाटण्याची वेळ येईपर्यंत परकऱ्या पोरींनी खड्यांची चूल आणि बोळकी मांडून भातुकलीचा खेळ खेळावा त्यातलाच 'काँग्रेस नियोजन समिती' हा प्रकार! पण, या सर्व समाजवादी नियोजनाच्या संकल्पनेलाही खुद्द महात्मा गांधींनी विरोध दर्शवला होता. 'स्वराज्यानंतरच्या व्यवस्थेबद्दल तुमची ही मते असतील तर स्वराज्यानंतरही तुमच्या विरूद्ध उभे रहावे लागेल.' असे त्यांनी नेहरूंना निक्षून बजावले होते.

समाजवादाच्या ऐन आमदानीत समाजवादाचा स्वीकार, नावापुरता का होईना, अनेक देशांनी केला. समाजवादी अर्थव्यवस्थेचा अंमल, खुद्द सोविएत युनियन आणि पूर्व युरोपातील राष्ट्रे सोडली तर बाकीच्या देशात फार गंभीरपणे झाला नाही. चीनमध्ये माओने कम्युनिस्ट क्रांतीस केवळ कामगारांचे नेतृत्व देण्याऐवजी ग्रामीण जनतेचेही नेतृत्व असावे असा आग्रह धरला. प्रत्यक्षात, नेतृत्व ना कामगारांचे, ना शेतकऱ्यांचे;



सारी सत्ता कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांच्या हाती; ते म्हणतील त्याला कामगारांनी, शेतकऱ्यांनी मान तुकवायचीच अशी परिस्थिती.

## समाजवादाचा काळाकुट्ट इतिहास

रशिया, चीन इत्यादी देशांत समाजवादी क्रांती झाली. हिंदुस्थानसारख्या मागास देशात समाजवादाचा स्वीकार झाला. याउलट, भांडवलशाही विकास झालेल्या देशात या समाजवादाचा फारसा स्वीकार झाला नाही, ही गोष्ट मोठी सूचक आहे. भांडवलशाही व्यवस्थेची पुरेशी प्रगती झाल्यानंतर तयार झालेला सशक्त कामगारवर्ग क्रांती करून समाजवादी व्यवस्था स्थापन करेल असे मार्क्सचे भाकित होते. अशी क्रांती प्रथम जर्मनीत होईल, त्यानंतर इंग्लंडमध्ये होईल असे क्रमवार भाकितही त्याने नोंदवून ठेवले होते. पण, हे सगळेच वेळापत्रक चुकले. जर्मनीत समाजवाद्यांनी उचल खाल्ली, पण त्याला नाझीवादाने नेस्तनाबूत केले. इंग्लंडमध्ये क्रांती अशी कधी झालीच नाही. पहिली समाजवादी म्हणवणारी क्रांती झाली ती रशियात. रशियातील क्रांतीत मुळात बोल्शेविक पक्षाचा हात किती होता याबद्दलच सज्जड शंका आहे. पहिल्या महायुद्धात पराभूत होऊन आलेले शिपाई, नागरिक आणि त्यातही प्रामुख्याने स्त्रिया यांच्या निदर्शनांतून झारशाही कोसळली आणि ती सत्ता बोल्शेविकांनी लाटली. घटनाक्रमाची अशी मांडणी प्रत्यक्ष घटनांशी अधिक सुसंगत असावी. चीनमध्ये दीर्घकाळ यादवीयुद्ध चालले आणि त्यात कम्युनिस्ट लाल सैन्याचा विजय झाला. दक्षिण अमेरिका, अफ्रिका या देशांत क्रांती घडली ती मुख्यत: वैयक्तिक सत्तालालसेपोटी उठाव करणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांच्या बंडामुळे. थोडक्यात, समाजवादाच्या एकाच विचाराने भारून जाऊन कामगार वर्गाने देशोदेशी क्रांतीच्या मशाली पेटवल्या हे वर्णन निव्वळ वाह्यातपणाचे आहे.

कोणत्या का पद्धतीने होईना, हाती सत्ता घेऊन समाजवादी व्यवस्था अंमलात आणण्याचे जेथे प्रयत्न झाले तेथे तेथे, बारकाईने पाहिले तर, सतत वाढती विक्राळ हुकूमशाहीच काय ती दिसते. समानता अशी काहीच दिसत नाही. समाजवाद प्रथम जर्मनीत किंवा इंग्लडमध्ये आला असता तर त्याला स्टॅलिनशाहीचे रूप आले नसते. लेनिन, स्टॅलिन यांना झारशाहीचा ऐतिहासिक वारसा स्वीकारावा लागला. चीनमधील कम्युनिस्टांनाही मध्यमयुगीन मांदारीनांचा वारसा पूर्णपणे नाकारता आला नाही. मुस्लीम देशातील समाजवादी हुकूमशहांनी इस्लाम आणि समाजवाद यांचे अभद्र मिश्रण तयार केले. सारा मामला सोयीसोयीने, वारा येईल तशी पा[illegible]फि[illegible]ण्याचा होता. रशियन

क्रांतीनंतर प्रथम आंतरराष्ट्रीय क्रांतीच्या वल्गना झाल्या. मग, तोंड वळवून एका देशात समाजवादी प्रयोग यशस्वी करण्याच्या घोषणा झाल्या, नियोजनाला शिरोधार्य मानले गेले आणि थोड्याच वर्षात 'नवे आर्थिक धोरण' स्वीकारून 'दोन पावले पुढे, तीन पावले मागे' नीती अवलंबण्यात आली. कधी नाझीवाद आपला सहोदर असल्याची घोषणा झाली, तर कधी तोच नाझीवाद कामगारवर्गाचा शत्रू असल्याची घोषणा झाली. कम्युनिस्ट पक्षाच्या अधिवेशनात स्वीकारलेल्या धोरणांविषयी कधी 'घूमजाव' होईल याचा काहीच भरवसा नसे. सारांश असा की, भारतात समाजवादाचा जो थातूरमातूर प्रयोग झाला त्याला निष्ठेची जोड नव्हती, यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. गेल्या शतकातील साऱ्या जगभरातील देशोदेशी झालेल्या समाजवादाचा प्रयोग हाच मुळी मार्क्सचे नाव वापरून उल्लू सत्तासाधूंनी घातलेला गोंधळ होता. मार्क्सप्रणित समाजवादी व्यवस्थेचा प्रयोग आजपर्यंत गंभीरपणे सुरूही झालेला नाही.

मार्क्सच्या क्रांतिसिद्धांताला पोलंडमधील रोझा लुक्झेंबुर्ग या समाजवादी स्त्रीने जबरदस्त विरोध केला होता. एकाच देशामध्ये भांडवलशाही फोफावली की तेथे बाजारपेठेत मालाला खप राहणार नाही, मंदी येईल, भांडवलशाहीची कुचंबणा होईल आणि त्यातून कामगार क्रांती उद्‌भवेल अशी भाकिते तर्कसुसंगत नाहीत; कुचंबणा झालेले भांडवलदार आपला माल, यंत्रसामुग्री आणि पुंजी मागास देशांत पाठवू लागतील; शेवटी, जगभराच्या बाजारपेठेत जेव्हा भांडवलाची कुचंबणा होईल तेव्हाच जागतिक पातळीवर भांडवलशाही मोडकळीस येईल आणि एक नवा, उत्पादकवर्गाचा समाज तयार होईल अशी दुरुस्ती तिनं सुचवली होती. कम्युनिस्ट पक्षातील ढुढ्ढाचार्यांनी ती फेटाळून लावली. रोझा लुक्झेंबुर्गच्या अंदाजाप्रमाणे भांडवलप्रधान देशातून मालाची आणि भांडवलाची निर्यात मागासलेल्या वसाहतींकडे होऊ लागली; त्यासाठी वसाहतींमध्ये राजकीय प्रभाव असण्याची गरज पडली तेव्हा साम्राज्यशाही व्यवस्था उभी राहिली. ती साम्राज्येही कोसळली आणि आता जागतिक व्यापारावरील सर्व बंधने काढून टाकण्याचे युग सुरू झाले आहे. त्यामुळे, श्रीमंत देशातील पैसा गरीब देशात वाहू लागला आहे. अशा गुंतवणुकीचे गरीब देशातही आरत्या ओवाळून स्वागत होत आहे. साम्राज्यवाद आणि समाजवाद यांनी मनुष्य समाजाची दोनशे वर्षे फुकट घालवल्यानंतर प्रगतीचा रस्ता खुला झाला आहे. हा जागतिक विकासाचा कालखंड पन्नासशंभर वर्षे चालला आणि त्यातून भांडवलाच्या कुचंबणेची समस्या तयार झाली तर कदाचित, मार्क्सप्रणित नाही पण लुक्झेंबुर्गप्रणित, जागतिक समाजवादी क्रांतीची पार्श्वभूमी इतिहासात पहिल्यांदा तयार होईल.

आजपर्यंत समाजवादाच्या नावाखाली जगभर जो गोंधळ घालण्यात आला तो विचारशून्य, तत्त्वशून्य सत्तापिपासूंचा निव्वळ वाह्यातपणा होता. आणि, या अशा साथीस हिंदुस्थान बळी पडला. लोकशाही परंपरा असलेल्या कोणत्याही देशात समाजवादाच्या साथीच्या रोगाची लागण झाली नाही, लागण झाली तरी फार काळ टिकली नाही. याउलट, भारतात ती साथ फैलावली. गांधीवादासारखी सशक्त परंपरा असतानाही या रोगाची लागण झाली आणि त्याचा प्रभाव इतका गंभीर व व्यापक झाला की पन्नास वर्षांच्या कालावधीत स्वराज्याचे स्वप्न आणि देशातील आर्थिक व सामाजिक घडी पार निकालात निघाली.

## काश्मीर प्रश्नावरील रशियन 'व्हेटो'ची किंमत

या व्यवस्थेस समाजवादाचे नाव पडले ते पंडित नेहरूंच्या आंतरराष्ट्रीय धोरणाला अवास्तव महत्त्व आल्यामुळे. कोणत्याही सत्ता गटामध्ये सामील न होणाऱ्या राष्ट्रांची तटस्थ चळवळ चौ एन् लाय, नासेर, सुकार्तो, मार्शल टिटो यांच्याबरोबर पंडित नेहरूंनी सुरू केली. याउलट, पाकिस्तान सरळसरळ अमेरिकन गटाचा पक्षपाती बनला. सिॲटो या अमेरिकावादी संरक्षण व्यवस्थेतही तो सामील झाला. शीतयुद्धाच्या त्या काळात अशा 'चमचा' राष्ट्रांची मोठी चंगळ होई. भारताच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघासमोर भिजत पडलेला काश्मीरचा प्रश्न अत्यंत महत्वाचा. संख्येने मोठ्या असलेल्या मुसलमान देशांचा पाठिंबा मिळवल्याने काश्मीर प्रश्नावर पाकिस्तान आमसभेत, एवढेच नव्हे तर सुरक्षा मंडळातही बहुमताच्या पाठिंब्याने आपले प्रस्ताव मंजूर करून घेण्याचा धोका असे. सुरक्षा मंडळातील पाच महासत्तांना मिळालेला नकाराधिकार हाच प्रत्येकवेळी भारताची बाजू सावरून नेत असे. भारताच्या विरुद्ध जाणारे ठराव उघड बहुमताने पसार होण्याचा प्रसंग यावा आणि रशियाच्या केवळ नकारात्मक मतदानामुळे तो ठराव बारगळावा असे अनेक वेळा झाले आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात भारत रशियाच्या गोटात दिवसेंदिवस ढकलला जाऊ लागला; तसतशी समाजवादाची भाषा अधिकाधिक प्रखर होऊ लागली.

❒ ❒ ❒

# सवर्णांच्या सोयीची लोकशाही

## जातीवाद प्रतिनिधित्वाचा प्रश्न

इंग्रजी आमदानीच्या काळात हिंदुस्थानी प्रजेत राजकीय प्रश्नांवर भिन्नभिन्न विचारप्रवाह होते. त्यातील तीन प्रमुख : सवर्ण हिंदु, मागासवर्गीय आणि मुसलमान.

सवर्ण हिंदुंमध्ये ग्रामीण आणि शहरी त्याखेरीज, पारंपारिक व्यवसाय चालवणारे व्यावसायिक होते. तसेच शहरी आधुनिक व्यावसायिकही होते.

मागासवर्गीयांतदेखील शहरी आणि ग्रामीण हा फरक होताच. शिवाय, त्यांच्यात अनेक जातिउपजाती होत्या. त्यांचे एकमेकांशी काही संबंध नसत. मुसलमानातही शहरी-ग्रामीण, परंपरागत-आधुनिक व्यावसायिक होते. त्याखेरीज, धर्मवादी आणि राष्ट्रवादी असे दोन उभे तट पडलेले होते. जाती आणि धर्म यांची कुंपणे अजिबात बाजूला ठेवणाऱ्या डाव्या, समाजवादी आणि साम्यवादी प्रणालीच्या लोकांचा आणखी एक छोटा पण महत्त्वाचा वर्ग होता.

महात्मा गांधी भारतात येण्यापूर्वी शहरी सवर्ण हिंदुनेतृत्वात जहाल-मवाळ असे दोन गट होते. गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस शहरी सवर्णांची राष्ट्रीय चळवळ बनली. टिळकांनंतर जहाल निष्प्रभ झाले. फैजपूर काँग्रेसपर्यंत त्यात ग्रामीण सवर्ण हिंदुंचा प्रवाहही येऊन मिसळला. त्यामुळे हिंदु तेवढे, शक्य तितक्या लवकर इंग्रजांनी या देशातून चालते व्हावे अशा बुद्धीचे राष्ट्रवादी असा एक समज झाला; तो आजतागायत चालू आहे.

राजकीय जबाबदाऱ्या वाढत्या प्रमाणात एतद्देशीय लोकप्रतिनिधींकडे सोपविण्याचा आपला इरादा इंग्रजांनी जाहीर केलेलाच होता. इंग्रज निघून जाताना कोणाच्या हाती सत्ता द्यावी, स्वतंत्र भारताचे प्रशासन कशा तऱ्हेने चालेल हे एकदा स्पष्ट झाले की सत्तेचे हस्तांतरण करण्यास इंग्रज तयार आहेत असे मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणांच्या घोषणेपासूनतरी वारंवार सांगितले जात होते. पण या दोन प्रश्नांचा समाधानकारक निर्णय लागणे सोपे नव्हते. शिवाय अशा, तऱ्हेचा सर्वमान्य निर्णय होऊच नये असा इंग्रजांचा प्रयत्न असणारच. निदान निर्णयास अधिकाधिक विलंब लागावा; सवर्ण, मागासवर्गीय आणि मुसलमान यांच्यात अधिकधिक फूट पाडावी, विद्वेष पसरवावा व अशा प्रकारे स्वातंत्र्याची चळवळ कमजोर करावी आणि मोडून काढावी असा काही इंग्रज अंमलदारांचा आणि मुत्सद्द्यांचा विचार असणारच.



पण, हे काही सर्वच इंग्रजांना लागू नव्हते. बहुसंख्य इंग्रज अंमलदारांना मुसलमान आणि मागासवर्गीय यांबद्दल विशेष जवळीक वाटे. मुसलमान धर्म ख्रिश्चन धार्मिकास अधिक जवळचा. दोघांच्याही धर्मग्रंथांचा आधार 'जुना करार'च आहे. दोन्ही धर्म बहुराष्ट्रीय आहेत. मुसलमान समाजाचे तत्कालीन पुढारी धनाढ्य, सुखवस्तू, आंग्लविद्याविभूषित आणि आधुनिक राहाणीचे होते. इंग्रजांना त्यांच्याशी संवाद साधणे सुकर वाटत असावे. गरीब, निरक्षर आणि मागासलेल्या बहुसंख्य मुसलमानसमाजाचे या पुढाऱ्यांशी तसे काहीच संबंध नव्हते. पण, हिंदुवर्चस्वाच्या भीतीपोटी बहुतेक साऱ्या मुसलमान समाजाचा पाठिंबा शहरी मुसलमान पुढाऱ्यांना मिळत असे आणि ही प्रवृत्ती अधिकाधिक वाढत गेली. १८५७ सालच्या बंडात इंग्रजांविरुद्ध बंडाचे निशाण घेऊन सर्वात आघाडीवर असणारा मुसलमान समाज आपली भूमिका बदलत गेला. टिळकांच्या काळापर्यंत हिंदु-मुसलमान आपसातील मतभेद परस्परसमजुतीने मिटवतील आणि दुसऱ्या बाजूस इंग्रजांशी संघर्षही चालू ठेवतील अशी भूमिका मुस्लिम नेत्यांनी घेतली होती.

## खिलाफत ते पाकिस्तान

महात्माजींच्या आगमनानंतर या भूमिकेत झपाट्याने बदल घडू लागला. गांधीजींच्या सर्वधर्मसमभावावर हिंदुत्वाचा प्रचंड प्रभाव आहे अशी मुसलमान समाजाची धारणा होती. रहिमाबरोबर राम मानणे हे इस्लामाच्या एकेश्वरी कडवेपणाला भावणारे नव्हते. गांधीजींची जीवनपद्धती, त्यांच्या प्रार्थना मुसलमानांना कधीही आपल्याशा वाटल्या नाहीत. आपण सनातनी हिंदू असल्याची महात्माजींची ग्वाही फक्त हिंदुंनाच सुखवीत असे. इतर समाजांच्या मनात त्याबद्दल मोठी शंका आणि चिंता होती. मुसलमानांचे प्रेम आणि पाठिंबा जिंकण्यासाठी गांधीजींनी खिलाफत चळवळ केली. खिलाफत बरखास्तीपासून बचावली नाही, हिंदूमुस्लिम ऐक्यही घडले नाही; उलट, मुसलमान-समाजास आपल्या वेगळेपणाची प्रखर जाणीव या चळवळीने झाली. या नव्या अस्मितेचा फायदा मुसलमान पुढाऱ्यांनी नंतर उठवला आणि त्यातून पाकिस्तानची निर्मिती होण्यास मोठी मदत झाली.

मुसलमानसमाजाला आपल्या वेगळेपणाची जाणीव झाल्यानंतर त्यांच्या पुढाऱ्यांनी इंग्रज राज्यकर्ते आणि अंमलदार यांच्या पाठिंब्याने एक मोठी समस्या उभी केली. देशात बहुसंख्य हिंदु आहेत. मुसलमान अल्पसंख्य आहेत. मागासवर्गीयांचा पाठिंबा मिळाला तरी ती युती हिंदुबहुसंख्येपुढे कमीच पडते. बहुतेक सर्व मतदारसंघांत सवर्ण हिंदुंचे

प्रतिनिधी आपण काय ते राष्ट्रवादी आणि भारतीय स्वातंत्र्याचे खरे चाहते असल्याचा आव आणून निवडून येतील. परिणामत:, कोणत्याही कायदेमंडळात हिंदु सवर्णांचे प्रतिनिधित्व अधिक राहील, लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणापेक्षाही अधिक राहील आणि त्यामुळे, बहुमताच्या जोरावर कायदेमंडळातील सर्व निर्णय सवर्ण हिंदुंच्या सोयीचेच होतील. मुसलमान समाजाची वेगळी जीवनशैली, वेगळा धर्मविचार, वेगळे नागरी रिवाज व वेगळे आर्थिक हिसंबंध पायदळी तुडवले जातील आणि स्वतंत्र भारतात मुसलमानांना दुय्यम नागरिकत्व येईल अशी जबरदस्त धास्ती पसरविण्यात मुसलमान पुढारी व इंग्रज राज्यकर्ते यांना अमाप यश आले. मुसलमानांना स्वतंत्र प्रतिनिधित्व असले पाहिजे, त्यासाठी मुसलमानांना आपले प्रतिनिधी निवडून देण्याची तरतूद पाहिजे, मुसलमानांनीच मुसलमानांचे प्रतिनिधी निवडावेत, अन्यथा बहुसंख्य हिंदु मतदार हिंदुचेच पित्तू मुसलमान निवडून कायदेमंडळात पाठवतील अशी मांडणी मुलसमान पुढाऱ्यांनी केली. यापलिकडे, कोणताही कायदा संमत करण्याची पद्धती अशी असली पाहिजे की ज्यामुळे केवळ हिंदुप्रतिनिधींच्या मताधिक्याने मुसलमान-समाजावर त्यांना कायदेकानून लादता येऊ नयेत. खुद्द महात्मा गांधींनीही त्याला फारसा विरोध केला नाही. मुसलमानांसाठी विभक्त मतदारसंघ देण्याचे गोलमेज परिषदेत घाटत होते. त्यावेळी गांधीजींनी त्याला विरोध दर्शविला; पण पुढे मागासवर्गीयांना विभक्त मतदारसंघ देण्याच्या कल्पनेला विरोध करण्यासाठी त्यांनी जसे प्राण पणाला लावले आणि निकराने प्रयत्न करून मागासवर्गीयांना विभक्त मतदारसंघ मिळू दिले नाहीत तसा प्रयत्न गांधीजींनी मुसलमानांच्या विभक्त मतदारसंघांना विरोध करण्यासाठी केला नाही. मागासवर्गीयांच्या विभक्त मतदारसंघाविरुद्ध उपोषण केले तर आंबेडकर नमतील, पण तसाच प्रयत्न मुसलमानांच्या विभक्त मतदार संघाविरुद्ध केला तर बॅरिस्टर जीनाप्रभृतींचे हृदय विरघळणार नाही असा त्यांचा हिशेब असावा.

मुसलमानांच्या विभक्त मतदारसंघातून पाकिस्तान निर्माण झाले; एक वेगळे राष्ट्र तयार झाले. स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांचा आढावा घेताना पाकिस्तान निर्मितीचे महत्त्व पहिल्या चारपाच वर्षांपुरतेच मर्यादित आहे. स्वातंत्र्यानंतर घटनासमितीतील मुसलमान नेत्यांनी मुसलमान समाजासाठी विभक्त तर सोडाच, राखीव मतदारसंघांचीही मागणी केली नाही. थोडक्यात, पाकिस्तानात न राहाता हिंदुस्थानात राहाण्याचा निर्णय घेतलेल्या मुसलमानांनी राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्याचे आपखुशीने मान्य केले. अलिकडे मुसलमानांना निदान नोकऱ्यांत राखीव जागा असाव्यात अशी मागणी पुढे येत आहे. ते सोडल्यास, पाकिस्तानच्या निर्मितीनंतर हिंदुस्थानात राज्यव्यवस्थेच्या नकाशात मुलमानसमाजाला काही वेगळे स्थान राहिलेले नाही.



## मागासवर्गीयांची समस्या

मागासवर्गीय समाजाची परिस्थिती मुसलमानांपेक्षा खूपच वेगळी. मुसलमान एका काळचे विजेते राज्यकर्ते असल्याने सवर्ण हिंदुंच्या मनात त्यांच्याविषयी तिरस्कार, घृणा असली तरी मोठा दबदबा असे. मागासवर्गीयांच्या बाबतीत त्यांच्या मनात केवळ तुच्छताच होती. मागासांना माणूस म्हणूनसुद्धा जगण्याचा अधिकार नाकारणाऱ्या धर्माला मागासवर्गीयांनी आपलाच मानावे, त्याला काही पर्याय नाही असा त्यांचा विचार असे. हजारो वर्षे दास्यात राहिलेल्या मागासांना स्वातंत्र्यानंतर माणूसपण मिळण्याची काही शक्यता त्यांच्या मनालाही शिवली नव्हती. काही समाजसुधारक अस्पृश्यता हटविण्यासाठी प्रयत्नशील होते. पण, त्यामागे मानवी हक्काच्या विचारापेक्षा करुणेची भावना अधिक. हिंदुसमाज विकसनशील आहे, तो नवीन नवीन विचार आणि आचारपद्धती यांना सामावून घेतो, हळूहळू यथावकाश अस्पृश्यतेसारख्या पद्धती दूर होतील, हळूहळू सारे काही ठीक होईल. त्याकरिता, जे काही प्रयत्न करायचे ते हिंदुधर्म, धर्मशास्त्रे आणि रूढी यांच्या चौकटीतच योग्य होईल; त्यासाठी परदेशी शासनाने हस्तक्षेप करू नये अशी सवर्ण हिंदूंची उघड भूमिका होती.

हिंदूप्रभुत्वाचा बागुलबुवा दाखविला म्हणजे मुसलमान समाज एकसंघ होऊन उभा राहील; मागासवर्गीयांची तशी परिस्थिती नव्हती. आंबेडकर, राजा राजभोज अशी फुटकळ नेतेमंडळी प्रचंड अडचणींना तोंड देत त्यांच्या त्यांच्या जातिसमाजांचे संघटन करण्याचा प्रचंड प्रयत्न करीत होते. सारा समाजच विद्याविहिन. कारण, त्यांच्या धर्मानेच त्यांना विद्येचा हक्क नाकारलेला. इतिहासाच्या अपघाताने म्हणा, कर्मधर्मसंयोगाने म्हणा, त्या काळातील कोणत्याही समाजास भूषण वाटावे असा एक विद्वान डॉ. आंबेडकरांच्या रूपाने मागासवर्गीयांतील एका जातीस मिळाला. पण, त्यांचे नेतृत्व इतर मागास जातींना, एवढेच काय, महाराष्ट्राबाहेर इतर राज्यांतही फारसे मान्य नव्हते. दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धा यांनी ग्रासून टाकलेल्या या समाजाच्या वतीने आंबेडकरांनी केवळ आपली विद्वत्ता, प्रतिभा आणि अथक प्रयत्न यांच्या जोरावर इंग्रजी शासनाच्या मदतीने एक परिवर्तनाचा प्रचंड प्रयत्न केला.

'मागासांचा राष्ट्रीय चळवळीस पाठिंबा तर नाहीच, विरोध आहे. इंग्रजांनी राज्य जिंकले ते मागासवर्गीयांतून भरती झालेल्या पलटणींच्या ताकदीवर. इंग्रज येथे राहाण्यातच आणि त्यांचे राज्य टिकून राहण्यात मागासांना स्वारस्य आहे. इंग्रज तडकाफडकी निघून गेले तर सारे मागास सवर्ण हिंदूंच्या कराल ऐतिहासिक पकडीत पुन्हा सापडतील, हे टाळण्यासाठी इंग्रजांनी काही विशेष तरतूद केली पाहिजे.' असे ते आग्रहाने आणि

सातत्याने मांडत. कोणत्याही समाजाचे अधिकृत प्रतिनिधी नसताना इंग्रज सरकारने आंबेडकरांना गोलमेज परिषदांस बोलवून घेतले.

इंग्रजांच्या मनांतही हिंदू सवर्णांविषयी जवळीकीची भावना नव्हती. लक्षावधी देव, गायींची पूजा, सतीची चाल, विधवांचा छळ असले प्रकार चालविणाऱ्या या समाजाबद्दल त्यांचे मत प्रतिकूलच होते. त्यांच्या हातून मागासवर्गीयांना कधीकाळी न्याय मिळेल असे इंग्रज राज्यकर्त्यांनाही वाटत नव्हते.

आंबेडकरांच्या या काळातील मांडणीबद्दल आणि प्रयत्नांबद्दल अलिकडे बरेच काहूर माजले आहे. खरे म्हटले तर या भूमिकेत नवे असे काहीच नव्हते. ही भूमिका महात्मा जोतिबा फुल्यांच्या मांडणीशी सुसंगत होती. 'बहुसंख्य लोक निरक्षर आहेत, देश जातिभेदाने फुटाफूट झालेला आहे, इंग्रजांच्या राज्यामुळे बहुजनांना निदान विद्येचे दरवाजे उघडत आहेत, प्रथमच समाजसुधारणा करुन जातिभेद संपवून 'एकमय लोक' या अर्थी 'राष्ट्र' तयार व्हावे व नंतरच 'राष्ट्रीय स्वातंत्र्याचा आणि इंग्रजांना काढून लावण्याचा लढा हाती घ्यावा. अन्यथा, स्वातंत्र्यानंतर पुन्हा नव्या स्वरूपातील पेशवाई तयार होईल, इंग्रजांच्या राज्यामुळे अज्ञानदारिद्र्याच्या गर्तेतून बाहेर पडण्याची शूद्रातिशूद्रांना मिळालेली संधी विरुन जाईल आणि ते फिरून एकवार स्वतंत्र भारतात भटशाहीचे गुलाम बनतील.' ही म. फुल्यांचीही मांडणी होती.

हुकुमी बहुसंख्येत असलेल्या सवर्णांना राष्ट्रवाद सोयीचा होता. देशप्रेमाच्या प्रखर भावनेच्या दबावाखाली इतर सर्व अंतर्गत संघर्ष दाबून टाकावेत असा त्यांचा प्रयत्न होता. राजकीय स्वातंत्र्य महत्त्वाचे, इतर सर्व गोष्टी दुय्यम; सवर्ण तेवढे देशभक्त आणि मागासवर्गीयांचे प्रवक्ते सारे गुलामगिरीचे समर्थक, इंग्रजांचे पित्तू, 'खाविंदचरणारविंदी मिलिंदायमान' होणारे देशद्रोही अशी त्यांची भूमिका असे. आजही थोड्याफार फरकाने हिंदुत्ववादी अशी मांडणी करतात. यातून सवर्ण हिंदुंना आजही मागासवर्गीयांच्या प्रश्नाची किती तोटकी जाण आहे हेच दिसून येते.

## मागासांच्या विविधत्वाचा प्रश्न

राज्यघटनेत दलितांचा आवाज उठण्याची व्यवस्था असावी यासाठी इंग्रजांनी जाहिर केलेल्या योजनेत मुसलमानांप्रमाणेच मागासवर्गीयांनाही विभक्त मतदारसंघ देण्यात आले. एक 'हिंदु' म्हणून हिंदुसमाजाचे विभाजन टाळणे आपले धार्मिक कर्तव्य आहे अशी घोषणा करून गांधीजींनी त्यांचे येरवडा येथील प्रख्यात उपोषण सुरू केले. आंबेडकरांनी उभ्या केलेल्या चळवळीची खरी ताकद त्यांच्या प्रतिभेची होती. पण खुद्द मागासांनाही



त्यांची भूमिका ठाऊकही झालेली नव्हती. त्यांना पाठिंबा तसा किरकोळ होता. गांधीजींचे उपोषण सुरू झाल्यानंतर सर्व देशात क्षोभ उठला. त्याला तोंड देण्याइतका लोकमताचा पाठिंबा आंबेडकरांना उभा करता आला नाही. नाइलाजाने, आपला विभक्त मतदारसंघाचा आग्रह त्यांनी सोडून दिला आणि केवळ राखीव मतदारसंघावर संतोष मानला आणि गांधीजींचा उपास अखेरीस सुटला.

त्यावेळी झालेल्या करारात आंबेडकरांनी एक महत्त्वाची अट घातलेली होती. मागासांसाठी राखीव ठेवलेल्या मतदारसंघात उभे राहण्यासाठी उमेदवारांची एक प्राथमिक निवडणूक व्हावी. या प्राथमिक निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार फक्त मागासवर्गीय मतदारांनाच असावा अशी ती तरतूद होती. तिचा अंमल कधी झालाच नाही. येरवड्यातील उपोषणानंतर बरीच वर्षे गाजावाजा झालेला जातिप्रतिनिधित्वाचा प्रश्न (Communal Representation) तात्पुरतातरी निकालात निघाला.

दुसऱ्या महायुद्धानंतर सारीच परिस्थिती बदलली. इंग्रजांनी सत्तेचे हस्तांतर करण्याचा एकतर्फी निर्णय घेतला. विभक्त मतदारसंघ मिळालेल्या मुसलमान समाजास पाकिस्तान तोडून घेणे दंडेलीच्या जोरावर सहज शक्य झाले. स्वतंत्र हिंदुस्थानच्या राज्यघटनेत मागासांसाठी राखीव मतदारसंघाची तरतूद करण्यात आली. मुळात केवळ वीस वर्षांपुरती मर्यादित असलेली ही योजना ४० वर्षांपर्यंत वाढविण्यात आली आणि ती संपुष्टात येण्याची आज काहीही चिन्हे दिसत नाहीत.

जातिप्रतिनिधित्वाच्या प्रश्नाचा सारा आढावा घेताना एका गोष्टीचे मोठे नवल वाटते. हिंदुस्थानी लोकशाहीतील निवडणुका इंग्रजी धाटणीच्याच असणार असे सर्वांनी गृहीतच धरलेले दिसते. इंग्लंडमधील निवडणुकी भौगोलिक मतदारसंघात होतात. ज्या उमेदवाराला त्याच्या मतदार संघात सर्वाधिक मते मिळतील तो निवडून आला असे समजले जाते. ही पद्धत अशीच्या अशीच हिंदुस्थानात नकलवायची आहे अशी त्या काळातील साऱ्याच नेत्यांची आणि पंडितांची कल्पना झालेली दिसते. जगभरच्या वेगवेगळ्या देशांत यापेक्षा वेगळ्या अशा निवडणुकीच्या पद्धती आहेत आणि इंग्रजी निवडणूकपद्धतीपेक्षा इतर पद्धती हिंदुस्थानसारख्या खंडप्राय, जातिप्रथेने भंगभंग झालेल्या देशास अधिक साजेशा आहे याकडे कोणाचेच कसे लक्ष गेले नाही? हे आश्चर्यजनक आहे त्यापेक्षाही विचित्र आहे.

## प्रमाणशीर प्रतिनिधित्व

काही देशांत मतदार उमेदवारांना मते देत नाहीत, पक्षाला मिळणाऱ्या मतांच्या प्रमाणावरून त्या पक्षाला द्यायच्या लोकप्रतिनिधींची संख्या ठरते. पक्षाने निवडणुकीपूर्वीच तयार केलेल्या उमेदवारांच्या यादीतून अग्रक्रमाने सुरुवात करून पक्षाला मिळालेल्या

या प्रतिनिधींच्या संख्येइतके उमेदवार कायदेमंडळात जातात. या पद्धतीत केवळ स्थानिक पाठिंब्यावर किंवा जाती, नाती यांच्या आधाराने निवडून येणे शक्य होत नाही. आपापल्या मतदारसंघातील मतदारांना खूष करण्यासाठी प्रकल्प राबविणे, नोकऱ्या देववणे, कामे करून देणे असली मतदारसंघ सांभाळण्याची भ्रष्टाचारी कामे करण्यात कुणालाच स्वारस्य राहात नाही. शिवाय, एका मताची माणसे केवळ भौगोलिकदृष्ट्या विखुरलेली असली तरी त्यांना थोडेफार तरी प्रतिनिधित्व कायदेमंडळात मिळू शकते.

## पक्क्या बहुमताची पद्धत

भौगोलिक मतदारसंघ असलेल्या देशातही, त्यातले त्यात जास्त मते मिळविणारा उमेदवार विजयी जाहिर करण्याची इंग्रजी पद्धत सर्वत्र प्रचलित आहे असे नाही. फ्रान्समध्ये विजयी होण्यासाठी, वैध मतदानापैकी निदान निम्मी मते मिळणे आवश्यक असते. मतदानाच्या पहिल्या फेरीत कोणाही उमेदवारास आवश्यक तितकी मते न मिळाल्यास मतदानाची दुसरी फेरी घेण्यात येते. काही देशांत फक्त पहिल्या दोन उमेदवारांनाच दुसऱ्या फेरीत उमेदवार समजले जाते; पण हे उमेदवार खालील क्रमाच्या कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा देऊन आपण माघार घेऊ शकतात. ही योजना थोडी खार्चिक खरी, पण मोठी लाभदायी आहे. या पद्धतीत प्रत्यक्ष बहुमत नसलेल्या, पण त्यातले त्यात वरचढ असलेल्या एका समाजास वेगवेगळ्या जातीच्या किंवा मताच्या उमेदवारांना उभे करून त्यांची मते फोडून आपलाच उमेदवार निवडून आणण्याचे खेळ किरकोळ मताधिक्याच्या जोरावर खेळता येत नाहीत. हा एक फायदा. याखेरीज दुसरा फायदा म्हणजे, वेगवेगळ्या पक्षांना परस्परांच्या बलाबलाचा काहीही अंदाज नसताना आघाड्या बनवणे भाग पडत नाही. आपल्याकडील अनुभव सांगतो की आघाडया चालत राहातात, त्यातील घटकपक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवून अनेक वर्षे उलटून गेली म्हणजे वेगवेगळ्या मतदारसंघात घटक पक्षांचा जनाधार प्रत्यक्षात किती आहे याचा अंदाज घेण्याची काहीही शक्यता राहात नाही. तयार होणाऱ्या आघाड्या, तत्त्वशून्यच नव्हे तर वास्तविक जनाधाराशी विसंगत बनतात. फ्रेंच पद्धतीत मतदानाच्या पहिल्या फेरीत सारेच पक्ष आपापले उमेदवार स्वतंत्रपणे उभे करू शकतात. पहिल्या फेरीत मिळालेल्या मतांचा अंदाज घेऊन मग सारे पक्ष हातमिळवण्या करण्यास, आघाड्या बांधण्यास सुरुवात करतात.

## इंग्रजी पद्धत सवर्णांना सोयीची

सवर्ण हिंदु नेत्यांना इंग्रजी निवडणूक पद्धत अत्यंत सोयीची वाटली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या वर्णांच्या समाजांचे, काही अपवाद सोडल्यास सर्व मतदारसंघांत प्राबल्य



आहेच. पूर्ण बहुमताची अट नसली तर त्यातले त्यात बहुसंख्य असलेला समाज आपले उमेदवार सर्वदूर निवडून आणू शकतो. तीसचाळीस टक्के मतदारांच्या पाठिंब्यावर तो पन्नाससाठ टक्के जागा जिंकू शकतो. इंग्रजी निवडणूक पद्धत सवर्ण हिंदूंनी आपले प्राबल्य राहाण्याकरिता जाणीवपूर्वक स्वीकारली हे सिद्ध करण्यास भरपूर पुरावा आहे.

मागासवर्गीयांनी ही पद्धत बिनतक्रार का स्वीकारली हे कोडेच आहे. आंबेडकरांसारख्या कायदेतज्ज्ञास निवडणुकीच्या विविध पद्धतींची चांगली जाणकारी असली पाहिजे. त्यांनीतरी इंग्रजी पद्धतीऐवजी प्रमाणशीर प्रतिनिधित्व किंवा स्पष्ट बहुमत असण्याची आवश्यकता का मांडली नाही ? येरवड्यात महात्मा गांधीचे उपोषण चालू असताना सारा वादविवाद झाला तो एका बाजूस विभक्त मतदारसंघ, तर दुसऱ्या बाजूस राखीव मतदारसंघ एवढ्या दोन प्रणालीत झाला. प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची मांडणी घटनासमितीत श्री. मिनू मसानी यांनी केली; त्याआधी कोणी केल्याचे दिसत नाही. प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाचा पर्याय समोर आला असता तर बॅ. जीना यांनी विभक्त मतदारसंघाचा आग्रह सोडला असता असे मानण्यास भरपूर वाव आहे. म्हणजे परिणामतः, कदाचित् देशाची फाळणीही टळू शकली असती. कोणत्याही धर्माच्या, जातीच्या एवढेच नव्हे तर मताच्या किंवा योजनेच्याही पुरस्कर्त्यांना त्यांच्या भूमिकेस देशभर इतस्ततः विखुरलेल्या जनमताचा एकूण आधार लक्षात घेऊन प्रतिनिधित्व मिळाले असते तर राखीव मतदार संघांमुळे देशात वाढत असलेली फुटीरता टळू शकली असती.

जातिभेद नष्ट होण्यापूर्वीच स्वातंत्र्य आले आणि महात्मा फुल्यांच्या भाकिताप्रमाणे पेशवाई तयार झाली. सवर्णांनी लोकसभा, विधानसभा यांतील भक्कम बहुमत आपल्या हाती राहील याची मजबूत व्यवस्था केली. आणि साऱ्या स्वातंत्र्याचेच अपहरण केले. नकली बहुमताच्या जोरावर सवर्णांच्या स्वार्थाचा ब्राह्मणी समाजवाद त्यांनी जोपासला आणि कष्टकऱ्यांना आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळविले.

स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळात जातिप्रतिनिधीत्वाचा प्रश्न सर्वाधिक गाजत होता. स्वातंत्र्यानंतर याच प्रश्नाच्या चुकीच्या सोडवणुकीमुळे स्वातंत्र्याचे अपहरण करणे सर्वात प्रबल अशा सवर्ण हिंदू समाजास शक्य झाले. समाजवादाचे भांडे फुटल्यावर आता हाच वर्ग पुन्हा धर्मजातीच्या आरोळ्या ठोकून सत्ता फिरून एकदा हाती घेण्यास सज्ज झाला आहे.

शेतीत तयार होणारी बचत उद्योगधंद्यांना लागणाऱ्या भांडवलनिर्मितीकरीतां काढून नेण्याची कडेकोट व्यवस्था झाली. कारखानदारीची उभारणी शेतीतील बचतीच्या आधारानेच होऊ शकते. शेतीतून उद्योगधंद्याकडे बचत गेली पाहिजे यांत काही वाद नाही. वर्णजातिव्यवस्थेने विभागलेल्या देशात याच प्रक्रियेचा अर्थ शेतकऱ्यांकडून बचत

काढून घेऊन ती शहरी कारखानदारांकडे पोचवणे असा झाला. जेव्हां जेव्हां जेथे जेथे शेतकऱ्यांच्या हाती दोन पैसे राहिले तेथे तेथे त्यांनी शेतीचे उत्पादन वाढवले छोटी मोठी कारखानदारीही सुरू केली. सर्वच अर्थचक्राला गती मिळाली. याउलट, जेथे जेथे सरकारी कारखानदारी गुंतवणूक झाली ते ते प्रदेश मागास राहिले. शेतीमालाचे शोषण आणि परंपरागत ग्रामीण व्यवस्थेचा विद्ध्वंस करून नेहरूकारखानदारीचा पाया घातला गेला.

पण एवढ्याने भागत नाही. कारखानदारीसाठी जमिनीचीही गरज असते. एका मोठ्या जमीनदार वर्गाने कूळकायद्याचा फायदा घेऊन आपली ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या कचाट्यातून सुटका करून घेतली. बहुजनविरोधी आर्थिक धोरणे लोकांच्या गळी उतरवता यावीत यासाठी जमिनीच्या फेरवाटपाच्या कार्यक्रमाचा मोठा गाजावाजा झाला. जमीनसुधार करणाऱ्यांचा हेतू विषमता नष्ट करण्याचा नव्हता हे उघड आहे. कारण शहरी संपत्तीचे फेरवाटप करण्यासाठी यत्किंचितही प्रयत्न झाला नाही. कारखाना काढायचा असो, धरण बांधायचे असो, रस्तारेल्वे असो पहिली गरज जमिनीची. ती जमीन विनासायास स्वस्तात आणि तातडीने उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने अत्यंत विक्राळ सुलतानी कायदे तयार केले. शासनाला जी कोणती जमीन मनास येईल ती सरळसरळ काढून घेता येईल, त्यासाठी सरकारच्या मनास येईल तो मोबदला. त्याबद्दल न्यायालयात फेरविचाराची मागणीही करता येणार नाही. सगळा कायदाच संविधानाचा भंग करणारा आहे म्हणून कोणाला उच्च न्यायालयातही दाद मागता येऊ नये अशी तरतूद घटनेतील ९ व्या परिशिष्टाने करण्यात आली. अगदी पहिल्या घटनादुरुस्तीपासून क्रमाक्रमाने नागरिकांचा मालमत्ता कमावण्याचा, ठेवण्याचा आणि तिची वासलात लावण्याचा मूलभूत हक्क संपवण्यात आला.

स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांत शेती परवडत नसल्याने जमिनींची धारणा घटत गेली, तिचे तुकडे पडत गेले, जमीनीचा आकार शेतीलायक राहिला नाही म्हणजे तीही फूंकून टाकून हजारो खेडूत शहराकडे जगण्यासाठी जाऊ लागले. त्याबरोबरच कोणत्या ना कोणत्या प्रकल्पासाठी सरकारने जमीन संपादन करून काढून घेतली म्हणून निर्वासित झालेले खेडूतही भणंग होऊन शहरातील झोपडपट्ट्या आणि फूटपाथ यांवर जाऊन राहू लागले.

❒❒❒



# एक दुसरी फाळणी

## भांडवल निर्मितीचा प्रश्न

औद्योगिक विकासासाठी अनेकविध गोष्टींची आवश्यकता असते. आज प्रगत समजल्या जाणाऱ्या देशांत प्रथम शेती, वाहतूक आणि व्यापारी व्यवस्थात क्रांती घडली. त्यानंतर औद्यौगिक क्रांतीस सुरवात झाली. नवनवीन संशोधन आणि तंत्रज्ञान यामुळे सर्वच अर्थचक्राला प्रवर्तित गती मिळाली. वसाहतींशी होणाऱ्या असमान व्यापारामुळे आणि सरळसरळ शोषणामुळे प्राथमिक भांडवलाची गरज भागण्यास मोठी मदत झाली.

१९४७ सालच्या हिंदुस्थानात औद्योगिकीरणाचा ओनामाही झाला नव्हता. कलकत्ता, मुंबई आणि मद्रास यांसारखी बंदराची शहरे व्यापारात काहीशी पुढे गेली होती. देशभराचा कच्चा माल खरेदी करून या बंदरांत आणावा आणि तो परदेशी पाठवावा हा व्यापार बऱ्याच विलायती कंपन्या करीत असत. त्यासाठी इंग्रजी शासनाने रस्ते, रेल्वे, टपाल आणि तार इत्यादी व्यवस्था उभ्या केल्या होत्या. व्यापारी जातीतील काही धाडसी उद्योजकांनी या व्यापारात प्रवेश केला होता; एवढेच नव्हे तर, जेथे जेथे नफा वाढवण्याची शक्यता होती तेथे कच्च्या मालावर थोडीफार प्रक्रिया करण्यातही पुढाकार घेतला होता. अमेरिकेतील यादवी युद्धामुळे आपल्या देशातील कापसाला मागणी एकदम वाढली. त्यामुळे कापसाची निर्यात आणि त्याबरोबर जिनींग, सूत, कापड इत्यादी गिरण्याही उभ्या राहू लागल्या होत्या. जमशेटपूर येथील टाटाचा पोलादाचा कारखाना आणि तसे काही अपवाद सोडल्यास, देश अक्षरशः सुईपासून सर्वच औद्योगिक उत्पादनांसाठी विलायती आयातीवर अवलंबून होता.

अशा अवस्थेत संरचना वाहतूक, व्यापार आणि कारखाने यांची एकत्रित क्रांती एकदम घडून यायची कशी? गांधीजींचे या विषयावरचे अर्थशास्त्र स्पष्ट होते. विलायती वस्तूचा वापर शक्य तितका टाळावा, गावे स्वावलंबी बनवावीं, गावातील बलुतेदारी आणि हस्तोद्योग यांना उत्तेजन द्यावे, यातूनच हळूहळू संरचना, वाहतूक, संचार, व्यापार आणि औद्योगिकरण सहजरीत्या उगवेल आणि फोफावेल; आणि या औद्योगिकीरणात सर्वसाधारण देशवासीयांचा सहभाग असेल. गावांची शेती ही संपत्तीचे मुख्य साधन असल्याने त्यातून भांडवलाची निर्मिती होईल. पारंपरिक तंत्रज्ञानात यथावकाश अनुभवाने आणि प्रयोगाने सुधारणा होत जातील. विलायती प्रगत तंत्रज्ञान आणि उत्पादन यांच्याशी जीवघेणी स्पर्धा करण्याचा प्रसंग टळेल. देशाची अर्थव्यवस्था पुरेशी

सशक्त आणि समर्थ झाली म्हणजे त्यानंतरच आंतरराष्ट्रीय देवघेवीचा सदासर्वकाळ अनंतकाळापर्यंतचा आराखडा होता असे मानण्याला काहीच जागा नाही.

गांधीजींचे अर्थशास्त्र सर्व ग्रामीण बलुतेदार आणि कष्टकरी समाज यांना सुखकर झाले असते. परंतु, राजकर्त्या पक्षातील सर्वात प्रभावी गट शहरी, पाश्चिमात्य शिक्षण घेतेलेला आणि पश्चिम जगाशी घनिष्ठ संबंध ठेवण्यास मोठा उत्सुक होता. गावाचे स्वावलंबन, ग्रामोद्योग इत्यादी कल्पना त्यांना गांधीजींचे अव्यवहारी खुळेपण वाटत असे. अशा तऱ्हेने आर्थिक प्रगतीला दीर्घकाळ लागेल; औद्योगिक क्रांती तर कित्येक शतके येणार नाही; परदेशातील कारखानदारी आणि तंत्रज्ञान यांच्याशी तुलना करता हिंदुस्थान सतत मागेच पडत जाईल. गांधीजींचे अर्थशास्त्र म्हणजे चाकाचा शोध नव्याने लावण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे; अशा संथ आणि दीर्घसूत्री प्रक्रियेची आवश्यकता नाही त्याऐवजी, विलायतेतील अद्ययावत् कारखानदारी आणि तंत्रज्ञान आयात करून परदेशांच्या बरोबरीची कारखानदारी उभारावी. त्यासाठी आवश्यक खाणी, लोखंड, पोलाद, उर्जा इत्यादी जड उद्योधंदे शासनाच्या मोठ्या छलांगीत उभे करावे; अशा संरचना उभ्या राहिल्या म्हणजे भारतातील आर्थिक विकासाची चक्रे सुरू होतील, गती घेतील आणि झेपावतील; आणि, भारत लवकरच प्रगत राष्ट्रांच्या पंक्तीत सन्मानाने मिरवू शकेल अशी ही विचारधारा होती.

अशा तऱ्हेने जलदगती-प्रगतीचा नमुना समाजवादी रशियाने उभा केला असल्याची त्याकाळी सर्वदूर समजूत होती. तेथे लोकशाही नसेल पण तेथील आर्थिक विकासाची झेप हा एक अद्भुत चमत्कारच वाटत असे. १९१८ साली भारताइतकाच मागास असलेला प्रचंड भूप्रदेश नियोजनाच्या सहाय्याने आणि जड उद्योगधंद्याच्या विकासावर भर देऊन केवळ तीन दशकात जगातील सर्वश्रेष्ठ आर्थिक राजकीय सत्तांत मोजला जाऊ लागला. एवढेच नव्हे तर, दुसऱ्या महायुद्धात पाश्चिमात्य राष्ट्रांपेक्षा अधिक जोरदार मुसंडी मारून हिटलरचे साम्राज्य धुळीस मिळवण्याची मोठी बहादुरी समाजवादी रशियाने दाखवली. समाजवाद म्हणजे केवळ आर्थिक विकास एवढेच नव्हे तर, एक नवीन सामाजिक न्याय, आणि विषमतानिर्मूलनाची, सर्व मानवतेच्या भल्याची व्यवस्था आहे अशी त्या काळात भल्याभल्यांची खात्री पटली होती.

समाजवादी पद्धतीच्या आर्थिक विकासप्रक्रियेचा अवलंब काँग्रेस पक्षातील शहरी लॉबीस जसाच्या तसा पचला नसता. सारी मालमत्ता राष्ट्राची व्हावी आणि बाकी सारे नागरिक कामगार व्हावेत हे त्यांना परवडण्यासारखे नव्हते. झपाट्याचा कारखानदारी विकास व संरचना आणि जड कारखानदारी यांची छलाँग हे तर पाहिजे,



पण सर्व मालमत्तेचे राष्ट्रीयीकरण मागणारा बावनकशी समाजवाद मात्र नको अशी त्यांची दुटप्पी भूमिका होती. लोकशाहीही असावी आणि समाजवादही असावा असे मोठे मोहक आणि राजस रूप राज्यकर्त्या पक्षातील प्रभावी गटाने दिले.

शहरी सवर्णांच्या हितसंबंधांची हात मिळवणी दलित समाजाच्या ध्येय धोरणांशी झाली हे एक मोठे अद्‌भूत प्रकरण आहे. गावाची व्यवस्था म्हणजे निव्वळ गटारगंगा, तेथे दलितांना न्याय व सन्मान मिळणे शक्य नाही; त्यांनी शिकावे, शहराकडे जावे, आधुनिक औद्योगिक अर्थव्यवस्थेत नोकऱ्या धराव्यात अशी दलित चळवळीच्या नेत्यांची धारणा होती. गांधीजींच्या ग्रामराज्यापेक्षा शहरी औद्योगिकी विकासाची समाजवादी संकल्पना त्यांना अधिक जवळची वाटली. दलित चळवळ 'सरकारी नोकरी'अभिमुख झाली आणि 'भटशाही'समाजवादाची आणि तिची पत्रिका जुळली.

पंडित नेहरुंचे नेतृत्व या गटाच्या पथ्यावर पडले. नेहरू इंग्लंडमधील त्यांच्या शिक्षणाच्या काळात हॅरॉल्ड लास्की इ. अनेक डाव्या विचारवंतांच्या संपर्कात आलेले होते. शास्त्रीय विचार म्हणून नव्हे तर, एक समाजव्यवस्था म्हणून त्यांना समाजवादाचे मोठे भावनिक आकर्षण वाटे. रशियाच्या एका जुजबी भेटीनंतर समाजवादी नियोजनाला पर्याय नाही अशी त्यांची खात्री पटली होती. प्रत्यक्ष स्वातंत्र्य हाती येण्यापूर्वी १७ वर्षे काँग्रेसने स्थापलेल्या एका नियोजन समितीचे ते अध्यक्ष बनले आणि भावी संसाराची स्वप्ने पाहणाऱ्या परकऱ्या पोरीच्या उत्साहाने नियोजनाचा भातुकलीसारखा खेळ त्यांनी मांडून दाखवला होता.

## वरकड मूल्याचा सिद्धांत

मार्क्सवादी सिद्धांताप्रमाणे, वरकड मूल्याचे उत्पादन श्रमिकांच्या, कामगारांच्या शोषणातून होते. पण ज्या देशाचे औद्योगिकीकरण झालेलेच नाही तेथे प्राथमिक भांडवलनिर्मिती तरी कशी व्हावी? औद्योगिकीकरणासाठी लागणाऱ्या वरकड मूल्याचा स्रोत कोणता? समाजवादी रशियात या विषयावर मोठे वादंग झडले. त्याचा निष्कर्ष अखेर स्टॅलिनने विरोधकांचा शिरकाव करून केला. औद्योगिकीकरणाकरता लागणारे भांडवल शेतीतील गुणाकारानेच तयार होते हे स्पष्ट झाल्याने जमीनदार वर्गावर टँक पाठवून, शेतीचे सामूहिकीकरण करून समाजवादी रशियाने या प्रश्नाचे मोठे रक्तबंबाळ उत्तर दिले होते. अशा तऱ्हेची स्टॅलिनी कारवाई हिंदुस्थानात जवळजवळ अशक्यप्राय होती. १९३० सालानंतर ग्रामीण भागातील नेतृत्व अगदीच उपेक्षा करण्यासारखे राहिलेले नव्हते. हिंदुस्थानी औद्योगिकीकरणाकरिता समाजवादी पद्धतीच्या शेतीची लूट करण्याच्या

धोरणास त्यांनी कडवा विरोध केला असता. भांडवल येणार कोठून या विषयावर सार्वजनिक चर्चा अशी घडलीच नाही. या प्रश्नाचा निर्णय कागदोपत्री कधी झालाच नाही. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र शहरी पाश्चिमात्य गटास अनुकूल अशा घटना घडत गेल्या.

## संरक्षणासाठी औद्योगिकीकरण

स्वातंत्र्य उगवले ते फाळणी घेऊनच. लक्षावधी निर्वासितांचा लोंढा, सर्वदूर उसळणारे भीषण जातीय दंगे, काश्मीरमध्ये पाकिस्तानबरोबर उद्‌भवलेले युद्ध, हैद्राबाद, जुनागड यांसारख्या संस्थानांना वळणावर आणण्यासाठी करावी लागलेली कार्यवाही आणि कम्युनिस्टांनी जागोजागी केलेले सशस्त्र उठाव या घटनांमुळे देशातील सैन्य सामर्थ्यवान, अत्याधुनिक शस्त्रसामर्थ्याने सुसज्ज असले पाहिजे या विषयावर कोठे दुमत नव्हते. भारताचे सर्व सैन्य सर्वकाळ व्यावसायिक सैनिकांचे राहिले आहे. त्यांची व्यावसायिक नीतिमत्ता इतकी जहाल की सुभाषचंद्र बोसांच्या आझाद हिंद फौजेतील सैनिकांना भारतीय लष्करात सामावून घेण्यास त्यांनी स्पष्ट नकार दिला. गांधीजींचे ग्रामोद्योगाचे अर्थशास्त्र अर्थकरणात वाजवी असो किंवा नसो देशाच्या संरक्षण व्यवस्थेत ते संपूर्णता गैरलागू आहे; देशाचे स्वातंत्र्य टिकवायचे असेल तर त्यासाठी अत्याधुनिक अद्ययावत् शस्त्रसामुग्री, तोफा, रणगाडे, लढाऊ विमाने सैन्याजवळ असणे आवश्यकच आहे. देशाच्या जवानाला दुय्यम दर्जाच्या बंदुका घेऊन आघाडीवर पाठवणे अन्यायाचे होईल, एवढेच नव्हे तर देशद्रोहाचे कृत्य होईल. शस्त्रास्त्रासाठी सर्वकाळ जागतिक महासत्तांवर अवलंबून राहणे धोक्याचे ठरेल. शस्त्रास्त्रे उत्पादन करण्याचे सामर्थ्य शक्य तितक्या झपाट्याने कमावले पाहिजे. त्यासाठी जड कारखानदारीचा अग्रहक्काने विकास करणे आवश्यक आहे. या सगळ्या मुद्दयांवर कोठेही विरोधी सूर नव्हता. अगदी कट्टर गांधीवाद्यांनाही आधुनिक व्यावसायिक सैन्याच्या कल्पनेस थोडासुद्धा विरोध केला नाही. गांधीजींच्या संकल्पनेतील अहिंसक प्रतिकाराचा विकल्प तर सोडाच पण शस्त्रास्त्रांपेक्षा मनुष्यबळाच्या वापरावर? रमर देणारी रणनीती प्रभावी ठरू शकते आणि देशास परवडू शकेल असेही कोणी मांडले नाही. व्यावसायिक भारतीय सेनेस नेफा हद्दीवर गाठोड्यातील पीठ खाणाऱ्या सैन्याने नमवले आणि त्यानंतर अमेरिकेसारख्या सुसज्ज राष्ट्रांच्या सैन्यास जियापच्या व्हिटनामी पोरांनी धूळ चारली. असल्या रणनीतींची शक्यता तपासलीही गेली नाही. यामागेही लष्करी व्यवस्थापनाइतकाच शहरी पाश्चिमात्य गटाचा एक हितसंबंध गुंतलेला होता. सर्व देश व्यापून टाकणाऱ्या युद्धास तोंड देण्याची त्यांची तयारी नव्हती. लंडन शहरावर



झालेल्या बॉंबहल्ल्याप्रमाणे भारतातील शहरांवर हल्ले झाले तर त्यात शहरी उद्योगधंद्यांचे नुकसान झाले असते. ते त्यांना कोणत्याही परिस्थितीत नको होते. देशाच्या संरक्षणाच्या गरजेविषयी ते मोठ्या वीरश्रीच्या गर्जना करीत. पण ही सारी युद्धे सरहद्दीवरच राहावीत, आतल्या भागास त्याची तोशीस लागू नये, त्यासाठी सैन्याजवळ शस्त्रसज्जता अद्ययावत असावी म्हणजे ते शत्रूचा बंदोबस्त काय करायचा तो सरहद्दीवरच करुन टाकतील. अशी ही देशाच्या संरक्षणाची नीती होती. थोडक्यात, संरक्षणाच्या गरजेचे निमित्त करून गांधीअर्थनीतीला भगदाड पडले आणि 'एक वेडगळ अव्यवहारी आदर्शवादी विचार' म्हणून ही त्यांची कल्पना कोपऱ्यात ढकलली गेली.

## ग्रामीण नेतृत्वाची खच्ची

स्वातंत्र्यानंतरच्या अगदी पहिल्या काही वर्षांत आणखी एक मोठी उलथापालथ घडली; पण ती इतक्या सुप्तपणे आणि सहजपणे की तिचे महत्त्व त्या काळी तरी कोणाला जाणवले नाही. १९४८ च्या, गांधी-वधानंतर झालेल्या दंगलीत महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांतील ब्राह्मणवर्ग गाव आणि शेती सोडून शहरात आला. दक्षिणेतही अनेक राज्यांत ब्राह्मणवर्गाच्या जुलमाविरोधी उभ्या केलेल्या चळवळी जोम धरत होत्या. अशा प्रदेशातही ब्राह्मणसमाज गाव आणि शेती सोडून निघाला एवढेच नाही तर, आपला प्रदेश सोडून दुसऱ्या प्रदेशात परागंदा झाला.

स्वातंत्र्याच्या सुरूवातीच्या काळात 'कसेल त्याची धरणी' या तत्त्वाची मोठी हाकाटी शहरी बुद्धिमंत आणि डावे पक्ष यांनी चालवली होती. 'श्रमणाऱ्याची गिरणी' असा कोणी फार आग्रह धरला नाही. शहरी मालमत्तेच्या मालकीतील विषमता दूर करण्याचा प्रयत्न तर जवळजवळ झालाच नाही; ग्रामीण भागात मात्र एकपाठोपाठ एक कायद्यांचा अंमल सुरू झाला. प्रथम कूळकायदे, मग जमीनदारीविरोधी कायदे, मग त्यानंतर कमाल जमीनधारणा कायदे, शिवाय, सावकारी निर्मूलन कायदे या सर्वांचा परिणाम म्हणून खेडेगावातील ब्राह्मण आणि सुखवस्तु सवर्णांचे एका अर्थाने उच्चाटन झाले. पण, त्याहीपेक्षा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या भोवऱ्यातून त्यांची सुटका झाली आणि नवीन शहरी औद्यागिक व्यवस्थेत व राजकीय सत्तेत प्रभुत्व मिळविण्यास मोकळे झाले. त्यामुळे कुळांचा, शेतकऱ्यांचा व शेतमजुरांचा प्रत्यक्ष लाभ किती झाला हा प्रश्न येथे प्रस्तुत नाही. परंपरेने चालत आलेली स्वयंपूर्ण गावांची व्यवस्था या कायद्यांनी मोडकळीस आणली. गावांचे नेतृत्व करणारा वर्ग निर्वासित होऊन गाव सोडून गेला. अशा उच्चाटनाच्या वेळी काही वेदना त्या साऱ्या समाजाला सोसाव्या लागल्या असतील, हे निर्विवाद;

पण गावातील ब्राह्मण, जमीनदार व सावकार यांच्या उच्चाटनाचे दोन मोठे विलक्षण परिणाम घडून आले.

गावातील जमीनदार व सावकार शेतकऱ्याची लूट करत होते हे निःसंशय, पण त्याबरोबर गावासंबंधी त्यांच्या काही जबाबदाऱ्या होत्या. अडीअडचणीच्या वेळी, विशेषतः दुष्काळाच्या काळात सर्व गावाला त्यांचाच आधार असे. असा आधार प्रत्यक्षात दिला जात असो वा नसो सावकार, जमीनदार व ब्राह्मण यांनी केलेल्या शोषणाचा लाभ बहुतांशी गावातच राहत असे ही गोष्ट नक्की. जमीनदारीविरोधी आणि सावकारीविरोधी कायद्यांमागील खरी प्रेरणा शेतकरीशेतमजुरांच्या कल्याणापेक्षा ग्रामीण जमीनदार-सावकारांना मिळणारा लाभ शहरांपर्यंत पोचावा ही असावी. जमीनदारी गेली, सावकारी संपली; सहकारी संस्था आल्या, बँकांचे जाळे विणले गेले पण ज्या शोषणाविषयी एवढी हाकाटी होत होती ते कायमच राहिले एवढेच नव्हे तर, दिवसेंदिवस अधिक कठोर होत गेले. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जे वाढत गेली. खेड्यातून शहराकडे जाणारा जनांचा प्रवाह वाढतच राहिला सावकारीजमीनदारीविरुद्ध कायदे करणाऱ्यांचा हेतू काहीही असो, त्याचा फायदा ग्रामीण गरीबगुरीबांना मिळाला नाही, एका नव्याने पुढे आलेल्या वर्गाला त्याचा राजकीय, आर्थिक लाभ मिळाला.

या सर्व कायद्यांमुळे ब्राह्मण, जमीनदार, सावकार या समाजांना काही फारशी तोशीस पडल्याचे दिसत नाही. ब्राह्मण विरोधी दंग्यांमुळे निर्वासित झालेले ब्राह्मण शहरात आले. हे दंगे त्यांच्या दृष्टीने इष्टापत्तीच ठरली. बुडत्याचा पाय सतत खोलात नेणाऱ्या शेतीत ते केवळ परंपरेच्या अभिमानाने आणि वारशाच्या लोभाने 'शेंबडातील माशी' प्रमाणे अडकून पडले होते. त्यातून त्यांची अचानक सुटका झाली. शहरातील कोणतीही नोकरी आणि कोणताही व्यवसाय केला तरी उत्तमातील उत्तम शेतीपेक्षा तो अधिक किफायतशीर ठरतो याचा त्यांनी अनुभव घेतला. त्यांची वैयक्तिक आणि कौटुंबिक परिस्थिती सुधारली हा भाग अलहिदा, त्याहीपेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे या समाजास खेडेगावाबद्दल आणि तेथील लोकांच्या दुःखाबद्दल सहानुभूती तर राहिली नाहीच, उलट एक दुःस्वास तयार झाला.

कूळकायदे आणि जमीनदारीविरुद्ध कायदे यामुळे तर सावकारजमीनदारांचे नुकसान होण्याएवजी त्यांची मोठी चंगळच उडाली. बिहार व आंध्र प्रदेश या राज्यांत मोठे मोठे जमीनदार होते. त्यांच्या हजारो एकराच्या जमिनींसाठी मोबदल्याचा दर अगदी किरकोळ होता; पण हातात आलेली रक्कम त्या काळाच्या मानाने चांगली सज्जड होती. हे डबोले घेऊन ही मंडळी शहरवासी झाली. हातात आलेल्या पैशाच्या आधाराने



काहींनी व्यापारउदीम, उद्योगधंदे सुरू केले; काहीजण राजकारणात उतरले, त्यांची भरभराट इतकी झाली की अनेक प्रकरणी जमीनदारी उच्चाटनाच्या सर्वात वीरश्रीपूर्ण गर्जना मूळ जमीनदार समाजातील मंडळी करू लागली.

## इंडिया विरुद्ध भारत

इंग्रजांच्या आर्थिक धोरणामुळे जवळजवळ शतकभर खेड्यातून शहराकडे जगण्यासाठी लोकांचा ओघ वहातच होता. खेरीज, खेडेगावातील सामाजिक अन्यायाला तोंड देणे असह्य झाल्यामुळे दलितांतील एक मोठा प्रवाह शहरांकडे वाहात होता. या साऱ्या घटनांचा एकत्र परिणाम असा झाला की गावातील 'कुलकां'चे आपोआप उच्चाटन झाले; पण त्याबरोबर, गावाच्या अर्थव्यवस्थेची तरफदारी आणि संरक्षण करणारे कोणीच उरले नाही. शहरी सुशिक्षितांना लोकशाही समाजवादात स्वारस्य होतेच. आता त्यांच्या बरोबरीने पारंपरिक नेतृत्व देणारा ग्रामीण वर्गही सामील झाला. देशाची एका अर्थाने एक नवी 'अभौगोलिकक फाळणी' झाली. शहरी आंग्लविद्याविभूषित, आधुनिक अर्थकारण आणि कारखानदारी यांची तरफदारी करणारा 'इंडिया' आणि ग्रामीण भागातील नेतृत्वहीन, गरीब, बहुतांशाने निरक्षर, शेतीवर जीवन कसेबसे कंठणारा 'भारत' अशी विभागणी झाली. या फाळणीमुळे स्टॅलिनी पद्धतीची औद्योगिक भांडवलाची निर्मिती शस्त्रास्त्रे न वापरता करण्याचा मार्ग खुला झाला.

स्वातंत्र्यपूर्व काळात अखंड पंजाब राज्यात हिंदु-मुसलमान-शिख शेतकऱ्यांच्या युनिअनिस्ट पार्टीचे राज्य होते. सरकारातील एक प्रमुख नेते सर छोटुराम यांनी एक बिल मांडले होते. कर्जाच्या वसुलीपोटी सावकारांना शेतकऱ्यांच्या जमिनीवर जप्ती आणता येणार नाही अशी त्यात तरतूद होती.

काँग्रेस पक्ष लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली प्रमुख विरोधी पक्ष होता. त्याने सावकारांच्या मूलभूत हक्कावर गदा आणू नये, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल अशी भूमिका घेतली होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अशी मांडणी कोणीच केली नाही. खेडेगाव नेतृत्वहीन झाले. शेतकरी वर्गातील त्यातल्या त्यात वरच्या जातीतील लोकांकडे नेतृत्व गेले. पण त्यांची गावाची निष्ठा अगदीच तकलादू होती. आर्थिक आणि राजकीय लालचीने त्यांना अंकित करून 'यशवंतराव' उभे करण्यात इंडियाला काहीच अडचण आली नाही. समाजवादाच्या झेंड्याखाली आपण पारंपरिक ब्राह्मणी वर्चस्वाला उखडून टाकत आहोत असाच त्यांचा विश्वास होता. ग्रामीण भागातील नवे नेतृत्व इंडियाला अंकित झाले आणि कुऱ्हाडीचे दांडे गोतास काळ बनले.

## सारी अन्नान्नदशा

५० वर्षांपूर्वी स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी दीडशे वर्षांच्या इंग्रजी शोषणानंतर शेती आणि बलुतेदारी पिळून निघाल्यामुळे सगळी गावे खंक झाली होती. त्याबरोबरच, संपूर्ण देशात अन्नधान्याचा तुटवडा पडला होता.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिंदुस्थानातून अन्नधान्य दोस्त राष्ट्रांच्या फौजांच्या पुरवठा करण्याकरिताच पाठवले जाई. त्यामुळे, सरकारजवळ धान्याचा साठा म्हणून काही राहिला नव्हता. अशाच परिस्थितीत बंगालमध्ये भयाण दुष्काळ पडला आणि त्यात लक्षावधी लोक अन्नान्न करीत मेले; साऱ्या देशात रेशनींगमुळेच काय तो अन्नधान्य, साखर, रॉकेल इत्यादी वस्तूंचा पुरवठा होत होता. युद्धकाळात परदेशातून आयात करून नि:कृष्ट प्रतीचा मिलो, मका रेशनिंग दुकानातून पुरवण्यात आला. फाळणीपूर्वी दोन वर्षे देशभर दंगेधोपे माजले होते. बंगाल, बिहार, पंजाब इत्यादी राज्यांत जातीय दंगे शहरांपुरते मर्यादित न राहाता सर्वदूर ग्रामीण भागातही पसरले होते. निर्वासितांचे थवे निवारा शोधीत होते. त्यांच्यासाठीही पुरवठ्याची विशेष धान्यव्यवस्था करावी लागत होती. दंगलग्रस्त राज्यांतील धान्याचे उत्पादन घटल्यामुळे रेशनव्यवस्था आणि निर्वासित यांच्यासाठी धान्याचा पुरवठा इतर राज्यांतून खरेदी करूनच शक्य होते. सारांश, फाळणीच्या आधीही देशातील अन्नधान्य परिस्थिती अत्यंत बिकट होती.

देशाची फाळणी आणि कोट्यवधींच्या संख्येने वाहणारे निर्वासितांचे ओघ यांमुळे अन्नधान्याची परिस्थिती अधिकच बिकट बनली. पश्चिम पाकिस्तानकडे गेलेल्या प्रदेशात पंजाबचा पश्चिम भागही गेला. इंग्रजांच्या काळात धरणे बांधून आणि कालव्यांची जाळी करून पंजाबचा हा भाग साऱ्या देशाचे धान्याचे कोठार बनला होता. त्या तुलनेने, भारताकडे राहिलेला पंजाब - म्हणजे आजचा पंजाब, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश ही राज्ये - हा शेती उत्पादनांच्या बाबतीत मागासलेलाच होता. पश्चिम पाकिस्तानच्या निर्मितीबरोबर, सर्व देशाला मोठ्या प्रमाणावर धान्य पुरवणारा भाग निघून गेला. पूर्वेकडील भागातही अशीच परिस्थिती तयार झाली. ताग हे बंगालमधील प्रमुख उत्पादन. किंबहुना, साऱ्या जगाला तागाचा पुरवठा होई तो बंगालमधून. पण, तागाची शेती पूर्व पाकिस्तानमध्ये आणि गिरण्या भारताकडे अशी फारकत झाली. फाळणीनंतर काश्मिरमधील युद्ध सुरू झाले, त्याकरिताही धान्यपुरवठ्यावर आणखी ताण पडला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तीनचार वर्षे अन्नधान्याचा तुटवडा आणि महागाई यांनी देशभर नुसते थैमान घातले.



## 'रेशनींगला सुट्टी'चा प्रयोग

शेकडो वर्षे चालू राहिलेल्या भारतीय शेतीची प्रकृती धुमश्चक्री, आक्रमण, लूट या साऱ्यांना तोंड देत असताही शाबूत राहिली होती. १९४९-५० साली, दोन वर्षे बरा पाऊस पडला, धान्याची सुबत्ता झाली. रफी अहमद किडवाई यांनी सारी रेशनींग व्यवस्था बंद करून अन्नधान्याची बाजारपेठ खुली करण्याचे धोरण आखले आणि पार पाडले. धान्याचे किरकोळ बाजारपेठेतील भाव खाली येऊ लागले. त्यामानाने, शेतकऱ्यांना मिळणारे घाऊक भावही चांगले राहिले, ही व्यवस्था जर चालू राहिली असती तर, कदाचित्, स्वातंत्र्याला कधी ग्रहण लागलेच नसते. पण, अन्नधान्याची मुबलकता, खुला बाजार आणि स्वस्ताई या गोष्टी साठेबाजी व काळा बाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांना परवडणाऱ्या नव्हत्या. किडवाई साहेबांच्या धोरणाने देशभर पसरलेल्या रेशनिंग खात्यातील नोकरशहांच्या तर पोटावरच पाय आला. साठेबाजी आणि बाजारावरील दबाव अशा त्यांच्या कारवायांमुळे धान्याच्या किंमती वाढू लागल्या आणि शेवटी भडकू लागल्या. अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी, निदान सुरूवातीच्या काळात तरी, शासनाने काही हातचा साठा ठेवणे आवश्यक होते. तो का ठेवला गेला नाही? त्यामागेही काही दुष्टबुद्धि नियोजन होते का निव्वळ प्रशासकीय गबाळेपणा आणि राजकीय अदूरदर्शीपणा हे सांगणे कठीण आहे.

याच प्रकारची पुनरावृत्ती पुढे २८ वर्षांनी झाली.

१९७८-७९ साली जनता पक्षाच्या कारकीर्दीत चौधरी चरणसिंग यांनी साखर खुली करण्याचा प्रयत्न केला. साखरेचे भाव कोसळले, कारखानदार हवालदिल झाले त्यावेळी, सरकारने साखरेचा साठा बांधण्याचा प्रयत्न केला असता तर भाव सावरले असते आणि पुढच्या हंगामापासून साखरेची बाजारपेठ स्थिरावलीही असती. पण, शासनाला एवढा दम कुठून निघायला? बाजारपेठ खुली असली की त्यात काही काळ गोंधळ माजू शकतो; साठेबाज खुलेपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात; पण शेवटी, बाजारपेठ आणि ग्राहकराजा शिस्त लावतात. अर्थात्, यासाठी खुलेपणावर दृढ विश्वास आणि धैर्य आवश्यक आहेत. ते जनता पक्षाच्या नेत्यांत नव्हते. साहजिकच, साखर कारखादार लॉबीने आरडाओरड सुरू केली. त्यात पुन्हा एकदा नोकरदारांनी आपले साम्राज्य चालू राहावे यासाठी भर घातली. शेतीमालाच्या बाजारपेठेतील खुलीकरणाचा हा दुसरा प्रयोगही फसला.

याच्या नेमका उलटा प्रयोग इंदिरा गांधींनी केला. साऱ्या अन्नधान्याच्या बाजारपेठेचे राष्ट्रीयीकरण केल्याची त्यांनी घोषणा केली. असली अचरट योजना यशस्वी

होण्याची काहीही शक्यता नव्हती. काही महिन्यातच राष्ट्रीयीकरण रद्द करावे लागले. नोकरशहांना अर्थव्यवस्थेवर सत्ता हवी असते; पण ती व्यवस्था चालवण्याची जबाबदारी नको असते. व्यावसायिक, उद्योजक, शेतकरी, कामकरी इत्यादींनी अर्थव्यवस्था चालवावी आणि नोकरशहांना या व्यवस्थेची मर्मस्थाने तेवढी हातात ठेवून आपल्या पोळ्या पिकवून घेता याव्यात अशी त्यांची अपेक्षा असते. अर्थातच, किडवाई, चरणसिंग यांचे खुलीकरणाचे प्रयत्न आणि इंदिरा गांधीचा राष्ट्रीयीकरणाचा डाव, दोन्ही फसले. सर्व देशभराच्या आर्थिक चलवनवलनाची मुख्य जबाबदारी खाजगी क्षेत्राची, आणि सरकार व नोकरशहा यांच्या ताब्यात सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि त्यासाठी लागणारी 'भारतीय खाद्य निगम' सारखी बोजड आणि खादाड यंत्रणा. परिणामी, साऱ्या अन्नधान्य-पुरवठ्याच्या व्यवस्थेच्या नाड्या नोकरशहांच्या हातात राहिल्या.

### जीवनावश्यक वस्तुंच्या कायद्याचे थैमान

किडवाईचा खुलीकरणाचा-प्रयत्न फसला. रेशनिंगचे राज्य पुन्हा चालू झाले. त्यानंतर, देशभर अन्नधान्याच्या उत्पादनात सुधारणा होईना. लोकसंख्या वाढतच होती. औद्योगिकीकरणाच्या धोरणामुळे शहरातील लोकसंख्या ग्रामीण भागातून येणाऱ्या ओघामुळे विशेष वेगाने वाढू लागली. गावातून शहरांकडे जगण्यासाठी धाव घेणाऱ्या शेतकरी निर्वासितांचा प्रवाह वाढतच राहिला. अन्नधान्याचा, विशेषत: शहरी भागात, पुरवठा कमी पडू लागला आणि सर्वत्र अन्नधान्याच्या तुटीची मानसिकता तयार झाली. तुटवड्याच्या दुष्टचक्रात देश सापडला. कधी पाऊस झाला नाही म्हणून, कधी अतिवृष्टी झाली, महापूर आले, वादळे झाली म्हणून. दरवर्षी अन्नधान्याचा पुरवठा गरजेच्या तुलनेने कमीच पडू लागला.

### तुटवड्याचे नाटक

त्या काळात लोकसंख्येला देशात पिकणारे अन्नधान्य खरोखरच अपुरे होते काय? लहानमोठी सगळी कुटुंबातील माणसे हिशेबात घेतली तर दरडोई दरवर्षी एक क्विंटल धान्य उपासमार टाळण्यास पुरेसे आहे. १९६५-६६ साली संपूर्ण देशात दुष्काळी परिस्थिती तयार झाली. पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांना, जनतेने आठवड्यातून एक दिवस उपवास करावा असे आवाहन करावे लागले; पाकिस्तानशी झालेल्या संघर्षानंतर 'जय जवान, जय किसान' या घोषणेने अर्थकरणास एक वेगळी दिशा द्यावी लागली. त्यानंतर, लवकरच 'हरित क्रांती'ची सुरुवात झाली. 'कृषि मूल्य आयोगा'ची नेमणूक



झाली. भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील अर्थव्यवस्थेच्या इतिहासातील १९६५-६६ साल हा महत्त्वाचा टप्पा आहे. त्यावर्षी देशातील उत्पादन ८० लाख टन होते; म्हणजे दर माणशी १०० किलो ऐवजी २०० किलो धान्य उपलब्ध होते. कारखानदारीसाठी कच्चा माल म्हणून वापरले जाणारे धान्य लक्षात घेतले तरी गहजब करण्याइतकी टंचाई प्रत्यक्षात कधी नव्हतीच. काळाबाजारी आणि नोकरदार यांनी परस्परहितसंबंध जपून देशभर तुटवड्याची मानसिकता जोपासली, ती १९७० सालापर्यंत चालूच राहिली. आजही अन्नधान्याच्या पुरवठ्याबाबत देश स्वयंपूर्ण झाला असे मानले जाते. खरे म्हटले तर, दरडोई धान्याचे प्रमाण कमी झाले आहे, प्रथिनांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे आता दरडोई धान्याची गरज कमी झाली असावी. पण तरीही अन्नधान्याचा म्हणतात तसा तुटवडा लाल बहादूर शास्त्रींच्या काळापर्यंत नव्हता, हे स्पष्ट आहे. आजही तुटवड्याची मानसिकता जोपासण्यात भारतीय खाद्य निगम आणि त्यातील नोकरशहांचे टोलेजंग साम्राज्य यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत.

शेती, उद्योगधंदे आणि एकूण अर्थव्यवस्था यांच्या विकासाचा प्रश्न स्वातंत्र्यानंतर ज्या तऱ्हेने हाताळला गेला ते समजण्यासाठी ही पार्श्वभूमी लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे.

### वेशी आंतले आणि बाहेरचे

देश नव्याने स्वतंत्र झालेला. शेती आणि बलुतेदारी करणारी गावे एका बाजूला. तर आधुनिक व्यापार आणि कारखानदारी करणारी शहरे दुसऱ्या बाजूला. अशाच प्रकारचे दोन उभे तट पूर्वकाळापासूनच जातिव्यवस्थने तयार केलेले. वेशी आतले आणि वेशी बाहेरचे ही परंपरागत विभागणी इंग्रजांच्या राज्याने थोडी ऐसपैस केली, पण त्याबरोबरच भक्कमही केली. वेशीबाहेर 'भारत' आणि वेशी आत 'इंडिया' याच विभागणीला आता 'शेती' विरुद्ध 'उद्योग' अशा संघर्षाचे स्वरूप येऊ लागले. राजकीय सत्ता इंडियाच्या हाती आली. गांधीवादाऐवजी समाजवाद; शेतीऐवजी देशाचे आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण अशी भाषा बोलली जाऊ लागली. हिंदुस्थानसारख्या देशाचे औद्योगिकीकरण करायचे म्हणजे इतिहासातील अगदी अनोळखी समस्या उभी ठाकली.

औद्योगिकीकरण करण्यासाठी रोजमर्राच्या उपभोगानंतर शिल्लक राहणारी बचत पाहिजे. त्या बचतीची गुंतवणूक कारखानदारी भांडवलासाठी झाली पाहिजे.

### शेतीतील बचतीची लूट

पाश्चिमात्य देशात भांडवलनिर्मिती मोठ्या क्रूरपणाने झाली. गावांतील जमीनदारांनी कुळांना जमिनींवरून सरळसरळ हाकलून लावले आणि नव्या पद्धतीची शेती, बागायती आणि धनगरी सुरू केली. जमिनीवरून हाकून लावलेले लोक विपन्न दैन्यावस्थेत शहरात येऊन पोचले. राहायला आसरा नाही. पोटाचा खळगा भरण्यासाठी चोऱ्यामाऱ्या करण्याखेरीज गत्यंतर नाही; रोजगार मिळणे दुष्कर. ज्या भाग्यवंतांना रोजगार मिळाले त्यांना दिवसातून बाराबारा तास काम आणि जगण्यापुरतीही मजुरी नाही अशी स्थिती. या पद्धतीने नवीन कारखानदारीला कच्चा माल, भांडवल आणि श्रमशक्ती मिळाली. नंतर, शेजारी राष्ट्रांशी व्यापार वाढला आणि वसाहती लुटण्यास मिळाल्या तेव्हा कारखानदारीसाठी लागणारे भांडवल मुबलक प्रमाणात उपलब्ध होऊ लागले.

मार्क्सची समाजवादी व्यवस्थेसंबंधीची सारी मांडणी अतिविकसित भांडवलशाही देशातच 'नाही रे' कामगार क्रांती करून समाजवादी सत्ता आणतील असे गृहीत धरून केलेली होती. म्हणजे, प्राथमिक भांडवल-निर्मितीचा प्रश्न सुटलेला आहे, त्यापुढील भांडवलनिर्मिती प्रचंड प्रमाणावर आणि मोठ्या दुष्टपणे कामगारांच्या शोषणातून होत आहे, अशा देशात कामगार शोषणाविरुद्ध उठतील आणि समाजवादी क्रांती घडून येईल, एरव्ही नाही असे त्यासाठी गृहीत धरले आहे. त्यामुळे, मार्क्सच्या अर्थशास्त्रात समाजवादी सत्ता प्राथमिक भांडवलनिर्मिती कशा तऱ्हेने घडवून आणेल याबद्दल काहीच विवेचन झालेले नव्हते. प्रत्यक्षात, समाजवादी क्रांती घडली ती मार्क्सच्या भकिताप्रमाणे जर्मनी किंवा इंग्लंडमध्ये नाही, तर रशियासारख्या अविकसित देशांत. समाजवादी व्यवस्थेच्या भल्यासाठी मोठ्या शेतकऱ्यांकडून बचत काढून घेतल्याखेरीज गत्यंतर नाही; ती व्यापारी पद्धतीने म्हणजे किंमतीत ढवळाढवळ करून काढून घ्यावी का सरळ बंदुकी आणि रणगाडे यांच्या ताकदीने व्हावी असे दोन पक्ष मांडले गेले. शेवटी, वादंग घालणाऱ्या दोन्ही पक्षांतील अर्थशास्त्र्यांना स्टॅलीनने ठार केले आणि, मोठ्या शेतकऱ्यांविरुद्ध रणगाडे पाठवले; साऱ्या शेतीचे सक्तीचे सामूहिकीकरण घडवले. अशा पद्धतीने समाजवादी व्यवस्थेतही प्राथमिक भांडवलनिर्मिती रक्तपातानेच घडली.

हिंदुस्थानसारख्या देशात स्वातंत्र्य आले. औद्योगिकीकरणाच्या मार्गाने जाण्याच्या गोष्टी सुरु झाल्या. त्यासाठी, कारखानदारीवर भर देण्याचेही ठरले. पण, पुन्हा भांडवलनिर्मितीचा प्रश्न उभा राहिला. सर्व गुणाकारांची जननी निसर्गच आहे. पंचमहाभूतांच्या लक्षावधी वर्षांच्या साठलेल्या ऊर्जा माणसांच्या श्रमाचा स्पर्श होताच गुणाकार करीत फळाला येतात. त्याखेरीज, बचतीचे आणि भांडवलनिर्मितीचे दुसरे काही साधनच



असू शकत नाही. 'गाव विरुद्ध शहर' किंवा 'शेती विरुद्ध कारखानदारी' असा संघर्ष हिंदुस्थानातही उभा राहणे अटळ होते. येथेही औद्योगिकीकरण एका समाजाच्या आणि वर्गाच्या फायद्यासाठी व्हायचे होते. साऱ्या देशातील सर्व लोकांच्या हितासाठी विकास घडवून आणण्याचा हेतू असला तर असा संघर्ष टाळता येतो. पण, नैसर्गिक विकास माणसांच्या समाजाततरी असा सहजपणे, विनासंघर्ष होताना दिसत नाही. हिंदुस्थानाततर गाव विरुद्ध शहर किंवा शेती विरुद्ध कारखानदारी या आर्थिक संघर्षाला हजारो वर्षांच्या जातिव्यवस्थेमुळे विशेषच कडवेपणा आलेला. समाजवादाचे नाव लावले तरी स्टॅलीनच्या पद्धतीने हुकूमशाही स्थापन करून शस्त्रास्त्रांच्या बळावर शेतीतील बचत लुटणे या देशात अशक्यप्राय होते; त्या दृष्टीने प्रयत्न झाले नाहीत असे नाही.

### स्टॅलीनचे गोंडस अवतार

स्टॅलीनने मोठ्या शेतकऱ्यांविरुद्ध आघाडी उघडली तसेच येथेही जमीनदारी आणि सावकारी यांच्याविरुद्ध आघाडी उघडली गेली. साऱ्या शेतीच्या सामूहिकीकरणाचा प्रयत्न पंडित नेहरूंनी मोठ्या तयारीने केला, पण त्याला यश आले नाही. कारखानदारीला लागणाऱ्या भांडवलाच्या निर्मितीसाठी एकच मार्ग मोकळा होता. शेतीतील उत्पादन तर वाढले पाहिजे, पण वाढत्या उत्पादनातून तयार होणारी बचत गावात न राहता शहरांत आली पाहिजे आणि कारखानदारीसाठी कच्चा माल, श्रमशक्ती आणि भांडवल यांचा मुबलक पुरवठा शस्त्रांच्या बळावर नाही, तर किंमतीतील ढवळाढवळीने होणे यापलीकडे काही मार्ग शक्य नव्हता. पन्नास वर्षे शासनाने हा मार्ग स्वीकारला आणि त्यातून शेती आणि शेतकरी यांचे शोषण झाले, एवढेच नाही तर, स्वातंत्र्योत्तर पन्नास वर्षांतील देशातील साऱ्या अधोगतीच्या विषवल्लीची बीजे लावली गेली.

बाजारपेठेतील ढवळाढवळीने शेतीतील बचत काढून घ्यायचे म्हटले तरी एक प्रश्न उरतोच. शेतीतील बचत वाढविण्यासाठी शेतीमालाचे उत्पादन वाढले पाहिजे. शेतीमालाचे उत्पादन वाढवावे कसे? स्वातंत्र्यानंतरच्या दुष्काळी स्थितीत अमेरिकेकडून जहाजे भरभरून फुकटात अन्नधान्य येऊ लागले; जहाजाच्या वाहतुकीचाच काय तो खर्च. तोही शेवटी माफ करण्यात आला. आंतरराष्ट्रीय राजकारणात तटस्थतेची ऐट मिरवायची, पण देशातील कोट्यवधी जनतेची भूक भागण्यासाठी जहाजांची वाट बघायची अशी नीती अनेक र्षे चालली. अशोक मेहतांसारखा धुरंधर समाजवादीही एकदा म्हणून गेला, 'परदेशात इतक्या स्वस्त भावात अन्नधान्य मिळण्याची सोय असेल तर हिंदुस्थानातील शेतीकडे उदारबुद्धीने दुर्लक्ष करण्यास काहीच हरकत नाही.' परदेशातील

आयातीमुळे शेतीमालाचे बाजारभाव पडले. त्यांचे उत्पादन परवडेनासे झाले आणि शेतकऱ्याला मेहनत वा गुंतवणूक करण्याची उमेद राहिली नाही. अमेरिकेवर देश अधिकाधिक अवलंबून राहू लागला. जहाजे बंदरात आली तरच रेशन दुकानात धान्य यावे अशी परिस्थिती तयार झाली.

## कसायाची नीति

देशातील शेतीचे उत्पादन वाढवण्याचे तीन मार्ग आहेत - संरचना, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ.

खेडेगावात सर्वच सोयीव्यवस्थांचा अभाव असतो. रस्ते नाहीत, पाणी नाही, वीज नाही, बाजारपेठांची सोय नाही, पतपुरवठ्याची व्यवस्था नाही. शेतजमिनीच्या मालकीची पद्धत सरंजामशाहीची. शेतकरी निरक्षर, रूढीपरंपरांनी बांधला गेलेला. अशा अनेक गोष्टींमुळे शेतीतील उत्पादकता कमी झालेली होती. शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा फारसा स्पर्श नाही. जुनी परंपरागत पिके, खते, औषधे वगैरेचा प्रयोग; अगदी किमान आळीपाळीने जमीन पडीक ठेवणे हीच सुपिकता टिकवण्याची मुख्य पद्धत. शेतीच्या तंत्रज्ञानातही मोठा बदल घडवून आणणे आवश्यक होते.

याखेरीज, गुंतवणूक करणाऱ्या, घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या सर्व प्रयासांना अनुरूप अशी किंमत मिळणे आवश्यक आहे. देशातील बाजारपेठांची व्यवस्था हजारो वर्षे शेतकऱ्यांच्या हाती योग्य किंमत पडू नये आणि जी किंमत त्यांच्या हाती पडेल ती तेथे टिकू नये अशा हिशोबाने तयार झालेली. त्यामुळे, कित्येक पिढ्या, शेतीत काही नवीन करून दाखवावे, जमिनीची बांधबंदिस्ती करावी, पाण्याची सोय करावी अशी उमेद अभावानेच दिसली.

शेतीतील उत्पादन वाढवायचे म्हणजे व्यवस्था, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ या तीन आघाड्यांवर झुंजण्याची लढाई आहे.

कारखानदारीसाठी लागणारे भांडवल शेतीतून काढायचे आहे या निर्णयाचा सरळ सरळ अर्थ असा की शेतीचे उत्पादन तर वाढवायचे आहे पण ते शेतीमालाला फायदेशीर किंमत न देता. मग औद्योगिकीकरणाकरिता लागणाऱ्या भांडवलनिर्मितीची रणनीती स्पष्ट ठरली. संरचना सुधारणे आणि तंत्रज्ञान सुधारणे आणि शेतीमालाच्या किंमती पाडणे. अधिक मांस मिळावे या हिशेबाने कसायाने बकरीस खाऊ घालून लठ्ठ करावे त्यातलाच हा प्रकार.



## शेतीनीतिचा इतिहास

स्वातंत्र्योत्तर काळात पंडित नेहरूंच्या जमान्यात सारा भर संरचना सुधारण्यावर दिला गेला. पाणीपुरवठा सुधारणे, त्याबरोबर जमीनधारणा पद्धती बदलणे, नमुना शेतीची काही उदाहरणे जागोजाग ठेवणे, सहकारी पतपुरवठ्याची व्यवस्था करणे, कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे जाळे तयार करणे अशा तऱ्हेचे कार्यक्रम राबवण्यात आले. सहकारी चळवळीचे अपयश स्पष्ट असूनही सरकारी खर्चाने सरकारी व्यवस्थापनाखालील सहकारी व्यवस्थेला बळ देण्यात आले. त्यातील मलिद्याच्या लालचीने ग्रामीण भागातील नवे नेतृत्व मिंधे बनले आणि शेतकऱ्यांना समाजवादी रचनेच्या दावणीस बांधण्यासाठी तयार झाले.

लाल बहादूर शास्त्रींच्या अठरा महिन्यांच्या काळात या धोरणात मोठा क्रांतीकारी बदल झाला. कृषि मूल्य आयोगाची स्थापना झाली आणि त्याबरोबरच, हरितक्रांतीच्या तंत्रज्ञानाचा प्रसार व्हावा यासाठी धाडसी पावले टाकली गेली. १९६५ ते १९७० या पाच वर्षांत काही काळ काही पिकांना शेतकऱ्यांना दिलासा देण्यासारखी किंमत मिळाली.

इंदिरा गांधीच्या काळात शास्त्रींच्या किंमतीविषयीच्या धोरणांना आकसते घेण्यात आले, कृषि मूल्य आयोगाला वेसण घालण्यात आली. शेतकरी विरोधी विचारांसाठी ख्यातनाम असलेले डाव्या तत्त्वज्ञानाचे अर्थशास्त्रज्ञ एका पाठोपाठ एक आयोगाचे अध्यक्ष नेमण्यात आले. आयोगाच्या शिफारशींचा उपयोग शेतीमालाला रास्त भाव देण्याऐवजी रास्त भाव नाकारण्यासाठी होऊ लागला. अपुरा भाव जाहिर झाला की व्यापाऱ्यांचे फावते. आधारभूत किंमत, किमान किंमत न राहता कमाल किंमत बनून जाते. इंदिरा गांधींनंतरच्या सर्व काळात हरितक्रांतीचे क्षेत्र वाढू दिले गेले नाही. पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश आणि राजस्थान या राज्यांतील काही भागांत पाणीपुरवठ्याची सोय मुबलक होती. तेवढ्या प्रदेशापुरतीच हरितक्रांती मर्यादित राहली. आधारभूत किंमती ठरवण्याच्या पद्धतीत जनता दलाच्या अडीच वर्षांच्या काळात काही सुधारणा घडून आली. तेवढा अपवाद सोडल्यास शेतीमालावर प्रचंड उणे सबसिडी लादण्याचे धोरण सर्व काळ चालत राहिले. शेतीमालाच्या निर्यातीवर बंदी, ग्राहकाचे हित साधण्याच्या नावाखाली परदेशातून महाग माल आयात करून देशी बाजारपेठेतील भाव उतरवणे, सक्तीची वसुली, देशांतर्गत वाहतुकीवर बंदी, कर्जपुरवठ्यावर नियंत्रण, रुपयाचा फाजील चढता विनिमयाचा दर अशा अनेक मार्गांनी शेतीमालाच्या किंमती खाली ठेवण्यात आल्या आणि व्यापारी देवघेवीच्या अटी सतत शेतीच्या विरोधात जात राहिल्या.

शेतीसंबंधीच्या ५० वर्षांच्या कालखंडाचा सारा मतितार्थ दोन आकडेवारीत स्पष्ट होतो.

स्वातंत्र्याच्या वेळी शेतीवर राहणाऱ्यांची संख्या ७४ टक्के होती आणि शेतीमाल राष्ट्रीय उत्पादनाच्या ६५%. आज शेतीचे उत्पादन एकूण उत्पादनाच्या चौथा हिस्साही राहिलेले नाही, पण आजही जवळजवळ ७०% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे.

पन्नास वर्षापूर्वी शेतकऱ्याची सरासरी मिळकत १० रुपये असली तर इतरांची होती १४ रुपये, स्वातंत्र्याच्या या काळात आता शेतकऱ्याचे उत्पन्न १० रुपये असेल तर बिगरशेतकऱ्यांचे १०४ रुपये झाले आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळातील साऱ्या अर्थकरणाचा सारांशच या आकडेवारीत येतो. खेडी आणि शेती यांना प्राधान्य देण्याऐवजी कारखानदारीला प्राधान्य देण्याचे ठरले, शहरी लोकांच्या हाती शेतीतील बचत पोचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न झाले. साम्राज्यवाद्यांनी वसाहतींचे शोषण करून त्यांच्या भांडवलाचा प्रश्न सोडवला; स्वातंत्र्यानंतर काळ्या इंग्रजीनीही देशाच्या सरहद्दीच्या आत नवी वसाहतवादी व्यवस्था स्वीकारली. यातच देशाच्या साऱ्या अध:पाताचे आणि आजच्या आर्थिक, सामाजिक राजकीय दुरावस्थेचे मूळ आहे.

❐ ❐ ❐



# चैत्रगौरीची कारखानदारी

**उद्योगधंद्यांची अवस्था**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात देशात औद्योगिकीकरण झपाट्याने व्हावे आणि विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग झपाट्याने अवतरून देश जगातील सुधारलेल्या देशांत गणला जावा या उद्दिष्टाला साऱ्या नियोजनात मध्यवर्ती महत्त्व मिळाले.

उद्योगधंद्याच्या वाढीसाठी लागणारे भांडवल शेतीच्या शोषणातून उभे करण्याचे 'स्टॅलिनी अर्थशास्त्र' नियोजनकर्त्यांनी स्वीकारले; स्टॅलिनप्रमाणे शेतकऱ्यांविरुध्द रणगाडे आणि बंदुकांचा वापर करुन त्यांची कत्तल केली नाही, पण त्याऐवजी शेतीमालाच्या किंमती प्रयत्नपूर्वक पाडण्याची रणनीती स्वीकारण्यात आली आणि आजतागायत ती थोड्याफार फरकाने राबवली जातच आहे. पण, केवळ भांडवल उपलब्ध झाल्याने कारखानदारी युग अवतरत नाही. त्यासाठी तंत्रज्ञान लागते. संशोधन लागते, यंत्रसामुग्री लागते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, धडाडीच्या उद्योजकांची गरज असते. या सगळ्यांच घटकांचा देशात दुष्काळ. हा तुटवडा दूर व्हावा यासाठी एक व्यापक धोरण तयार करण्यात आले.

बहुजन समाज देशातील कारागिरी आणि हुन्नरी पिढ्यान्‌पिढ्या चालवत होता. त्यांचे स्वत:चे जुनेपुराणे का होईना, तंत्रज्ञान होते; परंपरेने चालत आलेली उघड यंत्रसामग्रीही होती. लोहार असो, सुतार असो; तांबट असो, चांभार असो वा विणकर असो; त्यांनी तयार केलेल्या मालाला गावोगावी परंपरेने बांधून दिलेली मागणी होती. वरकड मालासाठी बाजारपेठांची गावे होती. ही सारी देशी कारखानदारी इंग्रज राज्याच्या व्यापारी धोरणाने पार मोडकळीस आली होती. परदेशातून बोटी भरभरून येणाऱ्या स्वस्त आणि सुबक कारखारदारी मालापुढे देशी बलुतेदारीचा ओबडधोबड माल काय टिकाव धरणार ? कापडचोपड, तांब्यापितळेची भांडी, कलाकुसरीच्या काही वस्तू सोडल्यास देशी कारागिरी जवळजवळ संपुष्टात आली होती. गावोगावी शेतीच्या कामाला लागणारी अवजारे, हत्यारे पुरवणे एवढाच काय तो पारंपारीक कारखानदारीचा अवशेष शिल्लक राहिला होता.

इंग्रजी राजवटीत कापसाच्या जीन, कापड गिरण्या, टाटांचा पोलादाचा कारखाना इ. उभे राहिले हे आधुनिक कारखानदारीचे अपवादात्मकच नमुने म्हटले पाहिजे. किर्लोस्कर, ओगले यांच्यासारखे छोटे छोटे कारखाने दूरदृष्टीच्या प्रज्ञावान संस्थानिकांच्या उत्तेजनाने

उभे राहू पहात होते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अशा छोट्या छोट्या कारखान्यांची चलती झाली. युद्धपरिस्थितीमुळे विलायती माल आणणे दुष्कर झाल्यामुळे अशा कारखानदारीला बढावा देणे अपरिहार्य झाले. स्वातंत्र्य अवतरले तेव्हा मागासलेली देशी कारागिरी आणि नव्या उद्योजकांनी सुरू केलेली फुटकळ कारखानदारी एवढेच काय ते उद्योगधंद्याचे स्वरूप होते.

## जपानी कारखानदारी आणि शेती

स्वातंत्र्योत्तर कारखानदारीसाठी तंत्रज्ञान परदेशातून आणण्याखेरीज गत्यंतर नव्हते. असे तंत्रज्ञान मिळवण्याच्या दोन वेगवेगळ्या पद्धती आहेत. पहिली पद्धत जपानी तोंडावळ्याची. पश्चिमात्य तंत्रज्ञान संपादन करण्यासाठी हजारोंच्या संख्येने जपानी तरुण परदेशात पाठवण्यात आले. पश्चिमी देशांतील कारखानदारीचा सखोल अभ्यास आणि व्यापक अनुभव घेऊन ही तरुण मंडळी मायदेशी परत आली. जपानी सम्राटांनी आणि शासनाने जपानी कारखानदारी स्वदेशी उद्योजकांच्यामार्फत झाली पाहिजे असा स्वदेशीचा आग्रह धरला. या आग्रहामागे अनेक कारणे होती. जपानी लोक पाश्चिमात्यांना अस्वच्छ, रानटी समजत. केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञान यात प्रगती केली म्हणून ते अजिंक्य जगज्जेते बनले, एवढेच काय ते! जपानसारख्या हजारो वर्षांच्या समृद्ध संस्कृतीच्या आणि श्रेष्ठ वंशाच्या लोकांना केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञानातील मागासलेपणाने शिर झुकवावे लागले. एवढा कमकुवतपणा दूर केला तर जपानी लोक या गोऱ्या तोंडाच्या अधम संस्कृतीचा आधुनिक पद्धतीच्या संघर्षातही एक दिवस पाडाव करू शकतील अशा आशेने, योजनेने आणि जिद्दीने जपानी उद्योगधंद्यांची जोपासना केली गेली. जपानची जमीन कमी, लोकसंख्या मोठी. त्यामुळे अन्नधान्यापासून ते इंधन, सर्व प्रकारची खनिजे या सगळ्यांच्या पुरवठ्याकरिता त्याला जगावर अवलंबून राहावे लागत होते. शेतकऱ्यांना उत्पादन करण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी जपानने धोरण स्वीकारले ते स्टॅलिन-नेहरू धोरण्याच्या नेमके उलटे. शेतकऱ्यांना शेती पिकवण्यात अफाट उत्साह वाटावा अशा किंमतीची शाश्वती देण्याचे धोरण निश्चित झाले. अन्नधान्याची आयात म्हणून होऊ द्यायची नाही. शेतीमालाला इतर देशातील किंमतीच्या तुलनेने तिपटीवर किंमती मिळाव्या अशी व्यवस्था झाली. शेतकऱ्यांनीही दर एकरी उत्पादनाचे चढते उच्चांक गाठले. त्यांच्या हाती पैसा खेळू लागला. त्याचा उपयोग करून त्यांनी शेताशेतावर, गावोगावी छोट्या छोट्या घरातून बारकेसारके उद्योगधंदे चालू केले. परदेशातून तंत्रज्ञान आणि कारखानदारी कौशल्य संपादन करून मायदेशी परत आलेल्या तरुणांच्या



ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा घेऊन परदेशी मालाच्या नकला करण्याचा 'उल्हासनगरी' कार्यक्रम जपानभर पसरला. मालाची गुणवत्ता फारशी चांगली नाही पण किंमत मात्र पश्चिमी मालाच्या तुलनेने अगदीच कमी. 'जपानी माल म्हणजे भ्रष्ट नक्कल आणि तकलादू' अशी अवहेलना झाली. मराठी भाषेतदेखील त्या काळी 'जपानी' म्हणजे 'हलक्या प्रतीचा स्वस्त माल' असा शब्दप्रयोगच रुढ झाला.

त्याबरोबर, जपानी सम्राटांनी आणखी एक उपक्रम केला. इतिहासकाळात तलवार गाजवलेली अनेक योद्धापरंपरेची उमराव घराणी सम्राटांशी संपूर्ण निष्ठा बाळगणारी शिल्लक होती; सम्राटांचा शब्द पुरा व्हावा यासाठी जीव टाकायला तयार असलेली. त्यातील काहींना जपानी सम्राटांनी उद्योगधंदे चालू करण्याच्या आज्ञा दिल्या. त्यासाठी भांडवल मिळावे म्हणून सरकारी खजिनाच उघडा करून दिला. औंधच्या छोट्या संस्थानिकांच्या किरकोळ प्रोत्साहनाने एवढ्या पिटुकल्या संस्थानात मोठे मोठे कारखाने उभे राहिले; जपानी सम्राटांचे प्रोत्साहन त्याच्यापेक्षा कितीतरी पट अधिक. जपानी इतिहासातील परंपरा प्रचंड शिस्तीची. त्यामुळे,' अमुक घराण्यांना सम्राट वर चढवीत आहे, आम्हाला का नाही ?' अशी काही कोणी तक्रार केली नाही. या नव्या मोठ्या कारखानदारांनी देशभरच्या गावोगावी उभ्या राहणाऱ्या छोट्या उद्योगधंद्यांना मोठा आधार दिला. उत्पादन झपाट्याने वाढू लागले. मालाची गुणवत्ता सुधारू लागली. दुसऱ्या महायुद्धातील विनाशानंतर जपानी औद्योगिकीकरणाची रणनीती याच तोंडावळ्याची राहिली आहे.

जपानी नमुन्याच्या औद्योगिकीकरणाचे धोरण हिंदुस्थानात राबविणे मोठे कठीण होते. इंग्रज देशात आले तेव्हा, सर्व जनांना जिच्याबद्दल निष्ठा वाटावी अशी राजकीय सत्ता नव्हती. जातिव्यवस्थेमुळे समाज फुटलेला होता आणि साऱ्या समाजाचे नेतृत्व हुन्नरी कारागीर बलुतेदार जातींकडे नव्हते, तर पुरोहित वर्गाकडे होते. ज्यांनी हातात शस्त्र धरायचे आणि देशाचे संरक्षण करायचे त्या योद्धा जाती १३०० वर्षे बाहेरून येणाऱ्या आक्रमकांपुढे शेपूट खाली घालायची, पळ काढायचा किंवा त्यांच्यातच सामील होऊन जायचे आणि आपल्याच देशातील गरीबगुरीबांना नाडण्याकरिता तलवारीची बहादुरी दाखवायची आणि त्यातच साऱ्या खानदानाचा अभिमान सांगायचा अशा अवस्थेत होत्या. परदेशी जाऊन नवी संस्कृती, नवे तंत्रज्ञान स्वीकारण्याचे काम करावे कुणी? शेती, बलुतेदारी, हुन्नरी करणाऱ्या बहुजन समजाच्या आटोक्याबाहेरची ही गोष्ट होती. परदेशी गेली ती सवर्णांची पोरे; त्यांना तंत्रज्ञान आणि कारखानदारी यांत काहीच स्वारस्य नव्हते. इंग्रजी अंमल सुरू झाल्यामुळे जमिनीच्या मालकीसंबंधी लाखोंनी तंटेबखेडे

उभे राहिले होते. तालुका न्यायालयांपासून ते प्रांताच्या राजधानीतील उच्च न्यायालयांपर्यंत सर्वत्र वकील मंडळींची मोठी चंगळ चालली होती. शेतकरी जमिनीवरून उठवले जात होते. सवर्णांतील हुशार विद्यार्थी परदेशात गेले ते वकीली शिकण्याकरिता, बॅरिस्टर होण्याकरिता. त्यातल्या त्यात हुशार विद्यार्थी इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा देऊन राज्यकर्त्यांच्या दरबारात प्रतिष्ठेचे स्थान मिळवावे अशा हिशोबाने जात. काही थोडे विद्यार्थी वैद्यकी शिकून आले, पण उत्पादनाशी संबंध असलेल्या कारखानदारी, अभियांत्रिकी, उद्योजकता, व्यवस्थापन आणि इतर सारी विद्यांची क्षेत्रे इत्यादी सर्व क्षेत्राचे त्यांना वावडेच होते.

## पांढरपेशी कारखानदारी

मग कारखानदारीसाठी लागणारे तंत्रज्ञान यावे कोठून? पर्वत महंमदाकडे चालत जाण्यास तयार नसेल तर महंमदाला पर्वताकडे जावे लागते. हिंदुस्थानसारख्या प्रचंड आकाराच्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात जे काही छोटेछोटे उद्योगधंदे होते ते बहुजनसमाजाच्या हाती होते. नवे तंत्रज्ञान ह्या समाजाकडे पोहोचवण्याचा सोपा मार्ग म्हणजे परदेशी मालाच्या आयातीवर बंधने घालून परदेशी गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे एवढाच होता. पाश्चिमात्य उद्योगसंस्कृतीशी सामान्य जनांचा जितका संपर्क वाढेल तितका नवीन तंत्रविद्येचा प्रसार देशभर झाला असता. इंग्रज राज्य आले आहे. ज्या बहुजन समाजाला कधी कोणतीच विद्या मिळविण्याचा अधिकार नव्हता त्यांना आता शिकता येऊ लागले आहे. 'विद्येविना मति गेली आहे, नीती गेली आहे, सर्व काही गेले आहे' हा मंत्र देणाऱ्या जोतिबा फुल्यांच्या मनात विद्या म्हणजे 'काही गमभन गिरवणे किंवा चार इंग्रजी बुके वाचता येणे' एवढा मर्यादित अर्थ नव्हता. 'पाश्चिमात्य औद्योगिक संस्कृतीच्या संपर्काने बहुजन समाजाला तंत्रविद्याही मिळावी, ती जर मिळाली नाही आणि बहुजनसमाजातील तरुण जुन्या गावठी पद्धतीची कारागिरी आणि हुन्नरीच चालवत राहिला तर इतिहासाने वाढून दिलेली संधी फुकट जाईल आणि इंग्रज निघून गेले आणि राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरी त्यात पुन्हा अनुत्पादक वर्गाचेच प्रभुत्व राहील; थोडक्यात, पुन्हा पेशवाई तयार होईल.' एवढा व्यापक अर्थ जोतीबांच्या शिकवणीत होता. पण, जोतिबांचा पराभव झाला. राष्ट्रवादाच्या रणघोषात इंग्रजी व्यवस्थेचाच नव्हे तर, इंग्रजीचा तिरस्कार पसरवणाऱ्या राष्ट्रवादी चळवळीचा विजय झाला. युरोपीय समाजाशी एवढी जवळीक इतिहासाने साधून दिली पण कारखानदारी तंत्रविज्ञानात स्वातंत्र्य मिळाले तेव्हाही देश पहिल्याइतकाच मागासलेला राहिला होता.



स्वतंत्र हिंदुस्थानाचे नवे सत्ताधारी आंग्लविद्याविभूषित, पाश्चिमात्य पुस्तकी विद्येचा डौल मिरवणारे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कारखानदारी उभी करायची ती कशी याबद्दल त्यांच्या मनांत घट्ट कल्पना बनलेल्या होत्या. 'अभियांत्रिकी आणि कारखानदारीसाठी लागणाऱ्या इतर क्षेत्रांसाठी येथे विद्यालये, महाविद्यालये खोलावीत; त्यात शिकून तयार झालेल्या तरुणांना नव्या कारखानदारीत कामे द्यावीत; नवी कारखानदारी उभारायची ती मुख्यत: सरकारी पुढाकाराने. कोणते कारखाने काढावेत, कुठे काढावेत, किती काढावेत, कुणी काढावेत, त्यासाठी कोणते तंत्रज्ञान उचित, ते कोठून आणायचे हा सारा निर्णय दिल्लीत व्हायचा. परदेशी सरकारे आणि कारखानदार यांच्याशी करारमदार करून त्यांच्या भागीदारीत तेथे कारखाने उभारावेत असे धोरण दिल्लीने स्वीकारले.

हे सारे धोरण पाश्चिमात्य सरकारे आणि कारखानदार दोघांच्याही मोठ्या सोयीचे होते. दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या काळात ग्राहकोपयोगी कापडचोपड आणि इतर कारखानदारी माल खपवण्याची बाजारपेठ म्हणून ते हिंदुस्थानसारख्या वसाहतींच्या देशांकडे पहात. आता काळ बदलला होता. दुसऱ्या महायुद्धात लष्करांच्या गरजा पुरवण्यासाठी एक नवेच तंत्रज्ञान उभे राहिले होते. युद्ध जिंकण्यासाठी प्रचंड प्रमाणावर यंत्रसामुग्री तयार करण्याचे कारखाने दोस्त राष्ट्रात उभे राहिले होते. युद्ध संपल्यावर या साऱ्या यंत्रसामुग्रीचे पुढे काय करावे हा त्यांच्यापुढे मोठा प्रश्नच होता. कापडचोपड खरीदणाऱ्या ग्राहकापेक्षा उपभोगाच्या वस्तू तयार करणाऱ्या अशा कारखान्यांच्या यंत्रसामुग्रीचा कोणी खरीददार भेटला तर तो त्यांना हवा होता. तंत्रज्ञानाच्या मोठ्या झेपेमुळे आधीच्या पिढीतील यंत्रसामुग्री आता फायदेशीरही राहिली नव्हती. अशा जुन्यापान्या तंत्रज्ञानासाठी आणि यंत्रांसाठी ते गिऱ्हाईक शोधतच होते. स्वतंत्र हिंदुस्थानचे औद्योगिक धोरण त्यांच्या मोठ्या सोयीचे होते; किंबहुना, त्यांच्या सोयीनेच हिंदुस्थानचे औद्योगिक धोरण ठरले असावे.

नव्या कारखानदारीला सुरुवात झाली. पण, त्यासाठी लागणारी तंत्रविद्या मोठ्या लाटेने देशात येऊन पोचली नाही; सर्वदूर पसरली नाही; बहुजन समाजाला तर पाहायलाही मिळाली नाही. पिढ्यानपिढ्या कारागिरी, हुन्नरी करणारा समाज नव्या तंत्रविद्येच्या ओघापासून वंचित राहिला. नवीन तंत्रज्ञान आले ते मोकळेपणाणे महालाटेच्या रूपात आले नाही. सरकारमान्य तेवढे विज्ञान सरकारी यंत्रणेच्या नळकांड्यातून ठिबकत ठिबकत येऊन पोचले.

## रशियन धर्तीची जड कारखानदारी

कारखाने कोणते उभारले जावेत? समाजवादी नियोजकांच्या बुद्धिवर सोव्हियेटी अर्थकरणाचा मोठा प्रभाव होता. जड उद्योगधंदे, विजेची निर्मिती, पोलाद, सिमेंट या क्षेत्रांत शासनाने झपाट्याने कारखानदारी उभारावी, कोणत्याही कारखानदारीकरिता लागणाऱ्या या पायाभूत उत्पादनांचा मुबलक पुरवठा होऊ लागला म्हणजे देशभर कारखानदारी सुकर होऊन जाईल असा हा सोव्हियत रशियाच्या नियोजनाचा आराखडा महालनोबिस इत्यादींनी उचलून धरला. भाक्रा-नानगलचे धरण झाले. भिलई, दुर्गापूर अशा ठिकाणी पोलादाचे कारखाने उभे राहिले. 'नव्या नव्या उद्योगनगरी उभ्या राहिल्या. अभियांत्रिकी महाविद्यालयांत पदव्या आणि पदविका संपादन केलेले शुभ्रवसनधारी अभियंते तेथे डौलाने फिरू लागले; सरकारी निवासांत संसार थाटू लागले. पण, साऱ्या औद्यागिकीकरणाचा परिणाम सर्वसाधारण गावोगावच्या परंपरागत हुन्नरी बलुतेदारांवर काहीच झाला नाही.

## गचाळ माल महाग किंमत

शेतीच्या मातीत किंवा बलुतेदारीच्या हत्यारापात्यारात हात घालून मळवणे ज्यांना पिढ्यानपिढ्या माहीत नाही; वकीलीत खोऱ्याने पैसा ओढता येतो म्हणून जे वकीलीकडे वळले, तेच आता अभियंते, व्यवस्थापक, उद्योजक, कारखानदार म्हणून मिरवू लागले; खऱ्याखुऱ्या उद्योजकत्वाचा त्यांना गंधही नव्हता. सरकारमान्य तंत्रज्ञान, सरकारी लाइसेन्सपरमिट यांच्या आधारे मिळालेली यंत्रसामुग्री, सरकारी बँकांतून सरकारी नियमामुळे मिळालेली अनुदाने आणि पतपुरवठा यांच्या आधारे हा पोकळ उद्योजक-वर्ग कारखानदार म्हणून मिरवू लागला. पण, असल्या आडगिऱ्हाईकी कालबाह्य कारखान्यांत गळबट व्यवस्थापनाखाली तयार झालेल्या गचाळ गुणवत्तेच्या महागड्या मालाला बाजारपेठ कोठून मिळणार? परदेशी मालाशी स्पर्धा करायची वेळ आली तेव्हा गावठी बलुतेदार थोडेतरी तग धरून राहिले; हे नवे कारखानदार तेवढ्याही ताकदीचे नव्हते. मग, सरकार पुन्हा मदतीला आले. 'परदेशावर अवलंबून राहू नये' अशा 'स्वदेशी'च्या गर्जना करीत सर्व प्रकारच्या आयातींवर बंधने घालण्यात आली. दीडदोनशे टक्के आयातकर लादण्यात आले. परदेशी कारखानदारांनी भारतीय बाजारपेठेचा नादच सोडून दिला. परिणामत:, हिंदुस्थानातील सारी बाजारपेठ, सारे ग्राहक नव्या कारखानदार वर्गाच्या जबड्यात सापडले. देशी माल खरीदण्याखेरीज हिंदुस्थानातील गरीब बिचाऱ्या ग्राहकांस काही गत्यंतरच राहिले नाही. साऱ्या बाजारपेठेत आधी बहुतेक साऱ्या वस्तुंचा तुटवडा. 'माल मिळवायचा म्हणजे परमिट काढायचे, ग्राहकांच्या रांगेत किंवा प्रतिक्षायादीत जाऊन उभे रहायचे.



जगातील बाजारपेठेच्या तुलनेने गचाळ माल दुप्पट तिप्पट किंमतीने खरीदायचा आणि तो मिळाला म्हणजे 'धन्य धन्य मानायचे' अशी ग्राहकांची कोंडी झाली.

कारखानदारी माल महागडा झाला. त्यामुळे साऱ्याच वस्तूंचा उत्पादनखर्च वाढू लागला. इतरत्र चाळीसपन्नास हजार रुपयांना मिळणारा ट्रॅक्टर भारतीय शेतकऱ्याला तिप्पट चौपट किंमत देऊन घेणे भाग पडू लागले. अशीच स्थिती साऱ्याच उद्योजकांची. त्यामुळे, हिंदुस्थानी मालाला परदेशी बाजारपेठेत काही स्थानच राहिले नाही.

## सरकारी यंत्रणेचा बोजा

आर्थिक नियोजन चालवणाऱ्यांना गुंतवणुकीसाठी आणि सरकारी यंत्रणेसाठी पैसा गोळा करण्याचा हव्यास ठेवणे भागच होते. सरकारी कर वाढत गेले. मोरारजी देसाई वित्तमंत्री असताना तर कडेलोट झाला. उत्पन्नावरील कराचा दर ९५% पर्यंत पोचला. कराचा एवढा बोजा डोक्यावर असताना कारखानदारांना आपला माल परदेशी स्पर्धेत उतरवणे अधिकच कठीण झाले. साऱ्याच अर्थकरणात बुजबुजाट झाला तो लायसेन्स-परमिट, कंट्रोल, कोटा, इन्स्पेक्टर इत्यादी गंदगीचा. आपणच कर भरायचे, त्याच करातून पगार घेणारे नोकरदार काम करणे दूरच राहिले, आपल्याला जगणेसुद्धा अशक्य करून टाकतात असा अनुभव उद्योजकांना हरघडी येऊ लागला. सारे कर व्यवस्थित भरले तरी नोकरदारांचा जाच काही संपत नाही; त्यांचा ससेमिरा चालूच राहतो हे पाहिल्यावर उद्योजकांनी एक मार्ग काढला. सरकारी कर भरत बसण्याऐवजी अधिकाऱ्यांना 'अर्धे तुझे, अर्धे माझे' केले म्हणजे जगणे अधिक सुलभ होते हा अनुभव आल्यानंतर समांतर अर्थव्यवस्था आणि काळा पैसा दोन्ही फोफावू लागले. परिस्थिती अशी निर्माण झाली की समांतर अर्थव्यवस्थेतील उलाढाल जवळजवळ अधिकृत अर्थव्यवस्थेइतकीच मोठी झाली. किंबहुना, अधिकृत अर्थव्यवस्था अकार्यक्षम आणि बुडीत राहिली; देश जगतो आहे तो समांतर अर्थव्यवस्थेतील चलनवलनाने!

भारतीय कारखानदारीचा माल गचाळ, त्यांचा उत्पादनखर्च फार मोठा. पण, याची चिंता कारखानदारांना फारशी पडली नाही. तयार होणारा सारा माल देशातील बंदिस्त ग्राहकावर ओतण्यात अडचण काहीच नव्हती. उद्योगधंद्यातील फायद्याचे प्रमाण वाढत चालले, काही क्षेत्रांत तर हे २०० ते ३०० टक्क्यांवर गेले.

## नवी कामगार चळवळ

याचा एक गंभीर परिणाम कामगारांवर झाला. हिंदुस्थानातील कामगार फार

चटपटीत, कुशल, कष्टाळू आणि शिस्तप्रिय म्हणून कधीच प्रसिद्ध नव्हता; पण, कारखानदारीच्या सुरुवातीच्या काळात मजुरीचे दर अगदी कमी होते, कामगारांना सोयीसवलती जवळजवळ काहीच दिल्या जात नसत, कोणाही कामगाराला काढले तर त्याच्या जागी काम करण्यास सहजासहजी अनेकजण धडपड करीत पुढे येत. त्यामुळे मजुरीचा खर्च एकूण फार डोईजड वाटत नसे. 'ज्या लायकीचे काम त्याच लायकीचे दाम' अशी परिस्थिती होती. कामगारांचे जीवन मोठे हलाखीचे होते. कामगार चळवळ उभी राहत होती पण कमजोर होती. सरकारी कारखानदारीच्या काळात या परिस्थितीत मोठा बदल घडून आला. ना.म.जोशी, आंबेकर अशा कामगार नेत्यांचा काळ मागे पडला. कारखानदार प्रत्यक्षात प्रचंड नफा कमावतात, कागदोपत्री ताळेबंदात मात्र खोटे हिशेब दाखवतात; एवढा तेजीत चालणारा धंदा बंद पडणे कारखानदारांना परवडणारे नाही हे काही चाणाक्ष कामगार नेत्यांच्या ध्यानात आले. हजार दीड हजार रुपये दरमहा पगारवाढ मागितली आणि त्यासाठी काही काळ निकराने अटीतटीने संप केला, संघर्ष चालवला तर ते कारखानदारांना महाग पडते आणि करखाना बंद ठेवण्यापेक्षा कामगारांच्या मागण्या ते मान्य करतात हे कामगारांच्या लक्षात आले. मग, आर.जे.मेहता, जॉर्ज फर्नांडिस, दत्ता सामंत यांचे युग कामगारजगतात आले. कारखानदार लायसेन्स-परमिट राज्यात लाभलेल्या मक्तेदारीचा उपयोग करून ग्राहकाला लुटतात. आता, कामगार लुटारूंना लुटू लागले. सारीकडे संपच संप चालू झाले. संघटित कामगारवर्गाचे पगार वाढत चालले. इतर देशांच्या तुलनेने भारतातील रोजगारीचे दर आजही पुष्कळसे कमीच आहेत, पण कामगारांची बेशिस्त, आळशीपणा, कुशलतेचा अभाव हे सारे लक्षात घेतले तर वरकरणी स्वस्त वाटणारी श्रमशक्ती प्रत्यक्षात मात्र अतिमहागडी बनली. पूर्व आणि दक्षिण आशियातील अनेक देशांनी कुशल, कष्टाळू आणि स्वस्त श्रमशक्तीचा फायदा घेऊन आर्थिक भरभराट करून घेतली. हिंदुस्थानात तेही शक्य राहिले नाही.

### चैत्रगौरीची सजावट ढासळली

समाजवादाच्या काळात सरकारी क्षेत्रातील कारखानदारी तोट्याची होऊ लागली. त्याचा बोजा सरकारी अंदाजपत्रकावर पडू लागला. खाजगी क्षेत्रातील कारखानेदेखील अडचणीत आले. मुळातच संपादन केलेले आडगिऱ्हाईकी तंत्रज्ञान झपाट्याने पूर्णत: कालबाह्य होऊन गेले. ह्या कारखानदारांच्या आधाराने उभे राहिलेले, किरकोळ भागांचा पुरवठा करणारे छोटे कारखानेही धडाधड बंद होऊ लागले. स्वातंत्र्योत्तर हिंदुस्थानात कारखानदारीचा सारा डोलारा पोकळ आणि कमजोर राहिला. शेतीतून भांडवल काढून



घेतल्यामुळे शेती दुबळी राहिली. तकलादू, अक्षम पांढरपेशांच्या हाती कारखानदारीचे कर्णधारपद गेले; ते त्यांना झेपले नाही. पण अर्थकरण आणि राजकारण या दोन्ही क्षेत्रांत त्यांची पकड जबरदस्त राहिली. साऱ्या हिंदुस्थानातील उद्योजकांना शासनाकडून जेवढे संरक्षण आणि प्रोत्साहन मिळाले तितके इतर कोणत्याच देशात मिळत नव्हते. भारतातील शेतीमालावरदेखील जितका बोजा सरकार टाकत होते, तितका बोजा जगातील इतर कोणत्याच देशात टाकला जात नव्हता. भारतीय उद्योगधंद्याची अशी सर्व बाजूने केविलवाणी अवस्था आहे.

जोतिबा फुल्यांच्या कल्पनेप्रमाणे बहुजन समाजाला विद्या मिळाली असती, त्यांच्या पिढ्यान् पिढ्या चाललेल्या तंत्रज्ञानामध्ये हलके हलके सुधारणा घडवून आणली असती आणि स्वतंत्र भारताच्या कारखानदारीचे नेतृत्व या समाजाकडे गेले असते तर भारताची कारखानदारी भरभराट कितीतरी अधिक वेगाने झाली असती. आज परिस्थिती अशी की जेथे जेथे कारखानदारीतील सरकारी गुंतवणूक अधिक तेथे कारखानदारी खुरटलेली; बेकारी, गरीबी फोफावणारी. याउलट, पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र या राज्यांतील अनुभव असा की केवळ पाचदहा वर्षे शेतकऱ्यांच्या एकदोन शेतीमालांना माफक भाव मिळाला आणि त्यांच्या हाती पैसा खेळू लागला तेव्हा तेव्हा व्यापार उदीम यांची भरभराट झाली, आणि छोटे उद्योगधंदे जोमाने वाढले, पसरले. महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा आणि पंजाबातील अनेक गावे यांची साक्ष देतात की स्वातंत्र्यानंतर हिंदुस्थानातील उद्योगधंद्याचे धोरण करंटे नसते तर देशातील कारखानदारी आज आशियातील इतर कोणत्याही देशापेक्षा अधिक कार्यक्षम आणि संपन्न झाली असती.

समाजवादाच्या कालखंडात कारखानदारी उभारण्याच्या नावाखाली जागोजाग कारखाने नसलेले कारखाने उभे राहिले. चैत्रगौरीच्या वेळी घरोघर बायका गौर सजवतात; त्यासाठी आसपासची उसनी बाहुलीखेळणी आणतात आणि त्यातच धन्यता मानतात. गेल्या पन्नास वर्षांत भारतात उभी राहिलेली ही कारखानदारी अशीच उसन्या ऐटीची, चैत्रगौर सजवल्यासारखी उभी राहिली.

❑ ❑ ❑

# आगगाडी रुळावरुन घसरली

## इंग्रजी राज्याचे वरदान

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या पन्नास वर्षांत आर्थिक नियोजनाची सारी सूत्रे शासनाच्या हाती राहिली. उद्योगांना फाजिल संरक्षण, शेतीवर भांडवलनिर्मितीचा सारा बोजा, सरकारी नियोजनाची सर्वंकष सत्ता, या नियोजन सूत्रांचा परिणाम शेती व उद्योगधंदे यांवर झाला. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील सरकारी हस्तक्षेपाचे दुष्परिणाम सर्वदूर सर्व क्षेत्रांत कसे दिसून आले हे पाहणे महत्त्वाचे आहे. वाहतूक क्षेत्राचाचा आढावा घेऊ.

हिंदुस्थान हा खंडप्राय देश. मुसलमान येथे येईपर्यंत कमानी किंवा घुमट बांधण्यांची कला देशातील कारागीरांना फारशी अवगत नव्हती. नद्यांवर सांडवे असत, पूल नाही. सैन्याच्या हालचालीदेखील पाऊसपाण्याच्या अंदाजाने कराव्या लागत. कुंजपुऱ्याला सदाशिवभाऊंना पावसाळा सुरू होण्याआधी फौज यमुनापार करता आली नाही त्यामुळे मराठी फौजेचे पानिपत झाले. वाहतुकीसाठी जे काही मार्ग उपलब्ध होते ते मुसलमान आमदानीत शेरखानानंतर बांधले गेले. मोठमोठ्या नद्यांवरील पूल कंपनी सरकारने बांधण्यास सुरुवात केली. या खंडप्राय देशावर राज्य करायचे असेल, येथील व्यापार वाढवायचा असेल तर सुरक्षित आणि सुरळीत वाहतूकव्यवस्था तयार करणे त्यांच्या दृष्टीनेही आवश्यक होते. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळातच लॉर्ड बेंटीकने ठगीचा बंदोबस्त केला. रस्ते बांधून काढले. गावोगाव 'टपाल' पोहोचविण्याची व्यवस्था केली. आणि, इंग्लंडमधील लोहमार्गावर वाफेच्या इंजिनाने पहिली गाडी ओढली त्यानंतर थोड्याच वर्षांत मुंबई ते ठाणे 'आगगाडी' धावू लागली. एवढ्या प्रचंड आकाराच्या देशावर राज्य करायचे किंवा येथील कच्चा माल स्वस्तात खरेदी करून इंग्लंडमधील कारखानदारी माल येथील बाजारपेठेत पोहोचवाचा असेल तर वाहतुकीची सुरक्षित, विश्वसनीय आणि बिनधोक साधने उपलब्ध झाली पाहिजेत हे इंग्रज राज्यकर्त्यांनीही अगदी लवकर जाणले.

## लोहमार्गाचे जाळे थिजले

साऱ्या जगातील सर्वात मोठे लोहमार्गाचे जाळे हिंदुस्थानात तयार झाले. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा २५००० मैल इतक्या लांबीचे रेल्वेमार्गाचे जाळे इंग्रज सोडून गेले.



स्वातंत्र्यानंतरच्या काळात लोहमार्गांचा विस्तार जवळजवळ झालाच नाही. पूर्व पाकिस्तान (आताचा बांगला देश) हिंदुस्थानापासून वेगळा झाला आणि पूर्वेकडील आसाम राज्याचे साऱ्या देशाशी दळणवळण आणि वाहतूक करण्यासाठी एक अरुंद भौगोलिक पट्टी काय ती शिल्लक राहिली. लष्करी हेतूने आसाम व बंगालला जोडणारी रेल्वेव्यवस्था तातडीने उभी करण्यात आली. एवढा अपवाद सोडला तर इंग्रज गेल्यानंतर, देशातील रेल्वेमार्गाची लांबी जशीच्या तशीच राहिली. आपल्या परिचयाची उदाहरणे घ्यायची झाली तर पुणेमुंबईसारख्या महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरांना देशातील इतर महत्त्वाच्या शहरांशी जोडणारा लोहमार्ग नाही. पुण्याहून उत्तरेकडे दिल्लीला जायचे म्हटले तरी प्रथम उलट दिशेने दक्षिणेकडे तासभर धावून मग उत्तरेकडे तोंड वळवून जावे लागते. साऱ्या कोकण पट्टीला रेल्वेगाडीची ओळख आता कुठे पटते आहे.

लोहमार्गाऐवजी रस्ते बांधून वाहतुकीचे जाळे सुधारण्याचा प्रयत्न झाला. रेल्वे बांधण्याचा सुरुवातीचा खर्च मोठा हे खरे. त्यासाठी काही दूरदृष्टीचे नियोजन लागते हेही नाकारता येणार नाही. पण, लागणारा भांडवली खर्च जवळजवळ सर्वच्या सर्व स्थानिक जमिनी, मजूर आणि साधनसामुग्री यांवर होतो. परदेशी चलनाच्या खर्चाचा अंश फार किरकोळ. सर्व देशभर, निदान इंग्रजांनी ज्या गतीने लोहमार्गाचे जाळे पसरविले, तीच गती कायम ठेवली असती तर ग्रामीण भागातील बेरोजगारीचा प्रश्न आणि शेतीव्यवसायावर पडलेला लोकसंख्येचा भार मोठ्या प्रमाणात कमी झाला असता. अनुभव असे दाखवतो की ज्या ज्या प्रदेशाला लोहमार्गाचा स्पर्श झाला ते ते प्रदेश आर्थिक विकासाने उजळून गेले. ज्या प्रदेशापासून आगीनगाडी फटकारून दूर राहिली ते भाग मागासलेले राहिले. महाराष्ट्रातील धुळे, उस्मानाबाद, लातूर ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. जळगाव, भुसावळ रेल्वे येण्याआधी चिमुकली खेडी होती, आगगाडीचा स्पर्श होताच तेथील व्यापारउदीम वाढला. उलट, रेल्वेपासून दूर राहिलेले धुळे कोमेजून जाऊ लागले. मनमाड-काचीगुडा मार्गावरील औरंगाबाद, परभणी, नांदेड ही शहरे फोफावली; तुलनेने बीड, लातूर, उस्मानाबाद मागे पडली. स्वतंत्र भारताच्या शासनाने दुसरे काहीही न करता इंग्रजांनी ज्या गतीने लोहमार्ग वाढवला आणि विस्तारला त्याच गतीने काम चालू ठेवले असते आणि इतर नियोजन सारे सोडून दिले असते तरी देशाच्या विकासाची गती गेल्या पन्नास वर्षांत होती त्यापेक्षा जास्त राहिली असती.

लोहमार्ग आणि रस्त्याची वाहतूक या दोघांतील एक फरक फार महत्त्वाचा आहे. देशभर लोहमार्गाचे जाळे बारकाईने विणायचा पर्याय स्वीकारला गेला असता तरी अगदी सुरुवातीचा काही काळ सोडल्यास सारी गुंतवणूक आणि खर्च यांचा पैसा

बहुतांशी देशातच राहिला असता. उंचसखल भाग योग्य पातळीत आणणे, पूल बांधणे, बोगदे खणणे, रुळ टाकणे ही सर्व कामे प्रामुख्याने श्रमशक्तीने होतात. याउलट, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांचे सारेच तंत्रज्ञान परदेशी, त्यामुळे होणाऱ्या साऱ्या गुंतवणुकीचा मोठा फायदा दुसऱ्या प्रगत देशांतील अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर होतो. लोहमार्गांच्या विस्ताराचे प्रकल्प व्यापक प्रमाणात राबविले गेले असते तर ग्रामीण भागातील, पर्याय नाही म्हणून शेतीवर राहिलेली श्रमशक्ती बिगरशेती क्षेत्राकडे वळली असती. थोडी फार अतिशयोक्ती होत असेल, पण स्वतंत्र हिंदुस्थानच्या सरकारने नियोजनाचे दुसरे कोणतेही प्रकल्प हाती न घेता केवळ लोहमार्गाचा विस्तार आणि त्याला पूरक म्हणून रस्ते बांधणीचे प्रकल्प हाती घेतले असते तरी पन्नास वर्षांच्या कालावधीत हिंदुस्थान जगातील दुय्यम राष्ट्रांच्या रांगेत तरी जाऊन बसला असता; आजच्याप्रमाणे अगदी शेवटच्या पंक्तीत त्याची गणना राहिली नसती हे नक्की.

इंग्लंड, अमेरिका, जर्मनी इत्यादी देशांच्या आर्थिक विकासाचा इतिहास ही बोलकी उदाहरणे आहेत. आगगाडीने वाहतुकीची क्रांती आणली आणि त्यातून उद्योगधंद्याच्या वाढीसाठी वाहतुकीची संरचना तयार झाली. लोहमार्ग बांधण्याच्या भांडवली खर्चातून सर्वसामान्य लोकांच्या हाती काही पैसे गेले. शेतीच्या नित्यक्रमाने चालणाऱ्या चक्रातून त्यांची सुटका झाली. यातील अनेकांनी छोटे छोटे व्यापार उदीम चालू केले. या देशांतील औद्योगिक विकासाचे वर्णन लोहमार्गाने 'एवम् प्रवर्तितम् चक्रम्' असे केले जाते.

ज्या गावांना रेल्वेने स्पर्श केला त्यांचे सोने झाले. ज्या शहरांपासून आगगाडी फटकून दूर गेली ती शहरे कोळपली आणि खुरटली. अगदी अलीकडे रेल्वे मंत्रालयाने विकासाचा सारा भार दोन कार्यक्रमांवर ठेवला आहे. मोठ्या शहरांना जोडणाऱ्या आगगाड्यांतील प्रवाशांना सुखसोयी उपलब्ध करून देणे, त्यासाठी 'वातानुकुलित डबे', 'खानपान सेवा' आणि थोड्या प्रमाणात गाडीची गती वाढवणे. बस्स एवढेच! दुसरा कार्यक्रम म्हणजे अरुंद पट्ट्यांच्या मार्गावर विस्तारीकरण करून सारे मार्ग ब्रॉडगेजचे करणे. रेल्वे मंत्रयालयाच्या या दोन उपक्रमांमागील हेतू सहज समजण्यासारखा आहे. लाखो गावी पोहोचण्यासाठी आजही बारमाही वाहतुकीचे रस्ते नाहीत. लोहमार्गाचा प्रश्नच उद्भवत नाही. दीड लाखावर खेडी पावसाळा आला म्हणजे जगापासून तुटून जातात- येण्याजाण्याचेही काही साधन राहत नाही. पण दिल्लीतील नियोजकांच्या दृष्टीने या लक्षावधी खेड्यांतील लोकांच्या दुःखाला आणि अडचणीला फारसे महत्त्व नाही. मोठमोठ्या शहरांतील उद्योगधंद्यामुळे बरकत आलेल्या शहरी भद्र लोकांचा प्रवास



अधिक सुकर करणे हा कार्यक्रम त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा! त्यामुळे 'शताब्दी', 'राजधानी', 'ऑगस्ट क्रांती', अशा नावांच्या गाड्या पूर्वीपासून पुढारलेल्या शहरांमधील प्रवास थोडाफार अधिक सुखकर करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

## रुंदीकरणाचे राजकारण

लोहमार्गाच्या रुंदीकरणाचा प्रकार असाच. सर्व देशातील सर्व लोहमार्गांची रुंदी एकसारखी असावी यात काही वाद नाही. व्यापारी, कारखानदारी मालाची काय किंवा सैन्याची काय, वाहतूक त्यामुळे अधिक सुलभ होते यात काही शंका नाही. इंजिने, डबे आणि वाघिणी इत्यादी सामुग्रींचे उत्पादन करणेही सुलभ होते, हेही खरे. पुढे मागे एका काळी संपूर्ण देशातील सर्व लोहमार्ग एकाच रुंदीचे व्हावेत हे उद्दिष्ट अगदी योग्य आहे. पण स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पन्नास वर्षांत रेल्वेमार्गाचे रुंदीकरण महत्त्वाचे का त्यांचा विस्तार महत्त्वाचा? असा प्रश्न उभा राहिला तर विस्ताराला प्राधान्य मिळाले पाहिजे यात काही शंका नाही.

एक उदाहरणाने हा मुद्दा स्पष्ट व्हावा. मराठवाड्यात रुंदीकरणाचे आंदोलन मोठे लोकप्रिय झाले; मराठवाड्याची सारी 'अस्मिता' पणाला लावून आंदोलने झाली. त्यात उत्साहाने भाग घेतला ते मनमाड-काचीगुडा रेल्वेमार्गावर असलेल्या प्रदेशातील लोकांनी. नाव मात्र साऱ्या मराठवाड्याचेच. मनमाड-काचीगुडा मध्यम रुंदीचा मार्ग बांधला गेला आणि औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड हे, मार्गाच्या दोन्ही बाजूचे प्रदेश उजळून निघाले. त्यांच्या तुलनेत बीड, उस्मानाबाद, लातूर या पट्ट्यातील आर्थिक विकास मंदावला. काचीगुडा मार्गाचे रुंदीकरण करणे आणि मनमाड-लातूर मार्ग नव्याने सुरू करणे या दोन विकल्पांची तुलना केली तर काचीगुडा मार्गावरील मध्यम रुंदीचा मार्ग कायम ठेवून रुंद मार्ग बीड, उस्मानाबाद, लातूर या पट्ट्यात तयार करणे कितीतरी पटीने अधिक फायद्याचे ठरले असते. नव्याने रेल्वे आली तर मागे पडलेला हा सारा भूप्रदेश झपाट्याने आर्थिक प्रगती करू लागला असता. पण बीड, उस्मानाबाद, लातूर या प्रदेशांच्या विकासाची निकड स्वातंत्र्योत्तर काळातील शासनाला वाटली नाही. त्याऐवजी औरंगाबाद, नांदेड प्रदेशातील, तुलनेने अधिक पुढारलेल्या प्रदेशातील लोकांच्या गरजा पुरवण्यास प्राधान्य दिले गेले. जुने अरुंद रुळ भंगार ठरले. त्याच जागी नवीन रुळ घालण्यात आले. हीच नवीन साधनसामुग्री वापरून मराठवाड्यात नवा मार्ग टाकण्यात आला असता तर त्याचा अगदी वेगळा परिणाम दिसून आला असता. नवे लोहमार्ग टाकण्यासाठी काही नियोजन आणि दूरदृष्टी लागते. स्वातंत्र्योत्तर काळात या प्रकारचे

निर्णय तातडीने पडणाऱ्या राजकीय दबावाखाली घेतले गेले. परिणाम असा की इंग्रज गेले तेव्हा कार्यक्षमतेसाठी साऱ्या जगातील गाजलेली भारतीय रेल आज निकृष्ट अवस्थेत जाऊन पोहोचलेली आहे.

## रस्ता-वाहतुकीचे प्रस्थ

स्वातंत्र्योत्तर काळात वाहतुकीसाठी रेल्वेऐवजी रस्त्यांकडे आणि पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या गाड्यांकडे महत्त्व आले. श्री. स.का.पाटील यांच्या आत्मचरित्रात एक मोठा मजेदार किस्सा सांगितला आहे. पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनांच्या काळात धरणांसाठी मोठ्या प्रमाणावर सिमेंटची आयात करण्यात आली. काही प्रमाणात देशातील उत्पादनही वाढवण्यात आले. सिमेंट जमले पण धरणांसाठी त्याबरोबरीने लोखंडपोलादही लागते त्याच्या उत्पादनाचे नियोजन कच्चे राहिले. जागोजाग सिमेंटच्या पोत्यांचे ढीग साठून राहिले. लोखंड उपलब्ध होईपर्यंत सारी पोती तशीच पडून दिली असती तर पावसापाण्यामुळे सारे सिमेंट घट्ट होऊन फुकट गेले असते. कोणा बुद्धिमंताने दिल्लीहून फतवा काढला, शक्य तेथे सिमेंटचे रस्ते त्वरेने बांधण्यात यावेत. सिमेंटचे रस्ते बांधायला फारसे लोखंड लागत नाही, खडी आणि सिमेंट यांचे मिश्रण करून ओतले की झाले रस्ते तयार! अशा रस्त्यांचे बांधकाम देशभर मोठ्या प्रमाणावर करण्यात आले. गेल्या १० वर्षात जागोजाग सिमेंट कॉंक्रीट फोडून काढून नवे रस्ते बांधण्याचा उपद्व्याप अनेक ठिकाणी करण्यात आला. ते सारे रस्ते, स.का.पाटील सांगतात त्या काळात बांधलेले आहेत.

रेल्वेमार्गाऐवजी रस्ते बांधण्यात स्वातंत्र्योत्तर काळातील राज्यकर्ते आणि त्यांचे भाईभतिजे कारखानदार यांची एक मोठी सोय होती. रेल्वे जाळे तयार करण्यासाठी नियोजन लागते. रस्त्यांचे तसे नाही. भिलाईला कारखाना काढला आणि त्या कारखान्यापासून सगळ्यात जवळच्या महामार्गापर्यंत जोडणारा प्रशस्त, शानदार, चौपदरी रस्ता बांधला की प्रश्न भिलाईपुरता मिटला. सारेच नियोजन हातातोंडाशी हिशेब करून चलत असल्यामुळे इंग्रजांच्या काळातील वाहतुकीसंबधी धोरण टाकून दिले गेले - रेल्वेऐवजी रस्ते आणि ट्रकगाड्या यांचे महत्त्व वाढले. पंजाबपासून केरळपर्यंत किंवा द्वारकेपासून गोहत्तीपर्यंत मालवाहतूक करण्यासाठी ट्रक-गाड्या अहोरात्र धावू लागल्या.

रेल्वेऐवजी रस्त्याला महत्त्व देण्याच्या धोरणाचे काही परिणाम अटळ होते. रेल्वे वाहतूक कमी खर्चाची. त्यासाठी लागणारा कोळसा आणि वीज ही इंधने देशातल्या देशात तयार होणारी. याउलट, ट्रक गाड्या, बस किंवा प्रवासी गाड्या आणि त्या



पलीकडे आजकाल चौफेर दिसणाऱ्या दुचाकी गाड्या एक मोठी समस्या उभी करतात. त्यांची इंजिने छोटी त्यामुळे त्यांची कार्यक्षमताही कमी. पंजाबपासून निघालेला ट्रक दर शंभर सव्वाशे किलोमीटरवर ऑक्ट्रॉय भरण्यासाठी थांबत आणि वाटेवरील पोलीसाच्या हाती चिरीमीरी देत त्रिवेंद्रला पोहोचेपर्यंत खर्च होणारी ऊर्जा लोहमार्गाच्या तुलनेने कितीतरी पट अधिक. इंजिन जितके लहान तितके ते अधिक अकार्यक्षम. खाचखळग्यांनी भरलेल्या आपल्याकडील रस्त्यांवरून लक्षावधी गाड्या पेट्रोल आणि डिझेल यांच्या अकार्यक्षम वापर करीत धावत आहेत. यातून देशापुढे एक मोठे 'संकट' उभे राहिले.

अमेरीकेत एकेकाळी रेल्वे वाहतुकीचे मोठे महत्त्व होते. खंडप्राय देश. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आगगाड्या मोठ्या दिमाखाने प्रवासी आणि सामान यांची वाहतूक करीत. आता तेथील रेल्वेव्यवस्था मोडकळीस येत आहे आणि त्याऐवजी रस्त्यावरील वाहतुकीस जास्त महत्त्व येत आहे. रशियातही काहीशी अशीच परिस्थिती आहे. भारतातील आंग्लविद्याविभूषित तज्ज्ञांच्या दृष्टीने पाश्चिमात्य देशांत जी काही लाट असेल तीच योग्य. तेव्हा तेथील नियोजनकर्त्यांनी अमेरिका रशियाची नक्कल करावी आणि लोहमार्गांकडे दुर्लक्ष करून रस्त्यांच्या वाहतुकीस महत्त्व देण्याचा कित्ता गिरवावा हे समजण्यासारखे आहे. परंतु, हिंदुस्थानातील परिस्थिती एका महत्त्वाच्या बाबतीत अमेरिका व रशिया यांच्यापेक्षा अगदी वेगळी आहे. हे दोन्ही देश पेट्रोलियम खनिजांच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण आहेत. अमेरिका आज मध्यपूर्वेतून पेट्रोलियम पदार्थांची आयात करते हे खरे; पण त्याचे कारण त्यांच्या देशात पेट्रोलियम उपलब्ध नाही हे नाही. आपल्या खनिजांचा साठा शाबूत ठेवावा आणि तुलनेने मध्यपूर्वेत आफ्रिकेत व लॅटिन अमेरिकेत स्वस्त किंमतीत उपलब्ध होणारे पेट्रोल वापरावे अशा विचारपूर्वक आखलेल्या धोरणाने अमेरिका पेट्रोलियम पदार्थांची काही आयात होऊ देते.

हिंदुस्थानची परिस्थिती अशी नाही, आपल्याकडील कोळसा कमी प्रतीचा हे खरे; पण आगगाडीच्या कामाला चालून जाईल असा आहे. याउलट, पेट्रोलियम खनिजांचे आपल्याकडील साठे अगदीच किरकोळ. दरवर्षी हजारो कोटी रुपयांच्या पेट्रोलियम पदार्थाची आयात केल्याशिवाय आता देशाचे चालूच शकत नाही. पेट्रोलियम उर्जेसाठी आयातीवर अवलंबून असलेल्या देशात हजारो किलोमीटरचे प्रवास ट्रक-गाड्या रात्रंदिवस करत असतात आणि अत्यंत कमी कार्यक्षमतेच्या दुचाक्या शहरातील रस्त्यांवरून गोंगाट घालीत फिरत असतात. हे चित्रच, त्याचा परिणाम भयानक नसता तर, मोठे हास्यापद आहे. विकासाच्या कार्यक्रमात अगदी सुरुवातीपासून परकीय चलनाचा तुटवडा ही एक मोठी समस्या राहिली आहे. देशाचे नशीब असे बलवत्तर की वेळोवेळी अकस्मात

मदतीचा हात मिळाला आणि परकीय चलनाच्या तुटवड्याचे संकट देश पार करून गेला! इंग्लंडने अभूतपूर्व औदार्याने हिंदुस्थानातील इंग्रजी शासनाने दुसरे महायुद्ध चालवण्यासाठी केलेला खर्च भरून दिला. अमेरिकेने 'PL ४८०' अन्नाच्या पुरवठ्याकरिता देय रक्कम माफ केली. देशात काही तुटपुंजे पेट्रोलचे साठे सापडले. परदेशात जाऊन राहिलेल्या अनिवासी भारतीयांनी इकडे पैसे पाठवून परकीय चलनाची चणचण थोडी सुसह्य केली. तरीही, परकीय चलनाचा तुटवडा गेली पन्नास वर्षे देशाला भेडसावीत आहेच. रुपयाची किंमत सतत घसरत आहे याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे स्वतंत्र हिंदुस्थानच्या सरकारने जाणीवपूर्वक स्वीकारलेले पेट्रोलियम पदार्थांच्या आयातीवरील परावलंबीत्व.

स्वातंत्र्यानंतर ५० वर्षे उलटली. आजही रुपयाची घसरण चालूच आहे. देशातील उद्योगधंदे परदेशी स्पर्धेपुढे टिकाव धरू शकत नाहीत याची कारणे अनेक आहेत. त्यांतील एक महत्त्वाचे कारण - इंग्रजांनी खंडप्राय देशातील वाहतुकीसाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि विशेषत:, लोहमार्ग यांवर भर दिला. स्वतंत्र हिंदुस्थानच्या नियोजकारांनी इतकी दूरदृष्टी ठवेली नाही. 'इंडिया'तील आपल्या दोस्त उद्योजकांचे लगबगीने हित साधण्यासाठी चुकीचे वाहतूक धोरण राबविले हे देशाच्या आर्थिक घसरगुंडीचे एक महत्त्वाचे कारण यात काही संशय नाही.

❐❐❐



# सुरक्षाव्यवस्थेतही 'अंग्रेजियत'च राहिली

## सारी गोऱ्यांचीच पिलावळ

महात्मा गांधीनी एका परदेशी पत्रकाराला दिलेल्या एका मुलाखतीतील वाक्य सर्वश्रुत आहे. पत्रकाराने विचारले, 'तुम्ही आणि तुमचे शिष्य जवाहरलाल नेहरु यांच्यामध्ये मोठे मतभेद आहेत असे बोलले जाते. या मतभेदांचे नक्की स्वरूप काय?'

गांधीजी म्हणाले, 'अगदी थोडक्यात फरक सांगतो. माझे स्वप्न आहे की येथून इंग्रजांची नीती हटली पाहिजे, भले इंग्रज येथे राहिले तरी चालतील. याउलट, जवाहरची भूमिका आहे. त्याला वाटते इंग्रज येथून हटले पाहिजेत, भले इंग्रजांची व्यवस्था येथे चालू राहो.'

महात्म्याचे हे वाक्य द्रष्टेपणे एक विदारक सत्य सांगून गेले. स्वातंत्र्याच्या ५० वर्षांनंतर या वाक्यात सुधारणा करायची झाली तर एवढीच - '......जवाहरच्या मते इंग्रज गेला पाहिजे पण त्याची व्यवस्था अबाधित राहिली पाहिजे.'

कॉंग्रेसच्या स्थापनेपासून शहरी, इंग्रजी बुके वाचलेल्या सुखवस्तू मंडळींची महत्त्वाकांक्षा स्पष्ट झाली होती. इंग्लिश भाषानाम वाघिणीच्या दुधाची थोडीशी चव ओठाला लागताच त्यांच्या मनात एक विशेष महत्त्वाकांक्षा जागी झाली होती. 'इंग्रजी राज्याने कायदा सुव्यवस्था प्रस्थापित केली, टपालाची व्यवस्था आणली, तारयंत्रे कडकट्ट करू लागली, लोखंडी रुळावर वाफेच्या ताकदीवर आगगाड्या धावू लागल्या. हे सुराज्य मोडकळीस येऊ नये; त्याची सूत्रे, हळूहळू का होईना आपल्या हाती यावी. प्रथम सनदी नोकरशाहीत प्रवेश मिळावा. मग, स्थानिक स्वराज्य संस्थात. नंतर कायदे-कौन्सिलात आणि तद्नंतर राजकीय सत्तेत.' पण एवढा धीर सगळ्यांनाच नव्हता. काहींना हा सारा बदल तातडीने व्हावा असे वाटत होते. इंग्रज जावेत आणि त्यांच्या खुर्च्यांवर चटकन चढून आपल्याला बसता यावे अशी त्यांची तीव्र महत्त्वाकांक्षा होती.

जॉर्ज ऑरवेलच्या 'ॲनिमल फार्म'मध्ये दुष्टकर्मा शेतकऱ्याला मळ्यातील सारी जनावरे एकत्र बंड करून हाकून लावतात. बंडाचे नेतृत्व करणारी डुकरे जनावरांना संपूर्ण स्वातंत्र्य देणारी व्यवस्था तयार करण्याऐवजी डुकरांचे आधिपत्य स्थापन करू पाहतात आणि शेवटी माणसाप्रमाणे दोन पायावर चालू लागतात. 'अंग्रेजियत' कायम ठेवावी, फक्त गोऱ्यांच्या ऐवजी गहुवर्ण नेटिवांनी बसावे हा स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्यांचा खराखुरा मनोदय होता. कोणाच्या मनात काय चालले आहे याचा

तपास वर्तमानातही लागत नाही; पन्नासशंभर वर्षांपूर्वीच्या नेत्यांच्या मनात डोकावून पहावे कसे? त्यांच्या साऱ्या कार्यक्रमाचा प्रत्यक्ष परिणाम काय झाला यावरूनच त्यांच्या उद्दिष्टांचा अंदाज घेता येईल.

स्वातंत्र्यानंतर देशाचे औद्योगिकीकरण, शेतीसंबंधीचे धोरण, वाहतुकीची व्यवस्था या क्षेत्रांत स्वत:ला गोरेपान समजणाऱ्या काळ्या इंग्रजांच्या कारवायांचा काय परिणाम झाला हे आपण पाहिले. अर्थकारणात आपापला स्वार्थ साधण्याची बुद्धी भल्याभल्यांना होते, ते एकवेळ समजण्यासारखे आहे. परंतु, देशाभिमानाच्या गाथा गाणाऱ्या, राष्ट्रीय स्वातंत्र्याची महती सांगणाऱ्या नेत्यांनी देशाच्या संरक्षणाच्या क्षेत्रातही स्वार्थबुद्धी वापरली आणि जे निर्णय घेतले त्यामुळे देश सतत कमकुवत राहिला आहे. आणि, आजही संरक्षणाची स्थिती अशी आहे की पाकिस्तानसारख्या, एक नवमांश आकाराच्या राष्ट्राबद्दलसुद्धा सर्वांना मोठी धास्त वाटते.

## इंग्रजी फौजेची व्यावसायिक परंपरा

प्रत्येक देशाच्या लढाऊ फौजा आणि जवान हा त्या त्या देशाचा अभिमानाचा विषय असतो. आपल्या जवानांच्या आत्मविश्वासाला, निर्धाराला धक्का पोचेल असे कोणी काही बोलू नये, लिहू नये असा संकेत आहे. देशाकरिता प्राण धोक्यात घालणाऱ्या आणि प्रसंगी रक्त सांडणाऱ्या जवानांचा तेजोभंग होईल असे काहीही करणे हे नीचपणाचेच कृत्य आहे. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांत देश, कसा का होईना, जिवंत आहे याचे श्रेय लाल बहादूरशास्त्रींच्या 'जय जवान, जय किसान' या घोषणेला आहे. पण सरहद्दीवर मारण्यामरण्याच्या ईर्षेने पुढे जाणाऱ्या सैनिकाच्या मागे एक मोठी प्रचंड बांधणी, यंत्रणा आणि संघटना लागते; ती संघटना कार्यक्षम ठेवणे ही राजकीय नेतृत्वाची जबाबदारी आहे. ती जर सर्वोत्कृष्टपणे पार पाडली नाही तर जवानांचा घात केल्याचे पाप आहे. जवानांची स्तुतिस्तोत्रे गायची, त्यांची स्मारके उभारायची, शाहिरी पोवाडे, कवने गायची; पण, सरहद्दीवर लढणाऱ्या जवानाचे पाय ओढायचे, रसद तोडायची असे करणे राष्ट्रद्रोहाचे कृत्य आहे. स्वातंत्र्यानंतर ज्यांच्या हाती सत्ता आली त्यांनी संरक्षणाची काय तरतूद केली हे पाहाणे मोठे मनोरंजक ठरेल.

इंग्लंडचे सारे लष्कर, नौदल आणि वायुसेना पूर्णत: व्यावसायिक आहे. म्हणजे, फौजेतील नोकरीकडे एक जीवनमार्ग आणि 'करिअर' या दृष्टीने पाहणारे नागरिक सैन्यात जातात. तरुणपणी भरती होतात, कठोर प्रशिक्षण घेतात आणि लष्करी तयारीची ही मंडळी देशाच्या सर्वसाधारण काळातील संरक्षणाची व्यवस्था बघतात. प्रत्यक्ष युद्ध



पेटले तर ते लढण्याचे काम व्यावसायिक सैन्याच्या आटोक्याबाहेरचे असते. अशा वेळी ठरावकि वयोगटातील तरुणांना युद्धसेवेसाठी सैन्यात दाखल व्हावे लागते. शक्य तितक्या लवकर प्रशिक्षण संपवून आघाडीवर लढण्यास हे तरुण रवाना होतात. युद्ध चालू असते तेव्हा प्रत्येक घरातील, प्रत्येक कुटुंबातील कोणी ना कोणी सरहद्दीवरच्या धुमश्चक्रीत आपला जीव धोक्यात घालत असतो. त्यामुळे, देशावरचे आक्रमण हा साऱ्या जनांच्या जिव्हाळ्याचा विषय होऊन जातो.

## हिंदुस्थानातील इंग्रजी लष्कर

ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्थानात राजकीय सत्ता संपादन करण्याच्या दृष्टीने पावले टाकायची ठरवली. केवळ इंग्लंडातून आलेल्या पलटणींवर अवलंबून राहून नेटिव्ह नबाब, राजे आणि सरदार यांच्या गावठी आणि बेशिस्त फौजांनाही तोंड देणे शक्य झाले नसते; त्यांचा पाडाव करणे तर दूरच राहिले. कंपनीच्या पलटणी उभ्या राहिल्या त्यात सैनिकांचा भरणा इंग्रजांशी निष्ठा बाळगणाऱ्या एतद्देशीय मागासवर्गातील समाजातील तरुणांचा होता. येथील समाजात आपल्याला माणूस म्हणूनदेखील स्थान नाही म्हणून दुरावलेले हे समाज मुसलमान बादशहांच्या सेवेतही होते. बादशहांच्या दरबारी उच्चवर्णीय सरदारमनसबदारांचीही हजेरी होती. त्यामुळे एकसंघ फौजा उभ्या राहिल्याच नाहीत. मोगलांचे सैन्य म्हणजे मोठा गदळ कारभार. इंग्रजांनी पलटणी उभ्या केल्या, त्यांना लष्करी शिस्तीचे आणि त्या काळातील आधुनिक शस्त्रास्त्रांचे शिक्षण दिले. आणि, अशा तऱ्हेने उभ्या राहिलेल्या फौजांनी आपले काम निष्ठेने बजावले आणि साऱ्या मोगलसत्तेचा व उच्चवर्णीय राजेरजवाड्यांचा पाडाव केला. इंग्रजांचे राज्य प्रस्थापित झाले याचे फार मोठे श्रेय हिंदुस्थानातील मागासवर्गीयांस आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनाही व्हाईसरॉय लाटसाहेबांनी हे वारंवार निक्षून सांगितले. हिंदुस्थानातील इंग्रजी फौज पूर्णपणे व्यावसायिक राहिली.

हे साहजिकच होते. ज्या देशावर आधिपत्य गाजवायचे तेथील नेटीव्ह मंडळींना सैन्यात सरसकट येऊ दिले तर त्याचे परिणाम काय होतील याची इंग्रजांना चांगली जाणीव होती. 'सैन्यात शिरा, हातात बंदुका घ्या आणि प्रसंग पडेल तसे बंदुकांची तोंडे फिरवा' असा कार्यक्रम स्वातंत्र्यवीर सावरकरांनी उघड दिला होता. या धोक्याकडे काणाडोळा करण्याइतके इंग्रज काही अजागळ नव्हते. सैन्यात भरती होणाऱ्या प्रत्येक जवानाची निष्ठा पारखून घ्यावी, जातीचा, पूर्वी सैन्यात मर्दुमकी गाजवलेल्या आपल्या कुळातील एखाद्या पूर्वजाचा अभिमान पाहूनच भरती करावी असा दंडक होता. म्हणजे,

कंपनीच्या आणि त्यानंतरच्या इंग्रजी राज्याच्या हिंदुस्थानातील फौजा पूर्णत: व्यावसायिक राहिल्या. येथील जनतेचा आणि त्यांचा संबंध राहिला नाही. एवढेच नव्हे तर, त्यांच्यामध्ये सतत एकक दुरावा राहिला. इंग्रजांच्या हिंदुस्थानातील पलटणींनी पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात मोठी मर्दुमकी गाजवली, नाव कमावले, पण हिंदुस्थानातील आम जनतेच्या मनात मात्र या सैनिकांविषयी परकीयांचे भाडोत्री फौजी अशी एक तिरस्काराची भावना राहिली.

लष्कराबद्दल जी स्थिती तीच नागरी पोलीस खात्याबद्दलही. आम जनतेपासून दूर राहणारे, त्यांच्या भावनांची कदर न करता आवश्यक तर जुलूमजबरदस्ती करणारे असे पोलीसखाते उभे राहिले. जिल्ह्याजिल्ह्यात फार तर एखाद दुसरा गौरकाय अधिकारी; अन्यथा, बाकी सारे येथेच भरती केलेले, पण इंग्रजी राज्याविषयी प्रचंड निष्ठा बाळगणारे नेटिव्ह.

## पोलादी नेतृत्वाचा अभाव

१८५७ चे बंड, त्यानंतर वासुदेव बळवंत फडके किंवा बंगालमधील शेतकऱ्यांची बंडे, विसाव्या शतकाच्या सुरूवातीचे बॉंब व पिस्तुलाचा वापर करणारे पंथ आणि शेवटपर्यंत शस्त्रास्त्रांनी इंग्रजी राज्याशी झुंज घेणारे भगतसिंग, चंद्रशेखर आजाद यांसारखे नरपुंगव स्वातंत्र्याच्या आंदोलनातील एक छोटे प्रकरण होते. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य आंदोलनाचा मध्यप्रवाह तयार झाला तो अहिंसात्मक सत्याग्रह आणि विधायक कामांचा. आंदोलन उभे राहिले म्हणजे सरकार ठेवील त्या तुरुंगात राहावे आणि सरकार सोडेल तेव्हा बाहेर येऊन जनतेच्या प्रेमळ स्वागताचा आस्वाद घ्यावा; अधिकाधिक वीरश्रीपूर्ण घोषणा, भाषणे करावी एवढीच स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यांची लष्करी तयारी होती. दुसरे महायुद्ध उभे राहिले. जपान झपाट्याने पुढे सरकू लागला. कलकत्त्यावर बॉंब पडू लागले. पर्याय नाही म्हणून 'करो या मरो' या आंदोलनाची घोषणा झाली. पण ही घोषणा करण्यापूर्वी कोणतेच नियोजन झालेले नव्हते; ना करण्याचे ना मारण्याचे. स्वातंत्र्य मिळाले ते इंग्रजांच्या मजबुरीने आणि आंतरराष्ट्रीय दबावाच्या रेट्याने.

## आझाद हिंद फौज फितूर ठरली !

सैन्याच्या बांधणीसंबंधी एक मोठा विचित्र प्रश्न स्वातंत्र्याची पहाट उगवत असतानाच नेत्यांच्या पुढे उभा राहिला. सुभाषचंद्र बोस इंग्रजांच्या तुरुंगातून सुटून निघाले, अफगाणिस्थानमार्गे जर्मनीत पोहोचले. तेथे आझाद हिंद सरकारची स्थापना



करून ते जपानला गेले. ब्रह्मदेशाच्या आघाडीवर जपान्यांनी इंग्रजांचा पाडाव केला तेव्हा ब्रिटिश फौजेतील भारतीय सैनिक हजारोंच्या संख्येने युध्दकैदी बनले. 'गुलाम देशाला कसले आले आहे परराष्ट्रीय धोरण? इंग्रजांविरुद्ध जो जो लढेल तो आपला मित्र. इंग्रज गेल्यानंतर जपानी सत्ता गाजवू लागले तर त्यांच्याविरुद्ध पुन्हा लढता येईल. पण, खोलवर पाळेमुळे रुजलेली इंग्रज साम्राज्यशाही उखडणे हेच आमचे धोरण.' सुभाषबाबूंच्या या शब्दांनी हजारो हिंदी सैनिक त्यांच्या आझाद हिंद फौजेत सामील झाले. हत्यारे नाहीत, वहाने नाही, दाणागोटाही नाही अशा अवस्थेत सरहद्दीकडे कूच केले. जपान्यांचा पाडाव झाला त्याबरोबर आझाद हिंद फौजेचाही. सुभाषबाबू विमान-अपघातात मरण पावले आणि त्यांचे सैनिक युद्धकैदी म्हणून हिंदुस्थानात आणले गेले. प्रश्न पडला तो असा की स्वतंत्र भारताचे खरे लष्कर कोणते? ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवर आझाद हिंद फौज हरली असेल, पण दिल्लीवर तिरंगा फडकतो आहे ना? म्हणजे, आझाद हिंद फौजच विजयी झाली ना? मग, ''नव्या प्रजाकसत्ताकाची अधिकृत फौज आझाद हिंद फौजच झाली पाहिजे. इंग्रजांची साम्राज्यसत्ता राबवण्यासाठी ज्या अधिकृत फौजेने काम केले तिचे विसर्जन व्हावे किंवा थोडीफार तपासणी चाचपणी करून त्यांनाच 'आझाद हिंद फौज' असे नामाभिधान द्यावे'' असा प्रस्ताव पुढे आला.

इंग्रजांनी आणि लष्करी अधिकाऱ्यांनी या प्रश्नावर मोठी ताठ भूमिका घेतली. 'आझाद हिंद सेनेतील फौजी स्वामिनिष्ठेची शपथ मोडून शत्रूला फितूर झाले आहेत. त्यांच्याकडे सैन्याचे आधिपत्य देण्याची गोष्ट दूरच, स्वतंत्र भारताच्या सैन्यात त्यांना पुन्हा प्रवेश देणेही अशक्य आहे. त्यांना सैन्यात घेतले तर फितुरांचा सन्मान केल्यासारखे होईल. त्यामुळे आम सैनिकांचे नीतिधैर्य खचेल. लष्करात असंतोष पसरेल, बंडाळी माजेल.' असे युक्तिवाद झाले. ''फितुरीच्या आरोपाखाली सुभाषबाबूंच्या सैनिकांवर खटले चालले पाहिजेत, त्यांना शिक्षा सुनावल्या गेल्या पाहिजेत. फार फार तर गव्हर्नर जनरल लाटसाहेब मोठ्या उदार मनाने त्यांच्या शिक्षा माफ करतील. यापलीकडे, या 'फितूरां'ना अधिक चांगली वागणूक देणे शक्य नाही.'' असे आग्रहाने मांडले गेले.

## आंतरराष्ट्रीय राजकारणाचे थोतांड

स्वतंत्र भारताच्या नेत्यांनी या भूमिकेपुढे मान तुकवली. आझाद हिंद फौज बरखास्त झाली. हिंदुस्थानातील इंग्रजी फौजच स्वतंत्र भारताची फौज ठरली.

या निर्णयाचे अनेक तऱ्हांनी समर्थन करता येईल. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याबद्दल अनेक पुढाऱ्यांच्या मनात मत्सर होता, आकस होता. 'नाझी हुकुमशाहीने

उभ्या केलेल्या ब्रह्मराक्षसाला तोंड देण्यासाठी जगातील लोकसत्तावादी दोस्त राष्ट्रांची बाजू नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ आहे, तिचाच पाठपुरवा करणे भारताच्या संस्कृतीस आणि इतिहासास शोभणारे आहे. साऱ्या जगभर हुकूमशाही पसरली आणि हिंदुस्थानला जपान व जर्मनीच्या मदतीने स्वातंत्र्य मिहाले तर त्यात काय मोठे श्रेय मिळणार आहे?' हा नेहरूप्रणित विचार चांगलाच प्रभाव धरून होता. स्वातंत्र्याच्या आधीपासून देशभर दंगली माजल्या, फाळणीनंतर तर युद्धापेक्षाही भयाण दंगली पेटल्या. लक्षावधी लोक निर्वासित झाले. देशात शांतता पुन्हा प्रस्थापित करायची कोणी आणि कशी? आहे त्या सैन्याला नाराज केले तर सारीच बेदिली माजेल, तेव्हा इंग्रजी फौज जशीच्या तशी स्वीकारावी असे ठरले. पहिल्या स्वातंत्र्यदिनीदेखील मोठी विचित्र दृश्ये देशभर दिसली. ध्वजवंदन झाले ते अनेक ठिकाणी स्वातंत्र्यसैनिकांना चाबकाने फोडणाऱ्या आणि बुटाने तुडवणाऱ्या सनदी नोकरांच्या हस्ते. लष्करी शिस्तीच्या कवायतींच्या मानवंदना मिळाल्या त्यावेळी सुभाषबाबूंचे सैनिक अंग चोरून कोपऱ्यात उभे राहिलेले. इंग्रजी फौज आत्मसात करण्याचा हा निर्णय काही एकांडा नव्हता. सारी सनदी नोकरशाही, सारे जुने कायदेकानून यांसह स्वतंत्र भारताच्या सरकारची स्थापना झाली. 'अंग्रेजियत' जशीच्या तशी राहिली; इंग्रज निघून गेले एवढेच काय ते! जवाहर जिंकला, महात्माजी हरले.

### फौजांची अंग्रेजीयत

स्वातंत्र्याच्या पहाटेच्या साऱ्या दंगली संपल्या, शांतता प्रस्थापित झाली. त्यानंतरही लष्कराच्या रचनेच्या प्रश्नाकडे पुन्हा एक दृष्टी टाकणे शक्य होते. तसे काही झालेले दिसत नाही. तेलंगणात शेतकरी उठले, सैन्य पाठवा. नक्षलवाद्यांवर सैन्य पाठवा. पंजाब कश्मिरमध्ये सैन्य पाठवा. कोठेही बारीकसारीक दंगली उठल्यावर आपल्याच जनतेविरुद्ध त्यांचा असंतोष तोडून काढण्यासाठी सैन्य पाठवा. असे सातत्याने चालूच असते. स्वतंत्र भारताने स्वीकारलेल्या इंग्रजी फौजाचा वापर काळे इंग्रज करतात तो गोऱ्यांप्रमाणेच!

हिंदुस्थानातील इंग्रजांची फौज आपण स्वीकारली. स्वातंत्र्याच्या काळात इंग्लंडमधील इंग्रज फौजेचा नमुना का स्वीकारता आला नाही? निदान, आणीबाणीच्या युद्धप्रसंगीतरी देशभरच्या तरुणांनी देशसंरक्षणार्थ लष्करी सेवेसाठी पुढे यावे अशी तरतूद करणचे का टाळले गेले? भारतातील लष्कर एक वेगळा समज बनून राहिला, भारतीय जनतेशी त्यांचा काही रोजमर्राचा संबंध राहिला नाही. भारतीय लष्करी अधिकाऱ्यांचे एका गोष्टीकरिता कौतुक केले पाहिजे. सारे नागरी शासन हाती घेणे त्यांना सहज



शक्य होते. तिसऱ्या जगातील बहुतेक साऱ्या लष्करशहांनी बंडे उभे करून सत्ता काबीज केली. भारतीय लष्करी सेनानींनी असा प्रयत्नही केला नाही. नागरी अधिकार श्रेष्ठ की लष्करी असा काहीसा वादाचा मुद्दा व्ही.के. कृष्णमेनन यांच्या काळात उभा राहिला होता, पण तो पेटला नाही.

भारताच्या लष्कराची रचना कशी असायला हवी? प्रचंड लोकसंख्येचा हा देश. भांडवल नाही, साधने नाहीत, शस्त्रास्त्रे बनवण्यासाठी तंत्रज्ञान नाही. अशा परिस्थितीत सैन्यामध्ये अधिकाधिक मनुष्यशक्तीचा वापर होईल अशी बांधणी करणे शक्य झाले असते. सातूच्या पिठाच्या पिशव्या पाठीशी बांधून आलेल्या चिनी फौजांनी भारतीय सैन्याला सळो की पळो करून सोडले. अमेरिकी बॉंबवर्षावाला तोंड देणे वियतनामी पोरासोरांना सहज शक्य झाले.

उंदीरघुशींप्रमाणे जमिनीत बिळे पाडून राहणाऱ्या व्हिएटनामी फौजांनी सर्व शस्त्रास्त्रांनी सज्ज अमेरिकेस शरणागती पत्करण्यास भाग पाडले. खऱ्याखुऱ्या प्रदीर्घ चालणाऱ्या लढाईत हिंदुस्थानचे संरक्षण करायचे असेल तर मनुष्यशक्तीचा वापर हाच उपयोगी ठरू शकतो.

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा किरकोळ बंदुका, तोफगोळे, काडतुसे सोडल्यास सर्वच शस्त्रसामुग्रीकरिता आपण परदेशांवर अवलंबून होतो. आता त्या परिस्थितीत बरीच सुधारणा झाली आहे. तिसऱ्या जगातील इतर देशांच्या तुलनेत आपण अधिक स्वावलंबी आहोत हे खरे, पण एका देशातून घेतलेला टँक, दुसऱ्या देशातून घेतलेला ट्रक, तिसऱ्या देशातून घेतलेल्या तोफा, आणखी कोठून मिळवलेली विमाने यांत कितीही फेरफार करून देशी उत्पादन केले तरी अशी सामुग्री महासत्तांशी झुंज घेण्यास उपयोगी पडणार आहे? त्यांच्यात शस्त्रास्त्रांची भलीबुरी नक्कल करून तयार केलेला साठा टिकणार किती दिवस? हे सारे केवळ कल्पनेतील बोलणे नाही. चीन आपला शेजारी देश आहे. हिंदुस्थान-चीन वादात सत्याची बाजू कोणती या विचारातही जाण्याचे कारण नाही. 'भारतास सर्वात मोठा धोका चीनचा आहे' असे उद्‌गार नुकतेच भाजप शासनाच्या संरक्षण-मंत्र्यांनी काढले. कोणत्या एका वादावरून चीनशी युद्ध पेटले किंवा चीन पाकिस्तानच्या मदतीच धावला तरी आपली फौज, शस्त्रास्त्रे यांचा निभाव किती दिवस लागेल?

### २१ दिवसांची युद्धतयारी

महासत्तांची गोष्ट बाजूला ठेवा. पाकिस्तान तर किरकोळ देश आहे; लोकसंख्या, आर्थिक बळ पाहिले तर तुलनेने अगदीच किरकोळ. पाकिस्तानशी युद्धप्रसंग आला

तर त्याला तोंड कसे द्यायचे याची एकूण योजना दिसते ती अशी - युद्ध पेटल्यास विमाने, अस्त्रे, विमानवेधी तोफा यांच्या सहाय्याने दिल्ली, अमृतसर यांसारख्या मोठ्या शहरांचे फार नुकसान होऊ द्यायचे नाही. सरहद्दीवरची धुमश्चक्री होता होईतो तीनचार आठवडे चालू ठेवायची आहे. सरहद्दीच्या थोडे इकडे तिकडे फूटबॉलची मॅच चालल्याप्रमाणे युद्ध चालते. आणि देशभरचे नागरिकही क्रिकेटच्या मॅचचा स्कोअर विचारावा तसे 'लष्कर कुठपर्यंत गेले हो' अशा चौकशा ट्रान्झिस्टर कानाला लावून बसलेल्यांकडे करत असतात. आंतरराष्ट्रीय संघाचा दबाव चार आठवड्यांपलिकडे युद्ध चालू देणार नाही; दोन भांडणाऱ्या मल्लांना दूर करतात त्याप्रमाणे ही झोंबी सोडवेल आणि दूर होणारे मल्ल जसे आपण काय बाजी मारली आणि लोकांनी दूर केले नसते तर दुसऱ्या मल्लाची काय अवस्था करून टाकली असती याच्या वल्गना करतात त्याचप्रमाणे दोघांना दूर केले जाईल या हिशेबाने हिंदुस्थान आणि पाकिस्तान या दोघांचीही संरक्षण धोरणे ठरली जातात. जमा केलेली सारी शस्त्रसामुग्री तीनचार आठवड्यांच्या लढाईत, उनाड पोरांनी दिवाळीचे फटाके पहिल्याच एकदोन दिवसांत उडवून टाकावे तशी उडवून संपते आणि पुन्हा शस्त्रसंपादन करण्यास आणि त्यातील कमिशन मिळवण्यास संबंधित लोक मोकळे होऊन जातात. हे भारताच्या संरक्षणव्यवस्थेला बाधक आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, काही स्थिरस्थावर झाल्यानंतर सर्वसामान्य तरुणाला सैन्यात वर्षभरतरी प्रशिक्षण मिळाले असते आणि आवश्यक पडले तर ते पाच कोटी तरुण किरकोळ शस्त्र हाती घेऊनतरी मातृभूमीच्या संरक्षणार्थ सज्ज होतील अशी योजना असती तर पाकिस्तान तर सोडाच, पण चीनचीसुद्धा हिंदुस्थानकडे तिरक्या डोळ्याने पाहण्याची हिम्मत झाली नसती. चिनी फौज चिनी जनतेची फौज आहे, व्यावसायिक लष्करशहांची नाही हेच तिच्या सामर्थ्याचे रहस्य आहे.

प्रश्न असा उभा राहतो की हिंदुस्थानी लष्कर हिंदुस्थानी जनतेचे लष्कर का झाले नाही? व्यावसायिक सैन्य ठेवण्यात अनेकांचे आर्थिक हितसंबंध असतात. लष्करात सर्वसामान्य जनतेला प्रवेश देणे व्यावसायिक सैनिकांना आवडत नाही. पण, खरे कारण त्याहूनही मोठे आहे. कोणाही हुकुमशहाला सर्वसामान्यांच्या हाती शस्त्रे रहावी असे वाटत नाही. स्वित्झर्लंड हा चिमुकला, शांतताप्रिय देश. पण, ६५ वय वर्षे होईपर्यंत प्रत्येक स्वीस पुरुष २४ तासांच्या मुदतीत आघाडीवर हजर होण्यास तयार होतो. आघाडीवर घेऊन जायची शस्त्रेदेखील त्याच्या घरीच ठेवलेली असतात. हे स्वित्झर्लंडमध्येच शक्य आहे; स्टॅलिनच्या रशियात नाही व काळ्या इंग्रजांच्या हिंदुस्थानातही नाही. व्यावसायिक लष्कर ठेवावे लागते याचा अर्थ स्पष्ट आहे. येथील सरकारचा जनतेवर विश्वास नाही.



साम्राज्यवादी शासनाप्रमाणे जनतेवर लष्कर वारंवार पाठवावे लागणार आहे, अन्यथा आपण चालवत असलेली अन्याय्य अर्थव्यवस्था टिकून राहू शकणारच नाही ही मनात दडलेली भावना असली की मग व्यावसायिक सैन्याची व्यवस्था बदलण्याची इच्छा होत नाही.

लष्कर जनतेपासून दूर, पोलीसखातेही ब्रिटीशांच्या काळाप्रमाणेच जनतेवर अंमल चालवण्याच्या ताठ्यात वागणारे. स्थानिक ठाण्यावरचा जमादारदेखील बाहेरून आलेला. स्थानिक जनतेशी ना संबंध, ना तिच्याबद्दल सहानुभूती. सर्वदूर कायदा सुव्यवस्था कोसळली तरी पोलिस अंमलदारास त्याचे काही सुखदु:ख नाही. हे असे स्वतंत्र देशात असत नाही. हिंदुस्थानची संरक्षण आणि कायदा सुव्यवस्था यंत्रणा एवढे स्पष्ट करते की हा देश खऱ्या अर्थाने स्वतंत्र झालेलाच नाही; गोरे इंग्रज गेले, त्यांच्या जागी काळे इंग्रज आले. 'ॲनिमल फार्म' मधील शेतकऱ्याला हाकून लावल्यानंतर राज्य डुकरांकडे आले, ती दोन पायांवर चालण्याचे प्रयत्न करीत आहेत, एवढेच स्पष्ट होते.

स्वातंत्र्याच्या ५० व्या वर्षात भा.ज.पा. शासनाने एक भलतीच छलांग मारली. मे महिन्यांत पाच अणुस्फोट घडवून आणले. हा प्रश्न राष्ट्राच्या सुरक्षिततेचा आहे आणि आम्ही निर्णय घेऊ ते राष्ट्रहिताच्या दृष्टीने घेऊ अशी शासनाची भूमिका आहे. पाकिस्तानचे पंतप्रधानही हीच 'री' ओढतात.

अण्वस्त्रे तयार केल्यामुळे देशाची सुरक्षितता कितपत सुधारते? संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांचे अलिकडचे एक निवदेन 'चीन हाच आमचा सर्वात मोठा शत्रू आहे.' सोडल्यास पाकिस्तान हेच प्रमुख शत्रुराष्ट्र आहे. त्याच्याशीच आतापर्यंत तीन मोठी युद्धे लढावी लागली. आजही काश्मिर, पंजाब आणि इतरत्र पाकिस्तानच्या अतिरेकी आणि घातपाती कारवायांना तोंड द्यावे लागत आहे. गेली पन्नास वर्षे हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यात एक अघोषित युद्ध सतत चालूच आहे. चीन अण्वस्त्रांच्या क्षेत्रात आपल्यापेक्षा कितीतरी पुढे आहे. पारंपरिक शस्त्रास्त्रांनी चीनशी खुले आम युद्ध लढणेही मोठे दुष्कर होईल; अण्वस्त्रांच्या बाबतीत तर चीनशी तुलना करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. थोडक्यात, अण्वस्त्रांच्या विकासाने हिंदुस्थानच्या सुरक्षा व्यवस्थेत मजबुती येईल असे म्हणणाऱ्यांच्या मनात शत्रुराष्ट्र म्हणून फक्त पाकिस्तानच असू शकते.

हिंदुस्थानी लोकांच्या डोक्यात पाकिस्तानविषयी एक अगदीच अजागळ गंड आहे. आकाराने, अर्थसामार्थ्याने आणि लष्करी तयारीत पाकिस्तान ही ताकद हिंदुस्थानच्या तुलनेत वीस टक्केसुद्धा नाही. काही आधुनिक विमाने आणि अस्त्रे यांबाबतीत प्रमाण

कमी व्यस्त आहे. पण, कोणत्याही युद्धात पाकिस्तान हिंदुस्थानवर मात करु शकेल ही गोष्ट केवळ अशक्यप्राय आहे. या परिस्थितीची पाकिस्तानी नेत्यांना चांगली जाणीव आहे. त्यामुळेच, पाकिस्तानी अंदाजपत्रक आणि अर्थव्यवस्था या दोघांवरही लष्करी खर्चाचा बोजा फार मोठा आहे. तेथील राजकारणावरही लष्कराचे प्रभुत्व सतत राहाते याचे कारण हिंदुस्थानविरुद्ध लष्करी तयारी हे त्यांच्या अंतर्गत आणि परराष्ट्रीय धोरणांचे मुख्य सूत्र आहे.

अणुबॉंब संपादन केल्यामुळे पाकिस्तानबरोबरच्या संघर्षातील परस्पर बलात काय फरक पडू शकतो? आजमितीस तरी त्यामुळे पाकिस्तानची बाजू वरचढ झालेली दिसते. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील हिंदुस्थानची एक शांतताप्रिय लोकशाही राष्ट्र म्हणून प्रतिमा आणि प्रतिष्ठा होती. इस्लामिक देशसुद्धा या प्रतिमेमुळे काही मर्यादेपलिकडे हिंदुस्थानविरोधी भूमिका घेण्यास धजत नसत. गौतमबुद्ध, महात्मा गांधींपासूनच्या या परंपरेची दोन दिवसातील पाच स्फोटांनी वासलात लावून टाकली आहे.

साऱ्या इस्मालिक देशांचाच आता पाकिस्तानवर दबाव वाढणार आहे. इस्लामी देशांच्या हाती अणुशक्ती असावी असा अनेक वर्षे तेथील जहाल हुकुमशहांचा प्रयत्न चालू आहे. अशी शस्त्रे हाती आली तर बिनदिक्कतपणे इस्रायलविरुद्ध त्यांचा उपयोग करण्यास ते कचरणार नाहीत. इस्लामी अणुबॉंब हर प्रयत्नाने तयार होऊ न देणे हे पाश्चिमात्य राष्ट्रांच्या परराष्ट्रीय धोरणाचे मोठे सूत्र आहे. मध्यपूर्वेतील, त्यातले त्यात आर्थिकदृष्ट्या प्रबळ असलेली मुस्लिम राष्ट्रे केवळ अमेरिकेच्या दबावामुळे अणुस्फोट करण्यास धजावत नाहीत. पण, गद्दाफी आणि सद्दाम हे काही फक्त दोनच माथेफिरू नेते नाहीत. 'हिंदुस्थानपासून संरक्षण करण्यासाठी बॉंब तयार करणे हा आमच्या राष्ट्रीय अस्मितेचा आणि सुरक्षेचा प्रश्न आहे' असा कांगावा करून पाकिंस्तानने अणुसामर्थ्य मिळविले तर ते थोड्याच काळात साऱ्या अरब लष्करांना उपलब्ध होईल यात काही शंका नाही. पाकिस्तानी बॉंब तयार होऊ नये यात पाश्चिमात्य देशांना प्रचंड स्वारस्य आहे.

पाकिस्तानने हिंदुस्थानी चाचण्यांना उत्तर म्हणून अणुस्फोट करू नयेत यासाठी सर्वतोपरी प्रयत्न पाश्चिमात्य राष्ट्रे करतील. पाकिस्तानच्या अणुकार्यक्रमाला चेपण्यासाठी, पाकिस्तानने खरेदी केलेली एफ-१६ विमाने देखील अमेरिकेने कित्येक वर्षे अडवून ठेवली, एवढेच नव्हे तर खरेदीची रक्कमही गोठवून टाकली. हिंदुस्थानी अणुचाचण्यांनतर आता ही विमाने पाकिस्तानला देण्याचे अमेरिकेने ठरविले आहे. हिंदुस्थानच्या हुंब भूमिकेचा फायदा घेऊन पाकिस्तान पारंपारिक शस्त्रास्त्रसज्जतेत भरगच्च मजबुती आणेल



असे दिसते आहे. प्रत्युत्तर म्हणून अणुस्फोट करण्यापेक्षा अणुस्फोट करण्याची भाषा बोलत राहणे आणि त्या धमकीपोटी आधुनिकतम शस्त्रास्त्रे मिळवीत राहणे हा खेळ पाकिस्तानला मोठा फायद्याचा ठरणार आहे. पाकिस्तानी पुढाऱ्यांचेही डोके फिरले आणि त्यांनी स्फोट केला की शस्त्रसामुग्रीच्या मदतीची ही गंगा आटून जाईल. येत्या काही काळात तरी सोन्याची अंडी देणारी कोंबडी कापण्याचा अजागळपणा पाकिस्तान करणार नाही. कारण उघड आहे. खरोखर युद्धाचा प्रसंग उद्भवला तर अण्वस्त्रांचा तसा काहीच उपयोग नाही. हिंदुस्थान अण्वस्त्रधारी देश झाला. अण्वस्त्रांचा वापर करण्याचा आदेश देण्याचे एक बटन पंतप्रधानांच्या हाती आले तर त्याचा ते उपयोग कधी आणि कसा करू शकतील?

पाकिस्तानातून काश्मिरात घुसलेल्या आतंकवाद्यांनी पाचशेहजार हिंदुंची कत्तल केली; पंतप्रधान अणुबटण दाबतील? काश्मिरमध्ये घातपात्यांच्या झुंडीच्या झुंडी पाकिस्तानने पुन्हा एकदा घुसविल्या, स्थानिक लोकांच्या पाठिंब्यामुळे ते यावेळी श्रीनगरपर्यंत चालून आले; पंतप्रधान अणुबटण दाबतील? पाकिस्तानची विमाने अमृतसर-लुधियाना-अंबालापर्यंत बॉंबवर्षाव करू लागली, पंतप्रधान अणुबटण दाबतील?

दोन्ही देशातील युद्धाचा शेवट एकाचा सपशेल पाडाव आणि दुसऱ्या देशाने त्याचा सर्व मुलुख व्यापणे आणि तेथे आपली सत्ता बसवणे अशा तऱ्हेने होणेच शक्य नाही. तेव्हा, अगदी निर्वाणीचा मार्ग म्हणूनदेखील युद्धप्रसंगात अणुबॉंबचा काही उपयोग नाही. भाजपा सरकारला राष्ट्रीय सुरक्षेची खरी चिंता असती तर त्यांनी अणुचाचण्या किंवा आधुनिक विमाने, तोफा यांच्या उपयोगावर आधारलेली संरक्षणनीती सोडून साऱ्या लष्कराची पुनर्रचना करण्याचे काम हाती घ्यायला पाहिजे होते. हिंदुस्थानची संरक्षण दले पूर्णत: व्यावसायिक रचनेची आहेत. युद्ध सुरू झाले की फौजा लढतात, लोक बातम्या ऐकत राहातात. ही शस्त्रास्त्रांची 'मॅच' दोनतीन आठवड्यांपलिकडे चालणार नाही याची सर्वांना खात्री असते. १८ ते २५ वयोगटातील सर्व तरुणांना सक्तीचे लष्करी शिक्षण आणि युद्धकाळात प्रत्येक तरुणास आघाडीवर जाण्यासाठी बोलावण्याची व्यवस्था आणून लष्कराची पुनर्रचना केली तर छोट्या स्वयंचलित बंदुकांच्या वापरानेही भारताची संरक्षण व्यवस्था अधिक मजबूत झाली असती. उत्तम स्वयंप्रेरित बंदुका हर जवानाच्या हाती देणे ही गोष्ट राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अणुबॉंबपेक्षा कितीतरी पटीने परिणामकारक ठरेल. पण, अणुस्फोट केल्याची घोषणा करण्यात जो थाटमाट आहे आणि राजकीय भांडवल करण्याची शक्यता आहे ती अशा घोषणेने थोडीच होणार आहे? जवान लढतात तोपर्यंत सुरक्षेची महती गाणारे आपल्या पोटच्या पोरांना किंवा

स्वत:ला आघाडीवर जाण्याची वेळ येणार आहे हे समजले तरी त्यांचा सूर कायम ठेवतात काय, हे पाहाणे मोठे मनोरंजक होईल.

### अणुंच्या आतषबाजीची किंमत

एका बाजूला अर्थमंत्री, व्यापारमंत्री जगभरचे दौरे करतात, परदेशी गुंतवणूकदारांनी हिंदुस्थानात धन ओतावे, तंत्रज्ञान आणावे म्हणून विनवणी करीत फिरतात; पावसाने थोडे डोळे वटारले तर दक्षिणोत्तर चारपाचशे शेतकऱ्यांना विष पिऊन जीव देण्याखेरीज पर्याय राहात नाही. अशा देशाने, दुसऱ्या बाजूला अणुक्षेत्रातील आपली मस्ती दाखविण्यापूर्वी काही विवेक केला पाहिजे. प्रमुख श्रीमंत देशांच्या उच्छिष्टावर पिंड पोसलेल्या दरिद्री देशांच्या यादीतील हा भणंग देश, विज्ञानाच्या क्षेत्रात उगाचच काही आंग्लविद्याविभूषित संशोधनतस्करांचे अहंकार गोंजारण्यासाठी मिशीला तूप लावून फिरतो हा जागतिक कुतुहलाचा किंवा करमणुकीचा विषय राहिला आहे. पण, या माकडचेष्टा प्राणघातक मर्यादा ओलांडून पलीकडे जाऊ लागल्या तर जग त्याची गांभीर्याने दखल घेईल, आवश्यक तर बडगा दाखवेल हे सहज समजण्यासारखे आहे.

पाच अणुस्फोट घडवल्यानंतर जागातील प्रबळ राष्ट्रांनी भारताविरुद्ध आर्थिक कार्यवाही केली तर त्याबद्दल तक्रार करण्यास हिंदुस्थानला जागा नाही. इराकचा सद्दाम आणि हिंदुस्थानचे 'अटलबिहारी' यात फरक करणे कठीण आहे.

आंतरराष्ट्रीय बहिष्काराचा धोका चाचणीचा निर्णय घेण्यापूर्वी वाजपेयी शासनाच्या लक्षात आला नव्हता असा युक्तिवाद बाष्कळपणाचा होईल. परिणामांची पुरेपूर जाणीव ठेवून घेण्यात आलेला हा निर्णय आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारातील हिंदुस्थानने लादलेल्या प्रतिबंधाबद्दल जागतिक व्यापार संस्थेच्या दरबारात अनेक प्रकरणे चालू आहेत. त्यातील बहुतेकांचा निर्णय भारताच्या विरुद्ध लागत आहे. अशा परिस्थितीत आपल्या माथी दोष न घेता आर्थिक क्षेत्रात जगापासून फारकत ठेवण्याचा हा जाणीवपूर्वक घेतलेला निर्णय आहे.

आतापर्यंतच्या लक्षणांवरून तरी, ही रणनीती यशस्वी आणि लोकप्रिय होत असल्याचे दिसत आहे. कोणाही विरोधी पक्षाची अणुचाचण्यांविरुद्ध 'ब्र' काढण्याची हिम्मत झालेली नाही. सर्वांनी हा मुद्दा राष्ट्रीय सुरक्षेचा असल्यामुळे आपली सहमती दाखविली आहे. सर्वचजण देशी विज्ञान आणि वैज्ञानिक यांच्या स्तुतिस्तोत्रपाठात सामील झाले आहेत.

आजमितीस जगातील सर्व प्रमुख सातही देशांनी भारतावर व्यापार आणि



मदत या दोनही क्षेत्रातील संबंध तोडण्याचे जाहीर केले आहे. याचे परिणाम निभावून नेण्याची आणि सोसण्याची भारतीय शासनाची आणि जनतेची कितपत तयारी आहे हा मुद्दा खरा महत्त्वाचा. इराकच्या सद्दाम हुसेनने गेली १० वर्षे कठोर आंतरराष्ट्रीय आर्थिक बहिष्काराचा सामना चालवला आहे. अशा बहिष्काराला चिवटपणे तोंड देण्यासाठी लागणारी कुवत आणि नेतृत्व आपल्याकडे आहे? भारतातील अणुशक्ति संस्थाने नष्ट करण्यासाठी लष्करी कारवाईचा निर्णय संयुक्त राष्ट्रसंघाने घेतला तर त्याला आपण किती दिवस तोंड देऊ शकू. राष्ट्रीयत्वाच्या गर्जना आणि वल्गना वातावरणात विरून जाऊ लागल्या आणि स्वदेशी राष्ट्रभावनेच्या वल्गनांचा जोश ओसरू लागला म्हणजे इराकसदृश्य परिस्थितीचा सामना आपण किती समर्थपणे करू शकू हा खरा प्रश्न आहे. सरकारी नियुक्तीने दूरदर्शनवर मुलाखती देणारे स्वयंमान्य तज्ज्ञ 'जागतिक बहिष्काराचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर काहीच परिणाम होणार नाही' असे बजावून बजावून सांगत आहेत. 'देशाचा जागतिक व्यापार राष्ट्रीय उत्पादनाच्या एक टक्कासुद्धा नाही, तेव्हा बहिष्काराचा परिणाम होऊन होऊन होणार किती? पुष्कळसे देश बहिष्कारात सामील होणारच नाहीत' असा त्यांचा युक्तिवाद आहे. पण, 'जागतिक व्यापाराचे प्रमाण कमी आहे आणि जागतिक गुंतवणूक नगण्य आहे हेच भारतीय अर्थव्यवस्थेच्या कमकुवतपणाचे कारण आहे' असे सर्व मान्यवर अर्थशास्त्रज्ञ मांडतात; व्यापार आणि गुंतवणूक वाढली तरच देशावरील आर्थिक अरिष्ट दूर होईल असे मानतात. थोडक्यात, आर्थिक संकट टाळण्याचा जो मान्यवर महामार्ग त्याचा या बहिष्काराने 'रस्ता रोको' होतो आहे. त्याचे नेमके परिणाम काय होतील? भारतीय ग्राहक आणि शेतकरी यांनी स्वातंत्र्यानंतरची ५० वर्षे सरकारी धोरणांचा काच सतत सहन केलाच आहे. खुलेपणाच्या वाऱ्याचा थोडा अनुभव घेतल्यानंतर ते पुन्हा आपली मान समाजवादाऐवजी राष्ट्रवादाच्या गोंडस नावाच्या जुवाखाली देण्यास तयार होतील काय?

या विषयावर विद्वान, पंडित काहीही अकांडतांडव घालोत; खरे उत्तर बाजारपेठेने दिले आहे. शेअर बाजार कोसळत आहे. एका दिवसात रुपया ७० पैशाने पडला. येत्या पाच सहा महिन्यात तो कोठपर्यंत कोसळेल हे सांगणे कठीण आहे. डिसेंबर १९९८ पर्यंत डॉलरची किंमत ६० रुपयांवर जाईल असे भाकीत मी १९९५ सालापासून सांगत आहे, ते खरे ठरण्याची सारी लक्षणे दिसत आहेत. स्वदेशीच्या जपमाळा ओढणारे कारखानदार प्रत्यक्षात सर्वच बाबतीत पाश्चिमात्य देशांवर अवलंबून आहेत. समाजवादाच्या काळात ५० वर्षे त्यांना हरतऱ्हेने आंजारले गोंजारले तरी ते खरेखुरे उद्योजक बनले नाहीत. अशा परभूतांच्या आधाराने स्वदेशीचे गलबत पाण्यात सोडणे हा मोठा विलक्षण

प्रकार आहे.

अटलबिहारी पंतप्रधान आहेत; देशाचे मान्यवर नेते आहेत. राष्ट्रीय सुरक्षेच्या ललकारीने देशात आणि देशवासियांत काय चैतन्याचा हुंकार भरता येतो याबद्दल त्यांच्या अनुमानाला आव्हान देणे धाष्ट्र्याचे होईल. आणीबाणीचा उत्साह सात महिने टिकला, अणुचाचणीतून निघालेली उन्मादावस्था तितकी टिकली तरी पुरे झाले.

समजा, भारतावरील व्यापारी बहिष्कारामुळे पेट्रोलियम, वरखते, रसायने यांचा पुरवठा तुटला तर त्याची काही पर्यायी व्यवस्था आहे? भारतीय लष्कराकडे पुरेसे पेट्रोल, डिझेल नसेल तर त्यांच्या हाती अणुबॉंब देऊन काय फायदा होणार आहे? आणि सारी अर्थव्यवस्था कोसळत असेल तर लष्कराच्या हातातील दोनचार अणुबॉंब देशाचे संरक्षण करू शकतील?

❑ ❑ ❑



# स्वातंत्र्याचा झेंडा फडकण्याआधीच लुटला गेला

## स्वातंत्र्य आले, मिळवले नाही

दुसऱ्या महायुद्धातील विजयासाठी इंग्लंडला प्रचंड किंमत मोजावी लागली. अनेक शहरे उद्ध्वस्त झालेली, लक्षावधी तरूण युद्धात मारले गेलेले, अर्थव्यवस्था कोलमडलेली अशा परिस्थितीत वसाहती राखण्यासाठी पुन्हा एकदा लष्करी कारवाई करण्याची इंग्रजांची मानसिक तयारी नव्हती. आशिया खंडातील जपानच्या चढाईने एक वेगळे वातावरण तयार झाले होते. आझाद हिंद फौज, नौसैनिकांचे बंड, जहाल गटांची देशव्यापी आंदोलन छेडण्याची तयारी हे लक्षात घेता हिंदुस्थानवर वसाहती राज्य चालू ठेवणे जवळजवळ अशक्य होते. शंभरावर वर्षे एतद्देशीय सैनिक, शिपाई आणि नोकरदार यांच्या भरवशावर इंग्रजी राज्य चालले. या समाजांच्या इंग्रजनिष्ठेवर अवलंबून राहाणे आता शक्य उरले नव्हते. इंग्लंडमधील सार्वत्रिक निवडणुकांत युद्धखोर चर्चिल यांच्या हुजुर पक्षाचा पराभव झाला; मजूर पक्ष सत्तेवर आला आणि लवकरात लवकर वसाहती राज्य संपविण्याचे ठरविण्यात आले.

## राष्ट्र नाही, नेतृत्व नाही

देशाची फाळणी करण्याचे ठरले. देहाचे तुकडे झाले तरी देशाचे तुकडे होऊ देणार नाही असे म्हणणारे पुढारी मोठ्या चपळतेने फाळणीसाठी तयार झाले. हे परीवर्तन एकदम कसे घडले ? सत्तांतर आताच झाले नाही तर सर्व देशभर अहिंसेला न मानणारे जनआंदोलन उभे राहील. नि:शस्त्र, गरीब निरक्षर लोकांना इंग्रजी साम्राज्याशी टक्कर देण्याकरिता गांधीजींनी सत्याग्रहाचा आणि राजकारणारच्या अध्यात्मीकरणाचा मार्ग सांगितला. त्यांच्या पेरणीला उदंड पीक आले. लोक लढ्यासाठी तयार झाले. पण, तो लढा आता गांधी छापाचा राहणार नाही; त्यात प्रचंड रक्तपात होईल. अशा लढ्याचे नेतृत्व मोठे कणखर असावे लागते. त्याची निपज गांधीवादी सत्याग्रहाच्या आंदोलनात होण्याचा काही संभव नव्हता. आंदोलन पेटले तर पुढाऱ्यांची जुनी पिढी मागे पडेल आणि बहुजन समाजाशी लागेबांधे असलेले नवे नेतृत्व रक्ताची प्रचंड किंमत देऊन उभे राहील हे सर्वांनाच कळून चुकले होते. उगवत्या स्वातंत्र्यसमरात जाती आणि धर्म यांच्या अभिमानाची सारी घाण वाहून गेली असती; पाकिस्तानच्या निर्मितीचा

विषयच अप्रस्तुत ठरला असता. देशाची फाळणी टळूही शकली असती. नेहरूपठडीतील नेत्यांना हे भावणारे नव्हते. फाळणी लादून का होईना, इंग्रज आज निघून गेले, सारी सत्ता, मानमरातब यांचे भरले ताट समोर येत आहे, वीसपंचवीस वर्षे केलेल्या धावपळीचे आणि सोसलेल्या तुरुंगावासाचे फळ समोर वाढून येत आहे; फाळणीसकट स्वातंत्र्य नाकारले तर आपणास काहीच भविष्य नाही हे त्यांना कळून चुकले होते. नवीन स्वातंत्र्यसमराचे सेनानी गांधीजींना आदरपूर्वक वंदन करतील, पण गांधीवाद्यांना मात्र जवळ करणार नाही. अशा परिस्थितीत गांधीजींनी निर्णय नेहरूंवर सोडला; त्यांच्या शिष्योत्तमाने फाळणीसकट स्वातंत्र्य स्वीकारले. ज्यासाठी काँग्रेसच्या झेंड्याखाली स्वातंत्र्याचे आंदोलन झाले ते सारे काही साध्य होत होते. देशातील सर्वसामान्य जनतेवर आपला पगडा राहावा, त्यांचे मागासलेपण कायम राहावे, त्यांच्या श्रमाचा आपल्याला फायदा घेता यावा; थोडक्यात, इंग्रजांच्या सिंहासनावर आपण चढून बसावे या, उच्चवर्णीय सुखवस्तू लोकांच्या मनिषेतून काँग्रेसी स्वातंत्र्य आंदोलन उभे राहिले. 'याचसाठी केला होता अट्टहास'. फक्त ही स्वप्नपूर्ती साऱ्या इंग्रज-हिंदुस्थानभर होणार नव्हती; त्यातून पाकिस्तानात जाणारे तीन-साडेतीन प्रांत सोडून द्यावे लागणार होते, एवढेच.

स्वातंत्र्याचा आणि फाळणीचा माऊंटबॅटन साहेबांनी केलेला प्रस्ताव काँग्रेसने स्वीकारला त्यामागे इंग्रजांपासून लवकरात लवकर स्वतंत्र व्हावे या भावनेपेक्षा हिंदुस्थानातील बहुजन समाजाची सत्ता देशात येऊ नये, प्रस्थापित श्रेष्ठींचेच राज्य पुन्हा स्थापन व्हावे ही बुद्धी अधिक प्रबळ होती. थोडक्यात, जोतिबा फुल्यांच्या शब्दात 'एकमय लोक' या अर्थाने 'राष्ट्र' उभे रीहले नसताना इंग्रज निघून गेले; त्यामुळे पुन्हा एकदा थोड्याफार फरकाने 'पेशवाई'ची स्थापना होण्याची तयारी झाली. इंग्रजी अंमल चालू असताना सामाजिक, आर्थिक सुधारणांपेक्षा राजकीय स्वातंत्र्याला महत्त्व देऊन आणि नंतर देशाच्या फाळणीची किंमत देऊन 'इंडियन' भद्र लोकांनी बहुजन समाजाचा पराभव केला.

## 'भटशाही' चा नव अवतार

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण शेतकरी समाजावर सातत्याने झालेला क्रूर अन्याय, शहरी कारखानदारीचे कौतुक हा काही अपघात नव्हता. हे करता यावे याचसाठी काँग्रेसी स्वतंत्रता आंदोलनाची धडपड होती. इंग्रज गेले पण, इंग्रजी लष्कर कायम राहिले, प्रशासन व्यवस्था कायम राहिली, पोलिस यंत्रणा तीच राहिली. इंग्रजांनी देशभर रेल्वेचे जाळे पसरुन वाहतूक खुली करण्याचा प्रयत्न केला. तेवढ्या बाबतीत मात्र



त्यांच्या 'इंडियन' वारसदारांनी धोरण बदलून टाकले. हिंदुस्थानचा परदेशी व्यापार वाढत होता. जगाच्या एकूण व्यापारापैकी तीन ते चार टक्के हिंदुस्थानचा होता. राष्ट्रीय स्वावलंबनाच्या नावाखाली 'इंडियनां'नी दोन पडदे उभे केले. रशियन कम्युनिष्टांनी उभे केलेले पडदे भेदण्यास अत्यंत कठीण. इकडून तिकडे ना मालाची वाहतूक, ना माणसांची. म्हणून त्याला 'लोखंडी पडदा' म्हटले जाते. असली तत्त्वनिष्ठा 'इंडियनां'च्या पचनी पडणारी नव्हती. व्यापारी माल आणि तंत्रज्ञान यांची आयात खुलेआम झाली तर त्याचा फायदा बहुजन समाजाला मिळाला असता. तेवढीच आयात फक्त बंद करुन 'इंडियन' भद्र लोकांना लागणारी कारखानदारी यंत्रसामुग्री आणि तंत्रज्ञान मात्र आणता यावे यांसाठी त्या पडद्यात फटी आणि भगदाडे होती. आंग्लविद्याविभूषित नागरी जनांना परदेशी जाण्यायेण्यात काही फार अडचण नव्हती. स्वातंत्र्यानंतर हिंदुस्थानच्या सरहद्दीवर एक बांबूचा पडदा उभा केला गेला आणि देशाच्या आत, कोणत्याही भौगोलिक, राजकीय सरहद्दी न आखता शेतीसंबंधित सर्व क्षेत्राला वसाहतींची वागणूक दिली गेली. जॉर्ज ऑरवेलच्या शब्दात, 'डुकरे दोन पायावर चालू लागली.'

बहुजन समाजापर्यंत पाश्चिमात्य विचार, विज्ञान आणि तंत्रज्ञान येऊन पोहोचू नये यासाठी मोठी जबरदस्त रणनीती तयार झाली.

## भाषेच्या प्रश्नाचे घोंगडे

स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात हिंदी ही राष्ट्रभाषा झाली पाहिजे अशी सर्व नेत्यांची एकमुखी स्पष्ट मांडणी होती. नव्या स्वातंत्र्याच्या उत्साहात देशातील इतर भाषिकांची भूमिकाही 'हिंदी राष्ट्रभाषा होणे योग्य आहे, पण म्हणजे आमची मातृभाषा मरणार आहे असे नाही; आम्ही आमच्या आमच्या भाषा सर्व साधनांनी संपन्न करीत राहू' अशी होती.

*''जरी मान्यता आज हिंदीस देई,*
*उदेले नवे राष्ट्र हे हिंदवी ।*
*तिचे पुत्र आम्ही, तिचे पांग फेडू ॥''*

ही भावना जशी महाराष्ट्रात तशी इतरत्रही होती. स्वातंत्र्य नासू लागले. नेतृत्व प्रतिभाशून्य झाले. त्यानंतर, दक्षिणेकडील राज्यांत हिंदीला विरोध होऊ लागला. पन्नास वर्षांपूर्वी अशी स्थिती नव्हती. त्याच वेळी जन्माला आलेल्या इस्रायल राष्ट्राने मृत समजली जाणारी हिब्रू राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारली; त्यांना कोणतीही मोठी अडचण आली नाही. फाळणीनंतरच्या दंगलीत उठलेल्या किंकाळ्यांच्या ध्वनिप्रतिध्वनींतही

राष्ट्रभक्तीची उर्मी इतकी प्रबळ होती की स्वतंत्र हिंदुस्थानच्या शासनाने देशातील बहुतेक भाषांची माऊली संस्कृत जरी राष्ट्रभाषा म्हणून जाहिर केली असती तरी त्याला फारसा विरोध झाला नसता.

पण, 'इंडिया' सरकारची उलटीच खूण! एकाच्या ऐवजी दोन भाषांना राष्ट्रभाचेचा दर्जा देण्यात आला. त्यातील एक हिंदी असावी हे समजण्यासारखे आहे. राष्ट्रीय सहमतीसाठी दुसरी भाषा म्हणून दक्षिणेकडील एखादी भाषा घेतली असती तरी समजण्यासारखे होते. राज्यघटनेत दुसरी राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळाली ती वसाहतवादी राज्यकर्त्यांच्या मातृभाषेला, म्हणजे इंग्रजीला. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षानंतर इंग्रजी दूर होण्याची काही शक्यता दिसत नाही, उलट हिंदीचेच महत्त्व चालले आहे.

इंग्रजी भाषा स्वीकारल्याने सोय कोणाची झाली? नोकरदार आणि शहरी सुशिक्षित अशा चारपाच टक्के भद्र लोकांची. समाजातील बहुसंख्य लोक भाषेसंबंधीच्या या एका निर्णयामुळे विचार-विज्ञानाच्या जागतिक प्रवाहापासून तोडले गेले. ग्रामीण बहुजनांना इंग्रजी भाषा फारशी कधी पेलली नाही. अगदी आजही बहुजन समाजातील सुशिक्षित इंग्रजीचा वापर करताना बावरतात आणि गुदमरतात. जपान, चीन हे आशियाई देश आणि विकसित जगातील फ्रान्स, जर्मनीसारखे युरोपीय देश यांना कोणालाच इंग्रजीचे फारसे कौतुक नाही. परदेशासी संबंध येणारे काही मोजके लोक इंग्रजी शिकतात. त्यांच्या भाषेचा त्यांच्या प्रगतीत कोठे अडसर आलेला दिसत नाही. मनुष्यप्राणी विचार करतो तो फक्त मातृभाषेतच. नंतरच्या वयात शिकलेल्या भाषा कितीही आत्मसात केल्या तरी त्या भाषांत मूलग्राही विचार होऊ शकत नाही. असे असूनही 'इंडिया'ने इंग्रजीचा स्वीकार केला, कारण 'इंडियनां'ना मूलग्राही विचार करण्याची महत्त्वाकांक्षाच नव्हती. परदेशी साहित्य, कलासंस्कृती, विचार, विज्ञान, तंत्रज्ञान यांची मोजकी मोजकी आयात व्हावी, ती आपल्या 'आडती'च्या दुकानातून व्हावी आणि बहुजनांनी आपल्या ओंजळीतूनच हे पाणी प्यावे, एवढीच त्यांची इच्छा.

राज्यकारभार लोकभाषेतच चालावा ही मागणी नेहरूंनी कधीच स्वीकारली नसती. भाषावार प्रांतरचनेला अजूनही 'इंडियन' बुजुर्ग कडाडून विरोध करतात. नानी पालखीवालांसारखे तथाकथित विचारवंत, स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांत ज्या घोडचुका झाल्या म्हणतात, त्यात भाषावार प्रांतरचनेचा समावेश करतात. सरकारी दफ्तरशाही पसरत चालली तसतसे हिंदी किंवा इंग्रजीत कारभार करू शकणारे नेते आणि कारकून यांचा तुटवडा पडू लागला तेव्हा भाषावार प्रांतरचना करावी लागली. राज्य सरकारांच्या अधिकारकक्षेत असलेले विषय तसे किरकोळ महत्त्वाचे. राज्यभाषेत त्यांचा व्यवहार



चालल्याने 'इंडियनां'ना फारसे दु:ख होणार नव्हते. राजकीय सत्तेच्या स्पर्धेत ग्रामीण विभागातील पुढारी 'इंडिया'च्या बाजून उभे करण्यात भाषावार प्रांतरचना मोठी उपयोगी ठरली. प्रांतांची फेरआखणी होऊन चाळीस वर्षे झाली पण सर्व राज्यांत विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थकरण या क्षेत्रांत इंग्रजीच हुकुमत गाजवत आहे.

## इंग्रज संस्कृतीच कायम

राष्ट्रभाषेसंबंधी एका निर्णयाने शहरी सवर्ण सुखवस्तुंना चरायला कुरण मोकळे झाले. लष्कर, पोलिस, प्रशासन सारे इंग्रजी तोंडवळ्याचेच राहिले. 'वंदे मातरम्' बाजूला पडून इंग्रज बादशहाच्या अभिवादनाप्रित्यर्थ लिहिलेले कवन राष्ट्रगीत बनले. स्वातंत्र्यदिनी आणि प्रजाकसत्ताकदिनी झेंडावंदन, कवायती आणि झेंडा उतरविण्याचा कार्यक्रम इंग्रजांनाही लाजवेल इतक्या इंग्रजी धाटणीने होऊ लागले. 'गरीबी हटवा', 'ग्रामीण जनतेचे आरोग्य, शिक्षण यांना सर्वोच्च प्राधान्य द्या' अशा वल्गना झाल्या, पण शिक्षणाची सारी व्यवस्थाच सत्तेवर आलेल्या, 'काळ्या इंग्रजां'च्या पोरांना सोयीस्कर अशी बनविण्यात आली. शिक्षणव्यवस्था तीन पायऱ्यांची झाली.

देशातील काही मोजकी विद्यापीठे आणि आय्.आय्.टी. सारख्या संस्था सत्ताधाऱ्यांच्या मुलांना दुय्यम जागतिक दर्जाचे शिक्षण देऊ लागल्या. या संस्थांत शिकून तयार झालेले विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर परदेशात पैसा मिळविण्यासाठी निघून जातात किंवा देशातील संस्था आणि शासन यांत उच्चपदी विराजमान होतात.

दुसऱ्या पायरीवर सर्वसाधारण विद्यालये, महाविद्यालये येतात. यांत मध्यमवर्गीय समाजाच्या शिक्षणाची सोय होते. शिक्षणाचा दर्जा अगदी निकृष्ट. शिक्षणसंस्था बहुतांशी राज्यकर्त्यांच्या दोस्तमंडळींच्या हाती. महाविद्यालये म्हणजे गडगंज पैसा कमावण्याचे साधन. उत्तीर्ण झालेल्या मुलांची निपुणता काय याला काहीच महत्त्व नाही. त्यांना नोकऱ्या मिळणार आहेत ते समाजवादी व्यवस्थेत. समाजवादी कारखान्यात आणि कार्यालयात कार्यकुशलता ही आवश्यक मानली जातच नाही.

तिसऱ्या आणि शेवटच्या पायरीवर खेड्यापाड्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा, ग्रामीण विद्यालये, महाविद्यालये यांची गणना, धड इमारतींचाच पत्ता नाही; गुरुजी हजर असल्यास दैवयोग; गुरुजींचे ज्ञान अकटोविकट; शिक्षणाची साधने म्हणजे फळा आणि खडू.

स्वतंत्र भारताच्या लोकप्रतिनिधींनी शिक्षणक्षेत्रातही जातिव्यवस्थेप्रमाणे वर्गवारी केली. तळागाळातील समाजाचा शिक्षणाशी आजही संबंध नाही. आजही पन्नास

टक्क्यांवर लोक निरक्षर आहेत. गाववस्तीवर रस्ता नाही, पाणी नाही तसा मास्तरही नाही आणि डॉक्टरही नाही, तेथे कोणी आजारी पडला, बाळंतीण अडली तर जुजबी वैद्यकीय ज्ञान असलेलाही कोणी आरोग्यसेवक नाही. चांभार अजून जुन्या पद्धतीनेच कातडे कमावतो, जोडे शिवतो. बुरुड त्याच्या बापजाद्यांनी पिढ्यान् पिढ्या विणल्याप्रमाणे टोपल्या विणतो. लोहार जुन्याच भात्यावर बैलगाड्यांच्या धावा ठोकतो आणि कुऱ्हाडी, कोयते, विळ्यांना धार लावून देतो. पण, त्याच देशातील दुसरे भाऊ, पहिल्या पायरीचे शिक्षण घेतलेले लोंढ्या लोंढ्याने परदेशी जातात. इंग्लंड, अमेरिकेत कोणी आजारी पडले तर त्याची देखभाल करणारा डॉक्टर हिंदुस्थानी असतो. कारखानदारी, संशोधन अशा क्षेत्रांतही इथलेच भाऊ परदेशात जाऊन नाव कमावतात. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांचे हे फलित आहे.

इतिहासाच्या मंचावर पुन्हा पुन्हा तीच तीच पात्रे येतात, तोच तोच प्रयोग थोड्याफार फरकाने करून दाखवितात. आपल्या देशात हजारो वर्षांपासून चाललेले जातिसंघर्षाचे वेगळेवेगळे प्रयोग एका मागोमाग एक होत आहेत. जातीजातीतील संघर्ष बौद्धक्रांतीस बधला नाही, इस्लामी आक्रमणापुढे नमला नाही. इंग्रजी राज्य प्रस्थापित झाल्यानंतरही बहुजनांच्या तोंडाला, राष्ट्रवादाच्या गर्जना करून पानेच पुसली गेली. स्वातंत्र्यांनंतर बहुजनांना समाजवादाच्या बातांनी भुरळ पाडण्यात आली. बहुजनांच्या दुःखाची कर्मकहाणी संपते असे दिसत नाही. पन्नास वर्षांच्या स्वातंत्र्यकालानंतर समाजवादाचा पाडाव झाला. सवर्ण सुखवस्तु आता स्वदेशीची भाषा बोलू लागले आहेत. स्वातंत्र्य नासले, एवढेच नाही तर देशातील बहुजन अजूनही नवनवीन थापांच्या भुलभुलैय्यांना बळी पडतात. स्वातंत्र्य नासले, एवढेच नाही, ते का नासले हेही आमच्या नीट ध्यानात येत नाही ही खरी शोकांतिका आहे.

• • •

... तोच तोच
... फरकाने करुन
दाखवितात. आपल्या देशात
हजारो वर्षांपासून चाललेले
जातिसंघर्षाचे वेगळेवेगळे प्रयोग
एका मागोमाग एक होत आहेत.
जातीजातीतील संघर्ष बौद्धक्रांतीस
बधला नाही, इस्लामी आक्रमणापुढे
नमला ...

दुःखाची कर्मकहाणी संपते असे
दिसत नाही. पन्नास वर्षांच्या
स्वातंत्र्यकालानंतर समाजवादाचा
पाडाव झाला. सवर्ण सुखवस्तु
आता स्वदेशीची भाषा बोलू
लागले आहेत. स्वातंत्र्य नासले,
एवढेच नाही तर देशातील बहुजन
...